## अध्यक्षांचे मनोगत

सन २०११-१२ हे वर्ष विद्युत क्षेत्रात घडलेल्या अनेक महत्वाच्या घटनांमुळे दीर्घकाळ स्मरणात राहील. भारतात सर्वात जास्त विजेचा वापर करणाज्या राज्यातील नियामक म्हणून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने या सर्व घटनांची नोंद घेतली असून विद्युत क्षेत्राची निकोप वाढ व्हावी याकरिता आयोगाने विद्युत अधिनियम,२००३ च्या अधीन राहून मार्गक्रमण करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार, आयोग सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करुन देण्यासाठी आणि स्पर्धेस प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील आहे. या वर्षात घडलेल्या काही महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनांचा येथे उल्लेख करण्याची गरज आहे.

आयोगाने ९ सप्टेंबर २०११ च्या आदेशाने क्रॉस सबसिडी अधिभाराची फेरनिश्चिती केली आणि मुक्त प्रवेशासाठीच्या स्टॅण्डबाय आकारांबाबत धोरण ठरवून दिले. या निर्णयाचे महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्र आणि उद्योगांनी स्वागत केले आहे. या आदेशामुळे मुक्त प्रवेश व्यवस्थेची अंमलबजावणी आणखी सुरळित होईल, अशी आयोगाची अपेक्षा आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला मुंबईतील जास्तीत जास्त उपनगरे आणि मीरा भाईंदर क्षेत्राकरिता नव्याने वितरण परवाना देण्याचा आणखी एक महत्वपूर्ण निर्णय आयोगाने या वर्षात घेतला. भारताचे सॉलिसिटर जनरल यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी असा सल्ला दिला की, दुसज्या परवाना अर्जदाराकडे स्वत:चे वितरण जाळे असणे आवश्यक आहे. आयोगाने याबाबतीत सर्व बाजूंनी विचार करुन रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडला मुंबईची जास्तीत जास्त उपनगरे आणि मीरा भाईंदर क्षेत्रात विजेचे वितरण करण्यासाठी नवीन परवाना देण्याचा निर्णय घेतला.

विद्युत क्षेत्रातील बदलती परिस्थिती लक्षात घेऊन विजेची खरेदी, विजेचे पारेषण आणि विजेचे वितरण यासंबंधी गतिमान पार्श्वभूमीवर विचार करण्याची गरज असल्याचा मी पुनरुच्चार करीत आहे. उदाहरणार्थ, विजेची खरेदी पुढील काळात स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे करण्यात येणार आहे. या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी या क्षेत्राने तयारी करणे आवश्यक आहे. समाजाच्या प्रत्येक भागातून विजेची होणारी वाढती मागणी पुरविण्यासाठी, ग्राहकांना जास्तीत जास्त समाधान्ाकारक सेवा देण्याची काळजी विविध वितरण कंपन्यांना घ्यावी लागेल. या संदर्भात, मुंबई आणि परिसरातील तसेच संपूर्ण राज्यातील पारेषण जाळे मजबूत करण्याकडे तातडीने लक्ष पुरविण्याची गरज आहे. विजेच्या मागणीत सातत्याने वाढ होत असल्यामुळे एक भक्कम वितरण जाळे उभारणे ही काळाची गरज आहे. सुमारे ५००० मेगावॅट वीज राज्याबाहेरुन घेण्यात येत असून राज्यात निर्माण होणाज्या सुमारे ४००० मेगावॅट विजेची भर पारेषण जाळयात सन २०१३ पर्यंत पडणार आहे. राज्याबाहेरून येणारी वीज आणि नियोजित वीज निर्मिती यांचे पारेषण हाताळण्यासाठी पुरेशी पारेषण यंत्रणा आधीच विकसित करून ठेवण्याची गरज आहे. त्यामुळे जेथे शक्य असेल तेथे भूमिगत वा उपरी मार्ग या पर्यायांचा विचार करण्यात यावा. या दृष्टीने आयोगाने मुंबई महानगर क्षेत्रात आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पारेषण जाळे वाढविण्यासाठी उपाय सुचविण्याकरिता कार्य गट / स्थायी समिती गठीत केली आहे. सदर गटाने या दिशेने बरेच काम केले आहे, याबद्दल मी समाधानी आहे. या गटाकडे मुंबई महानगर क्षेत्राकरिता आणि महाराष्ट्रासाठी ५ वर्षाचा व्यवसाय आराखडा तसेच १५ वर्षाचा एक दृष्टिकोन-आराखडा तयार करण्याची महत्वाची कामे सोपविण्यात आली आहेत.

विद्युत क्षेत्रात घडलेली अन्य महत्वाची घटना म्हणजे माननीय विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाद्वारे देशातील वितरण कंपन्यांनी त्यांचे वीज दर निश्चिती करण्याचे प्रस्ताव प्रत्येक आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्यांनी तसे न केल्यास संबंधित राज्य विद्युत आयोगांना याबाबत स्वत:हून कार्यवाही सुरु करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयाचे दूरगामी परिणाम होणार असून त्यामुळे वितरण कंपन्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

सातत्याने करण्यात येत असलेल्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रातील वितरण हानि कमी करण्यात येत असल्याचे आयोगाला वारंवार आश्वासन देण्यात येत असले तरी महाराष्ट्रातील वितरण हानीची आयोगाला चिंता वाटते. सर्व वितरण ट्रान्सफॉर्मर्सना आणि फीडर्स्ना १०० टक्के मीटर बसविणे हा एक मैलाचा दगड ठरणार असून हे उद्दिष्ट, स्थिती नियंत्रणाखाली आणण्यासाठी, ठराविक मुदतीत प्राधान्याने साध्य करणे आवश्यक आहे. विद्युत ग्राहकांची मोठया संख्येने वाढणारी थकबाकी ही आयोगाला काळजी वाटणारी आणखी एक बाब आहे. या स्थितीत सुधारणा करण्यासाठी कठोर उपाय योजण्याची गरज आहे. विद्युत अधिनियम, २००३ नुसार क्रॉस सबसिडीची पातळी वीज पुरवठयाच्या सरासरी खर्चाच्या फ२० टक्क्याच्या मर्यादेत राखणे अनिवार्य आहे. आयोग हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

आयोग, आपल्या निर्णय प्रक्रियेत जनतेचा सहभाग प्रभावी व्हावा यासाठी प्रयत्नशील आहे. ग्राहकांना शक्तिप्रदान करणे आणि ग्राहक तसेच विद्युत कंपन्या यांमध्ये प्रमाणबध्द माहितीचा ओघ सतत चालू राहावा या दृष्टीने आयोग प्रयत्नशील राहील.

राज्य सल्लागार समितीच्या बैठकांमध्ये किंवा महत्वाच्या धोरणात्मक बाबी संबंधीच्या अन्य मंचांच्या बैठकांमध्ये आयोगाला सहाय्य करणाज्या सर्व हितचिंतकांचे मी आभार मानतो. राज्य सल्लागार समितीच्या बैठका प्रत्येक तिमाहीच्या अखेरीस घेण्यात येतात आणि त्यामध्ये विद्युत क्षेत्राशी संबंधित गुंतागुंतीच्या प्रश्नांवर सखोल चर्चा होते. स्वत:चा वेळ आणि शक्ती वापरून जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आपला मौल्यवान सल्ला देणाज्या तज्ञांचा आयोग सदैव कृतज्ञ राहील.

वीज क्षेत्राच्या विकासाला गती देण्यासाठी या क्षेत्रातील सर्व संबंधितांनी म्हणजेच विद्युत कंपन्या, राज्य आणि केंद्र सरकार, नियामक आयोग, ग्राहक प्रतिनिधी, गुंतवणूकदार आणि अन्य हितचिंतक या सर्वांनी  विद्युत अधिनिमय, २००३ नुसार त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी एक धर्म म्हणून, श्रीमद्भगवद्गीतेच्या अध्याय-३ मधील श्लोक ३५ प्रमाणे, पार पाडण्याची गरज आहे.

**श्रेयान्सधर्मो विगुण: परधर्मात्स्वनुष्ठितात् ।।**
**स्वधर्मे निधनं श्रेय: परधर्मो भयावह:।।**

(आपला धर्म जरी दोषयुक्त असला तरी परधर्माचे आचरण करण्यापेक्षा आपल्या धर्माचे आचरण करणे अधिक कल्याणकारी आहे.
स्वधर्माचे आचरण करतांना जरी मरण आले तरी परधर्माचे आचरण करण्यापेक्षा मरण अधिक चांगले आहे. कारण परधर्माचे अनुसरण भयावह असते.)

विद्युत अधिनियम, २००३ अनुसार सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या प्रगती तसेच भरभराटीसाठी आयोग कटिबध्द असल्याचा मी पुनरूचार करीत आहे.



**(व्ही.पी.राजा)**

## राज्य सल्लागार समिती

सन २०११-१२ या अहवाल वर्षात राज्य सल्लागार समितीच्या ठरल्याप्रमाणे चार बैठका झाल्या. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे अध्यक्ष, श्री व्ही. पी. राजा हे या बैठकांच्या अध्यक्षस्थानी होते. भारत सरकारच्या नवीन व नूतनशील ऊर्जा मंत्रालय (एमएनआरई), यांच्या विनंतीवरुन आयोगाने राज्य सल्लागार समितीच्या बैठकांकरिता एमएनआरईला कायमस्वरुपी निमंत्रित करण्याचा निर्णय घेतला. तसेच या पुढील काळात नूतनशील ऊर्जेला येणारे महत्त्व विचारात घेऊन, आयोगाने नूतनशील ऊर्जेसाठी राज्यात नोडल एजन्सी असलेल्या महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा), यांना देखील राज्य सल्लागार समितीच्या बैठकांना कायमस्वरुपी निमंत्रित करण्याचा निर्णय घेतला. याशिवाय, आयोगाने डॉ. ओमप्रकाश जी. कुलकर्णी, समुपदेशक, सल्लागार आणि ऑटोमेशन, इन्स्ट्रुमेंटेशन, ऊर्जा व्यवस्थापन, आयपीआर सीडीएम, पर्यावरण आणि नूतनशील ऊर्जा यामधील सल्लागार अभियंता, यांना राज्य सल्लागार समितीच्या बैठकांमध्ये कायमस्वरुपी निमंत्रित करण्याचा निर्णय घेतला.

## १. नूतनशील ऊर्जा

नूतनशील ऊर्जा परिस्थितीवर सादरीकरण करण्यात आले. या संबंधात आयोगाने घेतलेले पुढाकार खालीलप्रमाणे आहेत:-

एक) विनियमांच्याद्वारे पुढाकार

दोन) विविध नूतनशील ऊर्जा आदेशांच्याद्वारे पुढाकार

तीन) नूतनशील ऊर्जा खरेदी बंधन, नूतनशील ऊर्जा खरेदीबाबत तपशीलवार सूचना आणि नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र कार्यपध्दती यांना चालना देण्यासाठी पुढाकार

चार) पवन, लघु जल प्रकल्प, ऊसाच्या चिपाडातून ऊर्जा सहनिर्मिती, बायोमास आणि सौर ऊर्जा यांच्यासाठी नूतनशील ऊर्जा लेव्हलाईज्ड वीज दर निश्चित करण्यासाठी पुढाकार.

महाराष्ट्राने नूतनशील ऊर्जा क्षेत्रास, प्रामुख्याने पवन ऊर्जेस चालना देण्यात, लक्षणीय कामगिरी केली आहे, असे एमएनआरईचे सह सचिव, श्री शशी शेखर यांनी नमूद केले. अमेरिकेतील बर्कले विद्यपीठाने केलेल्या अभ्यासानुसार, भारताची पवन ऊर्जा निर्मितीची संभाव्य क्षमता सुमारे १००,००० मेगावॅट पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. ही संपूर्ण क्षमता साध्य झाली तर, इतकी ऊर्जा निर्मिती हाताळण्यासाठी ग्रीड सक्षम आहे किंवा नाही याबाबत विचार करावा लागेल. अशी क्षमता अन्य राज्यांमध्ये देखील आहे, पण ही क्षमता साध्य होण्याची तेथे शक्यता नाही. त्यामुळे संपूर्ण नूतनशील ऊर्जा निर्मितीचा एक पूल तयार करण्याबाबत एमएनआरई विचार करीत आहे, जेणेकरुन या पूलमधून कोणीही बोलीच्या माध्यमातून त्याचे नूतनशील ऊर्जा खरेदी करण्याच्या बंधनाचे उद्दीष्ट साध्य करू शकेल. याचा संपूर्ण देशाला फायदा होईल. पारेषण खर्च भागविण्यासाठी, पंतप्रधान / नियामकांचा मंच यांच्या सौर ऊर्जेच्या योजनांमधील स्वतंत्र निधीचा वापर करता येईल, जेणेकरुन पारेषण सुरळीतपणे चालू राहील.

### २. क्रॉस सबसिडी कमी करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम

आयोगाच्या ३० सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, आयोगाचे सल्लागार, प्राईसवॉटरहाऊसकूपर्स (पीडब्ल्युसी) यांनी या संबंधात आतापर्यत करण्यात आलेली प्रगती, क्रॉस सबसिडी कमी करण्याबाबतच्या कालबध्द कार्यक्रमाची ठळक तत्वे आणि प्रत्येक विद्युत कंपनीसाठी क्रॉस सबसिडीमध्ये कपात, यावर एक तपशीलवार सादरीकरण केले. राज्य सल्लागार समितीचे सदस्य आणि कायमस्वरुपी निमंत्रित यांनी यावेळी महत्वाच्या सूचना केल्या. या सूचनांमध्ये इतर बाबींबरोबरच खालील बाबींचाही समावेश होतो :-

एक) वीज पुरवठ्याच्या खर्चावर आधारित वीज दर विकसित करण्याच्या माध्यमातून क्रॉस सबसिडीची रक्कमआपोआप कमी येईल आणि प्रत्येक वर्गवारीच्या सरासरी वीज दराच्या २० टक्क्यांपेक्षा कमी किंवा जास्त या मर्यादेत क्रॉस सबसिडी राखणे कठीण होणार नाही.

दोन) वीज पुरवठ्याच्या खर्चाचे मूल्यांकन वर्गवारीनिहाय करणे आणि त्यानंतर क्रॉस सबसिडी निश्चित करणे.

तीन) क्रॉस सबसिडी कमी करण्यासाठी शासनाशी विचारविनिमय करुन कालबध्द कार्यक्रम आखणे.

चार) या प्रश्नाबाबत अंतिम निर्णय घेताना मुंबई आणि परीसरातील गिरण्यांच्या जमिनीवर विकसित होणाऱ्या आयटी उद्योगांची वर्गवारी विचारात घेणे.

त्यांनी खालील मुद्दे हाताळले :-

- वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च
  वीज पुरवठ्याचा खर्च (व्होल्टेज-निहाय)
  विविध ग्राहक वर्गवारींना करावयाच्या वीज पुरवठ्याचा खर्च
- विद्युत जाळे आणि वीज पुरवठ्याशी संबंधित खर्च अचूकपणे काढण्यासाठी विद्युत कंपन्यांनी निश्चित मुदतीत त्यांचे लेखे वेगवेगळे करणे व ठेवणे.
- पुरवठ्याच्या खर्चाची परिगणना करण्यासाठी मार्गदर्शक सूचना विकसित करण्याची गरज
- तोपर्यंत क्रॉस सबसिडी वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चावर आधारित असेल.

या अहवालास अंतिम स्वरुप देण्यात येत आहे. अंतिम अहवाल उचित कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासनाकडे सादर करण्यात येईल.

### ३. वीज मंत्रालयाच्या सूचनेचा १ मेगावॅट आणि त्यावरील मुक्त प्रवेश ग्राहकांवर होणारा परिणाम

राज्य सल्लागार समितीच्या ३० डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीत या प्रश्नावर चर्चा झाली. सदस्य आणि कायमस्वरुपी निमंत्रितांनी निदर्शनास आणून दिले की, या सूचनांच्या अंमलबजावणीमुळे १ मेगावॅट आणि त्यावरील ग्राहक नियामक संस्थेच्या कक्षेबाहेर जातील आणि अशा ग्राहकांचा वीज दर विद्युत बाजारपेठेकडून निश्चित होईल. जेव्हा असे ग्राहक राज्य विद्युत कंपनीच्या विद्युत जाळ्यातून बाहेर पडतील तेव्हा राज्य विद्युत कंपन्यांवर त्याचा मोठा परिणाम होईल. कारण हे बाहेर जाणारे ग्राहक अनुदान पुरविणारे ग्राहक आहेत. या परिस्थितीमुळे

अखेर एकूण महसुली गरजेच्या (एआरआर) मागणीत वाढ होईल आणि अनुदानित ग्राहकांसाठी वीज दरामध्ये वाढ होणे अपरिहार्य ठरेल. अनुदानित ग्राहकास वीज दरवाढीचा हा धक्का सहन करणे शक्य होणार नाही. १ मेगावॉट आणि त्यावरील ग्राहकांना वीज पुरवठा करणारा पुरवठादार विजेचा पुरवठा करु शकला नाही तर अशा ग्राहकांचे काय होईल? अशा ग्राहकांना वितरण परवानाधारकाकडून (राज्य वितरण कंपनी) वीज पुरवठा घेणे शक्य होईल का किंवा त्यांना वीज एक्स्चेंजकडून विजेचा पुरवठा प्राप्त करावा लागेल? अशा परिस्थितीत वीज एक्स्चेंजेस् मुख्य लाभार्थी होतील. त्यामुळे वितरण परवानाधारकांनी - (एक) महसुलातील हानि, (दोन) सक्तीने वीज पुरवठा करण्याचे बंधन, आणि (तीन) क्रॉस सबसिडी अधिभार, या बाबींवर आपली रणनीती स्पष्ट करणे आवश्यक आहे.

तथापि, कार्यक्षमतेत सुधारणा, वाढती स्पर्धा आणि वीज दराचे सुसुत्रीकरण (शास्त्रीयीकरण) असे त्याचे काही फायदे देखील असतील. विद्युत अधिनियम, २००३ ने वितरण कंपन्यांसाठी यु एस ओ बंधनकारक ठरविल्यामुळे वितरण कंपन्यांच्या हितसंबंधात संघर्ष निर्माण होऊ शकतो. या संदर्भात, व्होल्टेजची पातळी, विजेचा अतिभार किंवा वारंवारता पातळी यामधील तफावतीबाबतच्या समस्या सोडवाव्या लागतील. सर्व भागीदारांनी जोखीमीचा वाटा समानपणे उचलणे आवश्यक ठरते. आयोगास क्रॉस सबसिडी, विजेची उपलब्धता आणि ग्राहकांची चळवळ यासारख्या गुंतागुंतीचे प्रश्न सोडविणे शक्य झाले तर वितरण कंपन्यांवर त्याचा कमीत कमी परिणाम होईल. सर्वात शेवटच्या स्तरावरील ग्राहकाला दुर्लक्षित करण्यात येऊ नये. या अतिशय गुंतागुंतीच्या प्रश्नाशी संबधित विविध समस्या विचारात घेऊन असे सुचविण्यात येत आले की, मुक्त प्रवेशाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात यावी. बैठकीत मांडलेल्या सूचनांची आयोगाने नोंद घेतली.

### ४. मुंबई महानगर क्षेत्रासाठी (एमएमआर) पाच वर्षांचा व्यवसाय आराखडा

मुंबईमध्ये नोव्हेंबर, २०१० मध्ये दोन वेळा उद्‌भवलेल्या ग्रीडमधील व्यत्ययांमुळे दक्षिण मुंबईच्या काही भागांसह मुंबई महानगर क्षेत्राला होणाऱ्या वीज पुरवठ्यावर फार मोठा परिणाम झाला. राज्यातील सर्व पारेषण कंपन्यांच्या आढावा बैठकीनंतर, मुंबई आयआयटीचे प्रा. एस. ए. खापर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली तपशीलवार अभ्यास करण्यात आला. मुंबईमध्ये वीज पुरवठा ठप्प होण्याच्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भविष्यातील अंदाजित वीज भाराची मागणी पूर्ण करण्याकरिता वीजनिर्मिती आणि पारेषण व्यवस्था बळकट करण्यासाठी तातडीने पावले उचलण्याची गरज असल्याची शिफारस या अभ्यास अहवालात करण्यात आली.

मुंबई महानगर क्षेत्र आणि राज्यामधील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आणि सध्याच्या व संभाव्य पारेषण कोंडीवर मात करण्यासाठी सुधारणात्मक उपाययोजना सूचविण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, महापारेषण कंपनी, टाटा पॉवर कंपनी, रिलायन्स इन्फास्ट्रक्चर कंपनी, पश्चिम विभागीय भार प्रेषण केंद्र, राज्य भार प्रेषण केंद्र, मुंबई आयआयटी यांचे प्रतिनिधी आणि बाहेरील तज्ञ मंडळींचे प्रतिनिधींत्व असणारी एक स्थायी समिती स्थापन केली. या समितीवर मुंबई महानगर क्षेत्र आणि महाराष्ट्रासाठी ५ वर्षांचा व्यवसाय आराखडा आणि १५ वर्षांचा परिप्रेक्ष्य आराखडा तयार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. या समितीने काही शिफारशी केल्या. त्यातील काही खालीलप्रमाणे आहेत :-

अ) मुंबई महानगर क्षेत्रासाठी नियोजनाच्या टप्प्यांवरच मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, सिडको, विमानतळ प्राधिकरण, विशेष आर्थिक क्षेत्र आयुक्त, रेल्वे आणि मुंबई महानगर पालिका यासारख्या विविध शासकीय संस्थांना सहभागी करुन घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन या संस्थाकडून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक सहकार्य प्राप्त होऊ शकेल.

ब) मुंबई महानगर क्षेत्र परिसरातील जमिनीवरील सर्व ११० केव्ही वाहिन्यांचे रुपांतर जमिनीखालील वाहिन्यांमध्ये करण्याची गरज आहे आणि तोच वहिवाटीचा हक्क इन्सुलेटेड क्रॉस आर्म्स सह २२० केव्ही वाहिन्यांसाठी वापरता येईल.

क) सर्व मान्यताप्राप्त दीर्घ-कालीन पारेषण योजनांसाठी, खाजगी क्षेत्राच्या सहभागातून स्पर्धात्मक बोलीची पध्दत अंमलात आणावयास हवी. यासाठी शासनाने उचित मार्गदर्शक सूचना तयार करण्याची आणि शक्तीप्रदान समिती नियुक्त करण्याची गरज आहे.

मागील बऱ्याच वर्षांपासून असे आढळून आले आहे की, मुंबई महानगर क्षेत्रामध्ये आवश्यक वीज आणण्याकरिता विद्युत जाळ्याच्या योजनांचे प्रश्न सोडविण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्रातील विद्यमान वितरण परवानाधारकांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे, अशी सूचना करण्यात आली की, समितीने संबंधित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी उपाययोजना सुचवाव्यात, जेणेकरुन या उपाययोजना शासनासमोर अंतिम निर्णयासाठी मांडण्यात येतील. जेथे शक्य असेल तेथे, जमिनीखालील आणि जमिनीवरील वाहिन्यांचा पर्याय विचारात घ्यावा, असेही सूचित करण्यात आले. महावितरण कंपनीने असे सूचित केले की, आयोग आणि/किंवा राज्य शासनाने दोन महत्वाच्या बाबी सोडविण्याची गरज आहे -

(एक) अशा पारेषण जाळ्याच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक भांडवली गुंतवणूक आणि दोन) नियामक यंत्रणेच्या माध्यमातून अशा गुंतवणुकीची वसुली.

प्रधान सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र शासन यांनी असे सूचित केले की, या संबंधातील सर्व समस्या/अडचणींची व संबंधित शासकीय विभाग/खाती व संस्था यांची एक यादी तयार करण्यात यावी, ज्यामुळे या समस्या लवकर सोडविण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करणे शक्य होईल.

स्थायी समितीने मुंबई महानगर क्षेत्रासाठी (टप्पा १) अहवाल सादर केला आहे आणि महाराष्ट्रासाठी पाच वर्षांची योजना तयार करण्याचे काम करीत आहे.

### ५. मुंबई शहरासाठी संभाव्य वीज मागणी प्रतिसाद

३० मार्च, २०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये, श्री शेखर खाडीलकर, टीपीसी आणि डॉ. महेश पाटणकर, एलबीएलएन, यांनी सादरीकरण केले. या सादरीकरणात, अन्य बाबींबरोबरच, मुंबईमध्ये ४० टक्क्यांहून अधिक विजेची मागणी वातानुकूलन यंत्रामुळे आहे. वीज मागणी प्रतिसाद योजनेत ग्राहकांच्या सक्रीय सहभागामुळे, कमाल मागणीच्या काळातील

विजेवरील खर्चात कमी करता येईल. डॉ. ओमप्रकाश कुलकर्णी यांनी ग्रामीण भारतातील वीज परिस्थितीत क्रांतिकारी बदल करण्याबाबत सादरीकरण केले. नूतनशील ऊर्जेसाठी स्मार्ट ग्रीड असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मायक्रो/मिनी आणि लघु जल प्रकल्पांसाठी वन खात्याकडून परवानगी मिळण्यासाठी कसोशिने प्रयत्न करण्याची गरज असल्याचेही त्यांनी पुढे नमूद केले.

## ६. अन्य बाबी

### नियामक कार्यासाठी तांत्रिक क्षेत्रात आवश्यक असलेल्या तज्ञ व्यक्ती उपलब्ध करण्यासाठी समर्पित शाळा/संस्थांची स्थापना -

आयोगाने प्रशिक्षित मनुष्यबळ क्षमता- बांधणीकरिता पुढाकार घेतला आहे. यासाठी आयोगाने पाठपुराव्याची कार्यवाही म्हणून पुरेशा कर्मचारी वर्गाची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. टाटा पॉवर कंपनीने टाटा व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेला या प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याची तयारी दाखविली आहे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने असे नमूद केले की, त्यांच्याकडे कार्यकारी अधिकाऱ्यांसाठी अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तथापि, या कार्यक्रमाचा देखील लाभ घेण्याचा ते विचार करतील.

### वितरण परवानाधारकांसाठी पुरवठा संहिता आणि कृतीची मानके (एसओपी) विनियमांमध्ये सुधारणा -

आयोगाकडून वीज पुरवठा संहिता आणि कृतीची मानके विनियमांमध्ये सुधारणा करण्याचे काम चालू आहे. नियामकांच्या मंचाने नमुना पुरवठा संहिता आणि कृतीच्या मानाकांचे विनियम प्रसिध्द केले आहेत. त्यास अनुसरून मविनिआ विनियमांमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत.

### वितरण परवानाधारकांसाठी आकारांच्या अनुसूचीचा आढावा -

आयोगाकडून सन २००६ मध्ये, त्यावेळी प्रचलित असलेली साधनसामग्री आणि कामगारांवरील खर्च यांच्या आधारे आकारांची अनुसूची निश्चित करण्यात आली आणि त्यास मान्यता देण्यात आली. तेव्हापासून सर्व खर्चांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे सध्याच्या आकारांच्या अन‍ुसूचीचा आढावा घेण्याची गरज आहे. आयोगाने असे सूचित केले की, वितरण परवानाधारकांनी त्यांच्या एकूण महसुली गरज/वीज दराच्या याचिकेमध्ये पुरवठा संहिता विनियमांप्रमाणे आकारांच्या अनुसूचीचा आढावा घेण्याचा प्रस्ताव समाविष्ट करावा, ज्यामुळे ही बाब जनतेसमोर त्यांचे हरकती आणि सूचना मागविण्यासाठी सादर करता येऊ शकेल व हा प्रश्न वीज दराच्या आदेशाच्या माध्यमातून सोडविण्यात येईल.

### वीज क्षेत्रात क्षमता बांधणीसाठी पुढाकार

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने सहयोगी शिक्षणाद्वारे मनुष्यबळ विकासाकरिता पुढाकार आणि वीज क्षेत्राच्या महत्वाच्या भागांमध्ये मनुष्यबळ विकासासाठी मजबूत यंत्रणा स्थापन करण्याच्या वेगवान प्रयत्नांद्वारा विद्युत नियमनांकरिता क्षमता बांधणीची प्रक्रिया पुढे चालू ठेवली आहे. जागतिक व्यापार केंद्र, मुंबई, सिम्बॉयसिस इन्स्टीट्युट ऑफ इंटरनॅशनल बिझिनेस, पुणे, के. जे. सोमय्या इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, मुंबई या संस्थांबरोबर आयोग नियमितपणे विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करीत आहे.

आयोग व विद्युत कंपन्यांमध्ये मनुष्यबळ विकास यंत्रणेची स्थापना, त्याचे पालन आणि त्यात सातत्य राखण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने बहु-आयामी पुढाकारांची मालिका सुरू केली आहे, ज्यायोगे वीज नियमन आणि उदयोन्मुख वीज बाजारपेठांबाबतच्या माहितीचा सर्व हितसंबंधितांमध्ये प्रसार होईल. यामुळे राज्यातील विद्युत यंत्रणेला तंत्रज्ञानदृष्ट्या कुशल मनुष्यबळाची भरती, प्रशिक्षण आणि हा वर्ग आपल्याकडे राखून ठेवणे शक्य होईल.

आयोगाने क्षमता बांधणी संदर्भात घेतलेले पुढाकार संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे -

१) विद्युत नियमनाची संकल्पना आणि प्रक्रिया, ऊर्जा/वीज क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी विधी साक्षरता आणि विधीविषयक दृष्टीकोन आणि वीज क्षेत्रासाठी वित्तीय साक्षरता आणि वार्षिक महसुली गरज या विषयावर तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

२) वीज क्षेत्रात नव्याने पदार्पण करणाऱ्यांसाठी 'विद्युत नियमनातील पदव्युत्तर पदविका' हा ६ महिने कालावधीचा अभ्यासक्रम. (प्रत्येकी ६० उमेदवारांचे दोन गट, एका गटाने हा अभ्यासक्रम पूर्ण केला असून दुसऱ्या गटाचे प्रशिक्षण चालू आहे)

३) ऊर्जा/विद्युत क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी 'ऊर्जा क्षेत्रातील अर्थशास्त्र' हा २० आठवड्यांचा (शनिवारी दुपारी) प्रमाणपत्र अभ्यासक्रम के. जे. सोमय्या इन्स्टीट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् येथे आयोजित करण्यात आला.

४) सिम्बॉयसिस इन्स्टीट्युट ऑफ इंटरनॅशनल बिझनेसच्या एमबीएच्या कार्यक्रमातील 'ऊर्जा आणि पर्यावरण' या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून 'विद्युत नियमनावर' एक अभ्यासक्रम आयोगाच्या पुढाकाराने सुरु करण्यात आला.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नजिकच्या काळात खालील कार्यक्रम आयोजित करण्याचे प्रस्तावित केले आहे :-

- आयोगाचे अधिकारी आणि कर्मचारी वर्गासाठी समुपदेशनाचा (मेंटॉरिंग) कार्यक्रम
- विद्युत नियमनाबाबत कार्यालयांतर्गत प्रशिक्षण देऊ शकणाऱ्या व्यक्तिंना प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांना प्रशिक्षण
- आयोगाच्या अधिकारी आणि कर्मचारी वर्गांसाठी व्यवस्थापन विकास कार्यक्रम, (तंत्रज्ञान-मनुष्यबळ स्वरुपाचा), बहु-शाखीय कौशल्य उभारणी
- नवोदितांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम

### विद्युत बाजारपेठ संनियंत्रण कक्ष

विद्युत अधिनयम, २००३ मध्ये सोपविण्यात आलेल्या जबाबदारीनुसार, आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये आयोगाने घेतलेल्या विविध पुढाकारांपैकी विद्युत बाजारपेठेतील घडामोडींवर लक्ष ठेवण्यासाठी विद्युत बाजारपेठ संनियंत्रण कक्षाची स्थापना करण्यासाठी घेतलेला पुढाकार हा एक महत्वाचा पुढाकार होय.

विद्युत बाजारापेठेबाबतचे विविध दृष्टीकोन, विद्युत

अधिनियम, २००३ ची सद्यस्थिती, राष्ट्रीय विद्युत धोरण आणि ऊर्जा मंत्रालयाचे निर्देश आणि विविध राज्यांच्या राज्य विद्युत नियामक आयोगांचे विनियम, याबाबतच्या माहितीचा संग्रह तयार करण्याचे काम हा कक्ष करील. आयोगामधील सर्व उपयोगकर्त्यांना संदर्भासाठी ही माहिती उपलब्ध असेल.

हा कक्ष सध्या विजेची निर्मिती, पारेषण आणि वितरण, बायोमास आणि ऊर्जा सहनिर्मिती बरोबर नियोजित आणि विद्यमान नूतनशील ऊर्जा प्रकल्प, वीज बाजारपेठेतील अल्प कालीन आणि दीर्घ कालीन कल आणि वीज दर या सर्वांचा समावेश असलेल्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील वीज क्षेत्राच्या नियोजनाबाबतची माहिती गोळा करण्याचे आणि त्यांची पडताळणी करण्याचे काम करीत आहे.

या कक्षाने, नेमून दिलेल्या कामाचा भाग म्हणून, राज्यात पाहावयास मिळालेल्या वीज खरेदीच्या कलासंबंधी अहवाल प्रसिध्द करण्यास सुरुवात केली आहे.

### भारतातील अल्प कालीन वीज बाजारपेठ

भारतातील एकूण वीज व्यवहारांमध्ये, अल्प कालीन विजेचा वाटा १० टक्के असून दीर्घ कालीन/मध्यम कालीन वीज कराराच्या माध्यमातून ९० टक्के वीज व्यवहार करण्यात येतात. आकडेवारीत सांगायचे झाल्यास, भारतातील अल्प कालीन वीज बाजारपेठेत २०१०-११ मध्ये ८१.५६ अब्ज युनिट्स इतकी अल्प कालीन वीज होती. २००९-१० च्या तुलनेत (२००९-१० मध्ये ६५.९० अब्ज युनिट्स) अल्प कालीन वीज व्यवहारांमध्ये २४ टक्क्यांची वाढ झाली. वीज एक्स्चेंजच्या माध्यमातून वाढलेला विजेचा व्यवहार (५३.३ टक्के) आणि वितरण कंपन्यांमधील थेट द्विपक्षीय व्यवहारांमध्ये झालेली वाढ (सुमारे २६ टक्के) यामुळे ही बहुतांश ही १५.६६ अब्ज युनिट्सची वाढ झाली. अल्प कालीन वीज बाजारपेठेतील एकूण वाढीमध्ये अनिर्धारित आंतरबदलाचा (युआय) वाटा सुमारे १४.४ टक्के इतका आहे.

### आर्थिक वर्ष २०११-१२ मधील महाराष्ट्रातील अल्प कालीन वीज खरेदी कल

गेल्या काही वर्षांमध्ये अल्प-कालीन विजेच्या मागणीत कमालीची वाढ झालेले महाराष्ट्र राज्य अल्प कालीन वीज बाजारपेठेतील पहिल्या पाच क्रमांकातील एक वीज खरेदीदार राज्य ठरले आहे. वस्तुतः संपूर्ण वर्षभरात, केवळ एका आठवड्याकरिताच महाराष्ट्र राज्य हे पहिल्या पाच क्रमांकाचे अल्प कालीन वीज खरेदीदार राज्य नव्हते. राज्य वितरण कंपन्यांनी केलेल्या वीज खरेदीचे एकत्रित विश्लेषण केल्यास असे निदर्शनास येते की, जुलै-सप्टेंबर या तिमाहीमध्ये सरासरी अल्प कालीन वीज खरेदी १४५ दशलक्ष युनिट्स/आठवडा ते जानेवारी-मार्च या तिमाहीमध्ये १९३.७८ दशलक्ष युनिट्स/आठवडा सरासरी अल्प कालीन वीज खरेदी झाली. ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीमध्ये विजेची किंमत (भारताच्या वीज एक्स्चेंजमधील) ४.६० रु/युनिट तर जानेवारी-मार्च या तिमाहीमध्ये विजेची किंमत २.२१ रु/युनिट (अनिर्धारित आंतरबदल युआय दर) इतकी होती. मान्सूनच्या महिन्यांमध्ये विजेच्या मागणीत सर्वसाधारणपणे घट होत असल्यामुळे, जुलै-सप्टेंबर या तिमाहीत २.५१ आणि ३.१२ रु/युनिट दराने सर्वात कमी अल्प कालीन वीज खरेदी व्यवहार (१४५ दशलक्ष युनिट्स/आठवडा) दिसून आले. शिवाय या महिन्यामध्ये राज्याने प्रति आठवडा सरासरी ३० मेगावॉट वीज अल्प कालीन वीज बाजारपेठेत विकल्याचे दिसून आले.

ऑक्टोबर-डिसेंबर या तिमाहीमध्ये इंधन पुरवठ्याचा प्रश्नामुळे अल्प कालीन बाजारपेठेमधील किंमती अचानक वाढल्याचे दिसून आले. कोळसा खाणीतील कामगारांचा संप, देशातील काही भागांत अतिवृष्टी झाल्यामुळे पाणी साचल्याने झालेली वाहतुकीची कोंडी आणि आंध्र प्रदेशातील तेलंगण आंदोलन हे घटक या स्थितीस कारणीभूत होते. ऑक्टोबरमध्ये १२ रु/प्रति युनिटपर्यंत किमती वाढल्या. तथापि, फेब्रुवारी-मार्च महिन्यांत सहा राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका असल्यामुळे वीज दरांमध्ये मोठी वाढ झाली नाही आणि किमती २ आणि ३.३० रु/युनिटच्या मर्यादेत राहिल्या. मे २०११ मध्येही हाच कल दिसून आला, त्यावेळी सुध्दा तामिळनाडुमधील महत्त्वाच्या विधानसभा निवडणुकांदरम्यान वीज दरवाढ झाली नाही.

### निष्कर्ष

आगामी काळात, वीज मागणी-पुरवठा यामधील तूट कमी होण्याची अपेक्षा व्यक्त होत असल्यामुळे राज्यासाठी ही समाधानाची बाब आहे. कमाल मागणी असलेल्या कालावधीतील तूट सध्या १३ टक्क्यांवर आणण्यात आली असून, कमाल मागणी असलेल्या कालावधीत विजेची मागणी १४ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत असताना कमाल मागणी असलेल्या कालावधीत विजेची उपलब्धता ७-८ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. फेब्रुवारी २०१२ ते जून २०१३ या कालावधीसाठी झालेल्या कराराच्या आधारावर, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने या कालावधीकरिता काढलेल्या अंदाजित किंमतीची उतरती वक्राकार रेषा असे दर्शविते की, मे २०१२ पर्यंत किंमतमध्ये घट होण्याचा कल (३.०५ रु./युनिट) राहील आणि त्यानंतर जून २०१३ पर्यंत किमतीमध्ये वाढ होण्याचा कल (३.७५ रु./युनिट) कायम राहील. हे विचारात घेऊन, राज्यातील वितरण कंपन्यांनी राज्यातील ग्राहकांसाठी इष्ट किमतीस वीज मिळावी म्हणून मध्यम कालीन आणि दीर्घ कालीन वीज प्राप्त करुन घेण्याची व्यवस्था करावी असा त्यांना सल्ला देण्यात येत आहे.

### वीज मागणी व्यवस्थापन

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग वीज मागणी व्यवस्थापनाच्या पथदर्शी कार्यक्रमांची ग्राहकांच्या जागेत अंमलबजावणी करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे. आयोगाने वितरण कंपन्यांसाठी आतापर्यंत खालीलप्रमाणे वीज मागणी व्यवस्थापनाच्या पथदर्शी कार्यक्रम मंजूर केले आहेत आणि या कार्यक्रमांची सद्यस्थिती खालील तक्ता क्र. १ मध्ये देण्यात आली आहे.

याशिवाय, आयोगाने वीज बचतीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी खालील वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांवर भर दिला.

❖ **वीज मागणी प्रतिसाद कार्यक्रम :-**

आयोगाने, मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करण्याची चौकट) विनियम, २०१० च्या विनियम, ४ (सी) मध्ये वीज मागणी प्रतिसादाची (डीआर) व्याख्या केलेली आहे. विनियम ४ (सी) खालीलप्रमाणे आहेः

**तक्ता क्र. १**

| अनु. क्र. | आयोगाने मंजूर केलेले कार्यक्रम | विद्युत कंपनी | बदललेल्या उपकरणांची आकडेवारी | विद्युत कंपन्यांची प्रगती |
|---|---|---|---|---|
| १ | टी-५ एफटीएल | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट | १,७५,००० | ८०६९ जुन्या अकार्यक्षम ट्युबलाईट्स बदलण्यात आल्या |
| २ | ५ स्टार सिलिंग फॅन कार्यक्रम | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट, महावितरण | ४७,००० | ५७०० सिलिंग फॅन लावण्यात आले आहेत |
| ३ | विण्डो एसी कार्यक्रम | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट | ६०० | ९० एसी बदलण्यात आले |
| ४ | औष्णिक ऊर्जा साठवणूक | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट | २५०० टीआर | या कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु आहे |
| ५ | ५ स्टार रेफ्रीजरेटर | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण | १०,००० | आयोगाच्या परवानगीने कार्यक्रमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे |
| ६ | गॅस वॉटर हिटर्स | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण | २,००० | महानगर गॅस लि. च्या उपस्थित केलेल्या प्रश्नामुळे कार्यक्रम थांबवण्यात आला |
| ७ | ऊर्जा कार्यक्षम कृषी पाणी पम्प्स | महावितरण | ३,५३० | प्राईसवॉटरहाऊसकूपर्सने १११ पम्प्सच्या सॅम्पल साईज करिता एम आणि व्ही अहवाल तयार केला आहे आणि ११७ पम्प्स बदलण्यात आले आहेत. |
| ८ | हस्तचलित वीज मागणी प्रतिसाद | टीपीसी-वितरण | १००० ग्राहक | टीपीसी-वितरणने दोन वीज मागणी व्यवस्थापन प्रतिसाद कार्यक्रम केले |
| ९ | स्वयंचलित-वीज मागणी प्रतिसाद | टीपीसी - वितरण | ५ इमारती | ग्राहक सदस्यत्व प्रक्रियेचा कार्यक्रम |
| १० | ऊर्जेचे लेखा परीक्षण | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण आणि बेस्ट | - | ३५ हून अधिक ऊर्जा लेखा परीक्षण करण्यात आले. |
| ११ | वीज भार सर्वेक्षण/संशोधन | टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट आणि महावितरण | - | वीज भार संशोधन पूर्ण करण्यात आले. |

***"४. वीज मागणी व्यवस्थापन मार्गदर्शक तत्त्वे :-***

*(सी) वितरण परवानाधारक सर्वोच्च मागणी आणि आनुषंगिक महागड्या विजेची खरेदी कमी करण्यास मदत होईल असे कार्यक्रम, विशेषतः नागरी भागात, कार्यान्वित करेल. अशा कार्यक्रमांमध्ये, वीज मागणीला प्रतिसाद देण्यासाठी घेतलेले पुढाकार, ज्यामध्ये ग्राहक परवानाधारकाशी केलेल्या कराराद्वारे त्यांच्या विद्युत भाराची मागणीची फेर-आखणी करण्यास मान्य करतील, असतील.''*

आयोगाने वितरण कंपन्यांमधील वीज मागणी प्रतिसाद कार्यक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सक्रीय पुढाकार घेतला आहे. आयोगाने टीपीसी-वितरणसाठी स्वयंचलित तसेच हस्तचलित वीज मागणी प्रतिसाद कार्यक्रमांना मंजुरी दिली आणि या कार्यक्रमाअंतर्गत टीपीसी-वितरणने मुंबईमध्ये दोन वीज मागणी प्रतिसाद कार्यक्रम केले. ११ नोव्हेंबर, २०११ रोजी झालेल्या पहिल्या कार्यक्रमात एकूण सुमारे ४.१ मेगावॅट आणि ७००० युनिट्स इतका वीज भार कमी करण्यात आला. दुसरा कार्यक्रम २१ डिसेंबर, २०११ रोजी पार पडला आणि त्यामध्ये ८००० युनिटहून अधिक वीज मागणी कमी मागणीच्या काळात करण्याचे उद्दीष्ट साध्य केले. या कार्यक्रमात आयटी आणि आयटीइएस कंपन्या, सांडपाणी पम्पिंग केंद्र आणि काही औद्योगिक वीज भार ग्राहक सहभागी झाले. टीपीसी-वितरणला जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा ग्राहकांनी त्यांचा वीज भार कमी करण्यासाठी विविध पध्दतींचा वापर केला. यामध्ये वातानुकूलित यंत्राचे तापमान निर्धारित करण्यामधील बदल, कामाच्या वेळांमधील बदल, आळीपाळीने वीज पुरवठा करणे , पम्प चालवण्याच्या वेळेत बदल, इमारत व्यवस्थापन यंत्रणेचा वापर करुन वीज भार कमी करण्यास प्राधान्य आणि राखीव वीज निर्मिती करण्यावर भर देणे या कार्यक्रमांचा समावेश होता.

### ❖ औष्णिक ऊर्जा साठवणूक (टीइएस) कार्यक्रम :-

आयोगाने २५०० टीआरचे लक्ष्य ठेवून औष्णिक ऊर्जा साठवणूक यंत्रणा (टीईएस) पथदर्शी वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमाला मंजुरी दिली. औष्णिक ऊर्जा साठवणूक यंत्रणेचा वापर करुन, विजेचा भार दिवसाच्या कमाल भार असलेल्या कालावधी ऐवजी रात्रीच्या कमाल भार नसलेल्या कालावधीत बदलण्यासाठी हा कार्यक्रम आखण्यात आला आहे. विविध माहिती आणि अनुभव यांच्या आधारे असे निदर्शनास आले की, औष्णिक ऊर्जा साठवणूक यंत्रणेमध्ये काही सुविधा याआधीच पुरविण्यात आल्या होत्या पण विविध कारणांमुळे त्यांचा परिणामकारक वापर करण्यात येत नव्हता. या कारणामुळे एका विद्युत कंपनीने क्षमतेच्या आधारावर नव्हे, तर औष्णिक ऊर्जा साठवणुकीद्वारे वीज भारात बदल करण्यासाठी सूट (रिबेट) दिली. औष्णिक ऊर्जा साठवणूकीतील ग्राहकांना १ वर्षाकरिता रु. १ प्रति युनिट सूट देण्यात आली. ग्राहकांनी जर अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये स्वारस्य दाखविले तर विजेची बचत दशलक्ष युनिट्सच्या प्रमाणात होईल.

❖ **ऊर्जा कार्यक्षम सिलिंग फॅन कार्यक्रम:-**

आयोगाने, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट, महावितरण आणि टीपीसी-वितरण यांना ४७००० जुने अकार्यक्षम सिलिंग फॅन्स ऐवजी ५ स्टार नामांकन असणारे सिलिंग फॅन्स बदलून देण्याच्या उद्दीष्टासह ऊर्जा कार्यक्षम सिलिंग फॅन पथदर्शी कार्यक्रमास परवानगी दिली. या कार्यक्रमास नियोजित निवासी वर्गवारीमध्ये अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला.

❖ **ऊर्जा कार्यक्षम रेफ्रिजरेटर कार्यक्रम :-**

ग्राहकांच्या गरजांनुसार तंत्रज्ञानात आवश्यक सुधारणा करण्याकरिता आणि ऊर्जा बचत करण्यासाठी या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली आहे. आयोगाने टीपीसी-वितरण आणि आरइन्फ्रा-वितरण यांना त्यांच्या ग्राहकांसाठी ऊर्जा बचत करणाऱ्या रेफ्रिजरेटर कार्यक्रमास परवानगी दिली. या कार्यक्रमा अंतर्गत ऊर्जा बचत करणाऱ्या १०,००० रेफ्रिजरेटर्सचे लक्ष्य ठेवण्यात आले. यामध्ये ग्राहकांनी जुन्या डायरेक्ट कूल रेफ्रिजरेटर्स ऐवजी ५ स्टार नामांकन असणारे डायरेक्ट कूल रेफ्रिजरेटर्स आणि जुन्या फ्रोस्ट फ्री रेफ्रिजरेटर्स ऐवजी ५ स्टार नामांकन असणारे फ्रॉस्ट फ्री रेफ्रिजरेटर्स बदलण्याचा पथदर्शी कार्यक्रम आखण्यात आला. अशा तऱ्हेने प्रत्येक उपकरणासाठी रु. ४५००/- ची सूट देण्यात आली. वीज मागणी व्यवस्थापन सल्लागार समितीच्या सूचनांनुसार, फ्रोस्ट फ्री रेफ्रिजरेटर्स बदलून त्याऐवजी ५ स्टार नामांकन असणारे डायरेक्ट कूल रेफ्रिजरेट घेणाऱ्या ग्राहकांना अधिक प्रोत्साहन-अधिदान (रु. १०००/-) देण्यात आले. अधिक कार्यक्षम तंत्रज्ञान वापरण्यासाठी, ग्राहकांना प्रति उपकरणामागे रु. ५५००/- सूट देण्यात आली.

## नूतनशील ऊर्जा

### भारतामध्ये नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र- भावी प्रगती आणि पूरक बाजारपेठ

ग्राहकांच्या हिताच्या संबंधात नियामकाने निश्चितच व्यापक दृष्टीकोन स्वीकारला आहे. पर्यावरणातील बदलासंबंधातील जागतिक धोक्याचा इशारा हा सध्या मोठा स्फोटक प्रश्न बनला असून, या संदर्भात धोरण ठरविणाऱ्यांनी विविध लक्षणीय पुढाकार घेतले असून, नूतनशील ऊर्जेच्या विकासाला चालना देणे हा त्यापैकीच एक पुढाकार आहे. विद्युत अधिनियम २००३, या अधिनियमाखाली ठरविण्यात आलेली धोरणे, तसेच पर्यावरणीय बदलासंदर्भात राष्ट्रीय कृती क्रार्यक्रमाखाली (एनएपीसीसी) देशातील एकूण वीज निर्मिती क्षमतेमध्ये नूतनशील स्त्रोतांचा हिस्सा वाढविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम देण्यात आला आहे. विद्युत अधिनियम २००३, कलम ३ (१), कलम ४, कलम ६१ (एच) आणि कलम ८६ (१) (इ) आणि त्यास समर्थ करणाऱ्या राष्ट्रीय विद्युत धोरण २००५, आणि वीज दर धोरण २००६ खालील अन्य तरतुदीद्वारे राज्य विद्युत नियामक आयोगांवर विविध मार्गांनी नूतनशील ऊर्जेचा विकास करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा विकसनशील देश असल्यामुळे, आणि नूतनशील ऊर्जेचा विकास करण्याची मोठी क्षमता त्यात असल्यामुळे (भारत हा पवन ऊर्जा निर्मितीमध्ये चीन, अमेरिका, जर्मनी व स्पेन नंतर पाचवा मोठा देश आहे) भारताची आर्थिक वाढ होण्याकरिता नूतनशील ऊर्जेचा विकास करण्याची अनिवार्य गरज आहे. आज अखेर,भारतामधील नूतनशील ऊर्जा प्रकल्पांची स्थापित क्षमता २३,१२९ मेगावॅट असून महाराष्ट्र राज्याची स्थापित क्षमता ३६०८ मेगावॅट आहे.

तथापि, नूतनशील ऊर्जेचे स्त्रोत देशाच्या विविध भागात सारख्याच प्रमाणात आढळत नाहीत. दिल्ली सारख्या राज्यात नूतनशील ऊर्जा स्त्रोतांचा विकास मोठया प्रमाणावर करण्याची क्षमता नाही. यामुळे, दिल्ली सारख्या राज्यातील राज्य विद्युत नियामक आयोगांवर तेथील नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाची टक्केवारी वाढविण्यावर मर्यादा येते. त्या विरुध्द अन्य राज्यांमध्ये (राजस्थान आणि तामिळनाडू सारख्या) नूतनशील स्त्रोतांचा विकास करण्याची मोठी क्षमता आहे. अशा राज्यांमध्ये राज्य विद्युत नियामक आयोगांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या निश्चित केलेल्या पातळीच्याही पलीकडे नूतनशील ऊर्जा स्त्रोतांच्या क्षमतेचा विकास करता येईल. या संदर्भात, नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र या संकल्पनेस मोठे महत्व प्राप्त होते. या संकल्पनेचा हेतू हा नूतनशील ऊर्जा स्त्रोतांची उपलब्धता आणि नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासूनची वीज खरेदी करण्याच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी बंधन असलेल्या व्यक्ति/संस्थांची गरज यामधील तफावत दूर करणे हा, आहे. ज्या राज्यांमध्ये नूतनशील ऊर्जा निर्मितीची मोठी क्षमता आहे अशा राज्यांना नूतनशील ऊर्जा निर्मितीची क्षमता वाढविण्यास प्रोत्साहान देणे अपेक्षित आहे. कारण नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीखाली अशा निर्मात्यांकरिता, त्यांचा निर्मितीचा खर्च वसूल व्हावा यासाठी, राष्ट्रीय स्तरावर एक बाजारपेठ निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने, प्रादेशिक अडचणी दूर करण्यासाठी आणि सर्व हितसंबंधितांशी सविस्तर चर्चा केल्यानंतर, केंद्रीय विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा निर्मितीसाठी नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र मान्यतेच्या व निर्गमित करण्यासाठीच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० दि. १४ जानेवारी २०१० रोजी अधिसूचित केले आणि त्यानंतर २९ सप्टेंबर २०१० रोजी त्यामध्ये केलेल्या सुधारणेद्वारे भारतीय विद्युत क्षेत्रात नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची पध्दत सुरु केली. केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने, दि. २९ जानेवारी २०१० च्या आदेशाने , राष्ट्रीय भार प्रेषण केंद्राला (एनएलडीसी) नूतनशील ऊर्जा प्रकल्पांची नोंदणी करणे, नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे निर्गमित करणे, इ. कामे करण्यासाठी, नूतनशील ऊर्जा चौकटीखाली, एक केंद्रीय अभिकरण (एजन्सी) म्हणून पदनिर्देशित केले. त्याशिवाय, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाच्या वरील विनियमांना अनुसरुन , केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने, १ जून २०१० रोजी एक "केंद्रीय एजेन्सीने नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र पध्दतीखाली सादर केलेली सविस्तर कार्यपध्दती" निर्गमित केली. नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे ही कार्य-सदृश नावांनी जसे ग्रीन टॅक्स, रिन्यूएबल ऑब्लिगेशन सर्टीफिकेटस् किंवा ट्रेडेबल रिन्यूएबल सर्टीफिकेटस्, या नावांनी ओळखली जातात. आंतर-राष्ट्रीय स्तरावर- इंग्लड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपान, नेदरलॅंडस् , डेनमार्क आणि पोलंड या सारख्या देशांमध्ये, या संकल्पनेचा वापर, नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रांचा व्यापार करण्यासाठी एक मजबूत आणि विश्वासार्ह बाजारपेठेचा विकास सुकर करण्यासाठी, केला जात आहे. त्यामुळे नूतनशील ऊर्जा निमात्यांना महसूल मिळविण्यासाठी एक अतिरिक्त स्त्रोत उपलब्ध करुन देता येईल. त्यानुसार, नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची बाजारपेठ भारतात देखील त्या दृष्टीनेच वाटचाल करीत आहे.

नूतनशील ऊर्जेसंबंधीचे राष्ट्रीय लक्ष्यांक विचारात घेऊन आणि

नूतनशील ऊर्जेच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाने, मविनिआ (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० दि. ७ जून २०१० रोजी अधिसूचित केले आणि महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) या संस्थेचे राज्य अभिकरण म्हणून आयोगाने (स्वत: पारित केलेल्या) दि.१ जुलै २०१० च्या आदेशाने महाराष्ट्र राज्यातील नूतनशील ऊर्जा प्रकल्पांना मान्यता देण्यासाठी आणि नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र पध्दतीखाली त्यांची नोंदणी करण्यासाठी राष्ट्रीय भार प्रेषण केंद्राकडे शिफारस करण्याकरिता नियुक्ती केली.

भारतामध्ये,नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रासाठीच्या बाजारपेठेच्या सुरुवातीच्या काळात, आयोगाने नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन-नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीला चालना देण्यासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे, महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर राज्य ठरले असून नूतनशील ऊर्जा प्रकल्पांना मान्यता देणारे आणि राष्ट्रीय भार प्रेषण केंद्राकडे त्याची नोंदणी करणारे ते देशातील पहिले राज्य आहे. सुरुवातीच्या काळात नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची बाजारपेठ कितपत यशस्वी होऊ शकेल याबाबत साशंकता होती. परंतु, आता एक वर्षाच्या कालावधीतच या परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला असून नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची बाजारपेठ आता बिगर-सौर ऊर्जा प्रकल्प देखील स्वीकारण्याइतकी पुरेशी विकसित झाली आहे. कदाचित, येत्या दोन वर्षात सौर नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची मागणी देखील बाजारपेठेत वाढण्याची शक्यता आहे कारण १६.५६ मेगावॅट क्षमतेच्या सौर पीव्ही प्रकल्पांना यापूर्वीच मान्यता प्रमाणपत्र मिळाले आहे. भारतातील आणि महाराष्ट्र राज्यातील नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राच्या बाजारपेठेच्या खालील सद्यस्थितीकडे नजर टाकल्यास त्यामुळे नूतनशील ऊर्जा निमार्त्यांना काही प्रमाणात विश्वास निर्माण होऊ शकेल.

**दि. ३० मार्च २०१२ रोजीची नूतनशील ऊर्जा प्रकल्पाची स्थिती:**

| **मापदंड** | **भारत** | | **महाराष्ट्र** | |
|---|---|---|---|---|
| | **प्रकल्पांची संख्या** | **मेगावॅट मधील क्षमता** | **प्रकल्पांची संख्या** | **मेगावॅट मधील क्षमता** |
| एकूण मान्यताप्राप्त नूतनशील ऊर्जा निर्माते | ४५१ | २६३०.१६० | २२५ | ७१६.४१३ |
| एकूण नोंदणीकृत नूतनशील ऊर्जा निर्माते | ३६३ | २२८७.४३० | १७४ | ५४४.९४८ |
| एकूण दिलेली बिगर-सौर नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे | १०,५४,२४३ संख्या | | ३,४४,८३७ संख्या | |
| एकूण विकलेली बिगर-सौर नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे | १०,१५,६९८ संख्या | | ३,२७,०९४ संख्या | |
| शिल्लक बिगर- सौर नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे | ३८,५४५ संख्या | | १७,७४३ संख्या | |
| एकूण दिलेली सौर नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे | निरंक | | निरंक | |

**आज अखेर, भारतातील मान्यताप्राप्त आणि नोंदणीकृत नूतनशील ऊर्जा स्त्रोत -निहाय प्रकल्पांची माहिती**

| **स्त्रोत-निहाय** | **मान्यताप्राप्त नूतनशील ऊर्जा निर्माते** | | **नोंदणीकृत नूतनशील ऊर्जा निर्माते** | |
|---|---|---|---|---|
| | **क्षमता (मेगावॅट)** | **युनिट (संख्या)** | **क्षमता (मेगावॅट)** | **युनिट (संख्या)** |
| पवन | १२२८.५४ | ३१७ | १०६४.७३ | २५५ |
| सौर पीव्ही | १६.५६ | ४ | ० | ० |
| लघु-जल | १६६ | २० | १४८ | १७ |
| बायोमास | ५४६.९६ | ५३ | ४६७.३ | ४१ |
| बायो इंधन सहनिर्मिती | ६७०.४३ | ५६ | ६०५.७३ | ४९ |
| अन्य | १.६७ | १ | १.६७ | १ |
| एकूण | २६३०.१६ | ४५१ | २२८७.४३ | ३६३ |

नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची पध्दत यशस्वी होण्यासाठी नूतनशील ऊर्जा प्रकल्पामध्ये मोठया प्रमाणावर गुंतवणूक अभिप्रेत असून त्यामुळे नूतनशील ऊर्जा निर्मात्यांना प्रोत्साहन मिळते. तसेच, नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची पध्दत संबंध देशभर लागू असल्यामुळे, नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन असलेल्या व्यक्ती जेव्हा त्यांच्या राज्यात नूतनशील ऊर्जेचा तुटवडा असेल तेव्हा देखील ते त्यांच्या नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करु शकतील. नूतनशील ऊर्जेच्या राष्ट्रीय लक्ष्यांकांना अनुसरून राज्य आयोगाना नूतनशील ऊर्जा खरेदीची टक्केवारी त्यांच्या राज्याकरिता विहित करण्यास मदत होईल. सद्यस्थितीत, भारतामध्ये २५ राज्य आयोगांनी त्यांची अंतिम नूतनशील ऊर्जा खरेदी बंधन-नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रांबाबत विनियम तयार केले असून फक्त २ राज्य आयोगाचे हे विनियम तयार करण्याचे काम प्रारुप स्तरावर आहे. असे दिसून आले आहे की, राज्य आयोगाने नूतनशील ऊर्जेच्या विकासाला चालना देण्यासाठी केवळ आकर्षक वीज दर निश्चित केले नसून त्यांनी त्याकरिता, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (इ) नुसार आलेल्या जबाबदारीचे पालन करताना, कार्बन-मुक्त वातावरणाचे (सीडीएम) लाभ देणे, नूतनशील ऊर्जा खरेदी बंधन-नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची पध्दत सुरु करणे, या सारखे विविध उपाय देखील योजिले आहेत. मविनिआ ने महाराष्ट्रामध्ये हरित क्रांतीसाठी त्वरेने पुढाकार घेतल्यामुळे, राज्याने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता असलेल्या ६ टक्के नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकाची पूर्तता ५.७५ टक्के इतकी केली असून येथील एकत्रित नूतनशील ऊर्जेची स्थापित क्षमता ३६०८ मेगावॉट आहे. तसेच, संबंध देशभरात देण्यात आलेल्या एकूण नूतनशील ऊर्जाच्या प्रमाणपत्रापैकी केवळ महाराष्ट्र राज्यात ३२ टक्के नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

## परवाना मंजुरी

### वीज वितरण परवाना

### आर-इन्फ्राच्या विद्यमान परवाना क्षेत्राला लागून असलेल्या चेने आणि वर्सोवा सह मुंबईच्या उपनगर परिसराकरिता वितरण परवाना मंजूरीसाठी आर-इन्फ्रा-वितरणचा अर्ज (सन २०११ च्या प्रकरण क्र. ६५)

आयोगाने सन २०१० च्या प्रकरण क्र. ७८ मधील १ एप्रिल २०११ च्या आदेशाने असा निर्णय दिला होता की, आर-इन्फ्राने परवाना मंजूरीसाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ सह मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मधील आवश्यकतांची, विजेचे वितरण करण्यासाठी लागणाऱ्या परवान्याच्या मंजूरीसाठी अर्ज करताना, पूर्तता करण्याची गरज आहे. त्यानंतर आर-इन्फ्राने २००८ च्या विनियमांमध्ये नमूद केलेल्या (म्हणजेच भांडूप आणि मुलुंड वगळून) चेने आणि वर्सोवासह मुंबई उपनगर क्षेत्रामध्ये विजेचे वितरण करण्यासाठी परवाना मंजूर करण्याकरिता दि. २५-०४-२०११ रोजी अर्ज सादर केला.

सदर अर्ज विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ आणि १५ मधील तरतुदीच्या अंतर्गत आणि मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम,२००६ मधील तरतुदींना अनुसरुन, करण्यात आला.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२) मधील तरतुदींची पूर्तता करण्यासाठी, आर-इन्फ्राने १० मे २०११ रोजी त्यांच्या वितरण परवाना मंजूरीच्या अर्जासंबंधात जाहीर सूचना दोन (२) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात (टाईम्स् ऑफ इंडिया व हिंदुस्तान टाईम्स्) आणि दोन (२) मराठी दैनिक वर्तमानपत्रात (सामना व लोकसत्ता) या प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात खप असणाऱ्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द केली. आर-इन्फ्राने त्यांच्या अर्जावर सूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सूचना आणि / किंवा हरकती मागविल्या.

आर-इन्फ्राच्या वितरण परवाना मंजूर करण्यासाठीच्या अर्जासंबंधात, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२) (दोन) नुसार, आणि प्रस्तावित क्षेत्रामध्ये, जर संरक्षणाच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही कॅन्टोनमेंट, विमानतळ, किल्ला, दारुगोळा, डॉकयार्ड किंवा कॅम्प किंवा कोणतीही इमारत किंवा जागा यांचा संपूर्णपणे किंवा त्यांच्या काही भागाचा समावेश असल्यास केंद्र सरकारची त्यास कोणती हरकत असू शकेल का यासंबंधी आयोगाने केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयांकडून (संरक्षण मंत्रालय, नागरी वाहतूक मंत्रालय आणि जहाज बांधणी मंत्रालय) पत्रांनी माहिती मागविली. तथापि, आयोगाला सदर पत्रे पाठविल्याच्या दिनांकापासून या संदर्भात ३० दिवसांच्या आत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही.

आयोगाने परवाना मंजूरीकरिता आर-इन्फ्राची पात्रता खालील निकषांच्या आधारे निश्चित केली:

- पुरवठयासाठी किमान क्षेत्राची आवश्यकता (इ-१)
- पुरेशा भांडवलाची आवश्यकता (इ-२)
- पत-पात्रतेची आवश्यकता (इ-३)
- कामकाज संहितेची आवश्यकता (इ-४)
- स्वत:च्या नेटवर्क रोल-आऊट आराखडयाची आवश्यकता (इ-५)

पटलावर असलेली सर्व माहिती विचारात घेतल्यानंतर, केंद्र सरकारने, विद्युत वितरण परवाना (पुरेसे भांडवल, पत-पात्रता आणि कामकाज संहितेची अतिरिक्त आवश्यकता) नियम ,२००५ मध्ये विहित केलेल्या अतिरिक्त आवश्यकतांची, विद्युत अधिनियम, २००३ मध्ये विहित करण्यात आलेल्या अन्य अटी किंवा आवश्यकतांसह, आर-इन्फ्राने पूर्तता केली असल्याची, आयोगाची खात्री झाली.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ नुसार पात्रता निकषांची आर-इन्फ्राने पूर्तता केली असल्याची खात्री झाल्यावर, आयोगाने वितरण परवाना मंजूर करण्यासाठी आर-इन्फ्राने सादर केलेल्या अर्जाची गुणवत्तेवर छाननी केली. अर्जात सादर करण्यात आलेल्या विविध माहितीच्या आणि आर-इन्फ्राने वेळोवेळी पुरविलेल्या अन्य माहितीच्या आधारे, आयोगाने आर-इन्फ्राच्या अर्जाची, (१) वीज खरेदीचा आराखडा (एस-१) आणि (२) व्यवस्थापन व तांत्रिक विशेषज्ञता (एस-२), या संदर्भात छाननी केली.

पटलावरील माहिती विचारात घेतल्यानंतर आयोगाने नोंद घेतली की, प्रस्तावित पुरवठा क्षेत्राची विजेची गरज भागविण्याकरिता आर-इन्फ्रा बहुतांश वीज दिर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन वीज खरेदी करारांच्या द्वारे प्राप्त करुन घेणार आहे. तसेच आर-इन्फ्राला मागील ३ वर्षात

विजेच्या मुल्य-साखळीचा पुरेसा अनुभव प्राप्त झाला आहे आणि प्रगत तंत्रज्ञान स्वीकारतानाच आर-इन्फ्राने वितरण-व्यवसाय, व्यावसायिकरित्या चालविण्यासाठी भरपूर व्यवस्थापन आणि तांत्रिक विशेषज्ञता देखील प्राप्त केली आहे. त्यामुळे, आयोगाच्या मते आर-इन्फ्रा त्यांच्या प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात विजेचे वितरण करण्यासाठी वितरण परवाना मंजूर करण्याकरिता पात्र आणि सक्षम आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (५) ची पूर्तता करण्यासाठी, आयोगाने १५ जुलै २०११ रोजी दोन (२) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात (टाईम्स ऑफ इंडिया व डीएनए) आणि तीन (३) मराठी दैनिक वर्तमानपत्रात (लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स व सकाळ) मध्ये आर-इन्फ्राला प्रस्तावित पुरवठा क्षेत्रात वितरण परवाना मंजूर करण्याचे प्रस्तावित करण्यासाठी जाहीर सूचना प्रसिध्द केली. सदर जाहीर सूचना आयोगाच्या संकेत-स्थळावर देखील प्रकाशित करण्यात आली. या जाहीर सूचनेत सूचना / हरकती मागविण्यासाठी शनिवार, ९ जुलै २०११ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले होते.

पटलावरील सर्व माहिती विचारात घेतल्यानंतर आयोगाने ११ ऑगस्ट २०११ रोजी पारित केलेल्या आदेशात, आर-इन्फ्राला त्यांच्या प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण परवाना मंजूर करणे जनतेच्या हिताचे आहे असे मत व्यक्त करुन, विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम १४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, आर-इन्फ्राला प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्याकरिता १६ ऑगस्ट २०११ पासून २५ वर्षाच्या कालावधीकरिता वितरण परवाना मंजूर केला.

**आर-इन्फ्रा वितरणच्या मुंबई उपनगरातील वीज पुरवठयाच्या क्षेत्रात, विजचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवाना मंजूर करण्याकरिता इंडियाबुल्स पॉवर लि, यांचा अर्ज (सन २०११ च्या प्रकरण क्र.५)**

इंडियाबुल्स पॉवर लि, ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ सह कलम १५ आणि मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ च्या तरतुदींना अनुसरुन आर-इन्फ्रा -वितरणच्या पुरवठयाच्या क्षेत्रात वितरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज १७ जानेवारी २०११ रोजी (सन २०१० चे प्रकरण क्र. ५) दाखल केला.

इंडियाबुल्स पॉवर लि, ने १० मे २०११ रोजी त्यांच्या वितरण परवाना मंजूरीच्या अर्जासंबंधात, जाहीर सूचना दोन (२) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात (फायनान्शिअल एक्स्प्रेस व इंडियन एक्स्प्रेस) आणि दोन (२) मराठी दैनिक वर्तमानपत्रात (लोकमत व लोकसत्ता) मध्ये प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात खप असणाऱ्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द केली. इंडियाबूल्स् पॉवर लि. ने त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सूचना आणि किंवा हरकती मागविल्या. त्यानंतर दि. २० जुन,२०११ रोजी इंडियाबुल्स पॉवर लि.ने त्यांच्या अर्जातील प्रस्तावित क्षेत्रामध्ये चेने आणि वर्सोवा गावांचा समावेश केला. वरील जाहिर सूचनेला या संदर्भात २४ जुन, २०११ रोजी वर नमूद केलेल्या वर्तमानपत्रांमध्ये या संबंधी पुरवणी सूचना इंडियाबुल्स पॉवर लि.ने प्रसिध्द केली.

इंडियाबुल्स पॉवर लि, ने परवाना मंजूर करण्यासाठीच्या अर्जासंबंधात, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२) (दोन) नुसार, आणि प्रस्तावित क्षेत्रामध्ये, जर संरक्षणाच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही कॅन्टोनमेंट, विमानतळ, किल्ला, दा रुगोळा, डॉकयार्ड किंवा कॅम्प किंवा कोणतीही इमारत किंवा जागा यांचा संपूर्णपणे किंवा त्यांच्या काही भागाचा समावेश असल्यास केंद्र सरकारची त्यास कोणती हरकत असू शकेल का, यासंबंधी आयोगाने केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयांकडून (संरक्षण मंत्रालय, नागरी वाहतूक मंत्रालय आणि जहाज बांधणी मंत्रालय) पत्रांनी माहिती मागविली.

आयोगाने परवाना मंजुरीकरिता इंडियाबूल्स् पॉवर लि. ची पात्रता खालील निकषांच्या आधारे निश्चित केली:

- पुरवठयासाठी किमान क्षेत्राची आवश्यकता (इ-१)
- पुरेशा भांडवलाची आवश्यकता (इ-२)
- पत-पात्रतेची आवश्यकता (इ-३)
- कामकाज संहीतेची आवश्यकता (इ-४)
- स्वत:च्या नेटवर्क रोल-आऊट आराखडयाची आवश्यकता (इ-५)

पटलावर असलेली सर्व माहिती विचारात घेतल्यानंतर, केंद्र सरकारने, विद्युत वितरण परवाना (पुरेसे भांडवल, पत-पात्रता आणि कामकाज संहीतेची अतिरिक्त आवश्यकता) नियम, २००५ मध्ये विहित केलेल्या अतिरिक्त आवश्यकतांची, इंडियाबूल्स पॉवर लि. ने पूर्तता केली. तथापि, सदर इंडियाबुल्स पॉवर लि. ने प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात स्वत:ची वितरण यंत्रणा उभारण्यासंबंधी विद्युत अधिनियम, २००३ मध्ये विहित करण्यात आलेल्या अनिवार्य आवश्यकतेची पूर्तता केली नव्हती.

इंडियाबूल्स् पॉवर लि. चा अर्ज विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदींची तसेच परवाना मंजूरी संबंधातील अन्य बाबींची पूर्तता करित नसल्याचे आढळून आल्यामुळे, आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (६) च्या खंड (बी) नुसार, अर्ज नाकारण्यापूर्वी, आपली बाजू मांडण्याची संधी इंडियाबुल्स पॉवर लि. ला २ ऑगस्ट २०११ रोजी दिली.

इंडियाबूल्स् पॉवर लि. चा अर्ज तपासल्यानंतर, आयोगाने, इंडियाबुल्स पॉवर लि. चा अर्ज परवाना मंजूरीच्या संबंधातील बाबींची जसे- ज्या क्षेत्रात वीज पुरवठा करण्यासाठी वितरण परवान्याची मागणी करण्यात आली आहे त्या भागाच्या भौगोलिक क्षेत्राकरिता कृती आराखडा तयार करणे आणि त्या क्षेत्रात स्वत:चे वितरण जाळे उभारण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखणे, या बाबींची पूर्तता करित नसल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे, आयोगाने इंडियाबूल्स पॉवर लि. चा अर्ज ११ ऑगस्ट २०११ रोजीच्या आदेशाने नामंजूर केला.

**आर-इन्फ्राच्या पुरवठयाच्या क्षेत्रात वितरण परवाना मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.चा अर्ज (सन २०१० च्या प्रकरण क्र.६)**

महावितरण कंपनीने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ सह कलम १५ आणि मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ च्या तरतुदींना अनुसरुन आर-इन्फ्रा -वितरणच्या पुरवठयाच्या क्षेत्रात वितरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज, १७ जानेवारी २०११ रोजी (सन २०११ चे प्रकरण क्र. ६), दाखल केला.

महावितरण कंपनीने १० मे २०११ रोजी त्यांच्या वितरण परवाना मंजूरीच्या अर्जासंबंधात, जाहीर सूचना दोन (२) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात (बिझनेस स्डँण्डर्ड आणि इंडियन एक्स्प्रेस) आणि दोन (२) मराठी दैनिक वर्तमानपत्रात (सकाळ आणि नवाकाळ) मध्ये प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात खप असणाऱ्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द केली. महावितरण कंपनीने त्यांच्या अर्जावर सूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सूचना आणि / किंवा हरकती मागविल्या.

महावितरण कंपनीने परवाना मंजूर करण्यासाठीच्या अर्जासंबंधात, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२) (दोन) नुसार, आणि प्रस्तावित क्षेत्रामध्ये, जर संरक्षणाच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही कॅन्टोनमेंट, विमानतळ, किल्ला, दारुगोळा, डॉकयार्ड किंवा कॅम्प किंवा कोणतीही इमारत किंवा जागा यांचा संपूर्णपणे किंवा त्यांच्या काही भागाचा समावेश असल्यास केंद्र सरकारची त्यास कोणती हरकत असू शकेल का यासंबंधी आयोगाने केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयांकडून (संरक्षण मंत्रालय, नागरी वाहतूक मंत्रालय आणि जहाज बांधणी मंत्रालय) पत्रांनी माहिती मागविली.

आयोगाने परवाना मंजूरीकरिता महावितरण कंपनीची पात्रता खालील निकषांच्या आधारे निश्चित केली:

- पुरवठयासाठी किमान क्षेत्राची आवश्यकता (इ-१)
- पुरेशा भांडवलाची आवश्यकता (इ-२)
- पत-पात्रतेची आवश्यकता (इ-३)
- कामकाज संहीतेची आवश्यकता (इ-४)
- स्वतःच्या नेटवर्क रोल-आऊट आराखडयाची आवश्यकता (इ-५)

पटलावर असलेली सर्व माहिती विचारात घेतल्यानंतर, केंद्र सरकारने, विद्युत वितरण परवाना (पुरेसे भांडवल, पत-पात्रता आणि कामकाज संहीतेची अतिरिक्त आवश्यकता) नियम, २००५ मध्ये विहित केलेल्या अतिरिक्त आवश्यकतांची, महावितरण कंपनीने पूर्तता केलेली नाही. तसेच महावितरण कंपनीने प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात स्वतःची वितरण यंत्रणा उभारण्यासंबंधी विद्युत अधिनियम, २००३ मध्ये विहित करण्यात आलेल्या अनिवार्य आवश्यकतेची देखील पूर्तता केलेली नाही.

महावितरण कंपनीचा अर्ज विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदींची तसेच परवाना मंजूरी संबंधातील अन्य बाबींची पूर्तता करित नसल्याचे आढळून आल्यामुळे, आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (६) च्या खंड (बी) नुसार , अर्ज नाकारण्यापूर्वी , आपली बाजू मांडण्याची संधी महावितरण कंपनीला २ ऑगस्ट २०११ रोजी दिली.

आयोगाने आपले मत व्यक्त केले की, महावितरण कंपनीचा अर्ज परवाना मंजूर करण्यासंबंधी खालील आवश्यकतांची पूर्तता करित नसल्याचे आढळून आले आहे:-

- विद्युत वितरण परवाना (पुरेसे भांडवल, पत-पात्रता आणि कामकाज संहीतेची अतिरिक्त आवश्यकता) नियम, २००५ मधील नियम क्र.३ च्या स्पष्टीकरणाच्या संदर्भात किमान क्षेत्राच्या आवश्यकतेची पूर्तता करण्यात आलेली नाही.
- पुरेशा भांडवलासंबंधीच्या आवश्यकतेची पूर्तता महावितरण कंपनीने केलेली नाही.
- विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ मधील सहाव्या परंतुकानुसार, स्वतःची वितरण यंत्रणा असण्यासंबंधी, ज्या क्षेत्रात वीज पुरवठा करण्यासाठी वितरण परवान्याची मागणी करण्यात आली आहे त्या भागाच्या भौगोलिक क्षेत्राकरिता कृती आराखडा तयार करणे आणि त्या क्षेत्रात स्वतःचे वितरण जाळे उभारण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखणे, या आवश्यकतेची महावितरण कंपनीने पूर्तता केलेली नाही.
- अनन्य परवाना विद्युत अधिनियम, २००३ शी विसंगत आहे.

वरील बाबी विचारात घेऊन, आयोगाने महावितरण कंपनीचा अर्ज दि.११ ऑगस्ट २०११ च्या आदेशाने नामंजूर केला.

**आर-इन्फ्रा-वितरण क्षेत्राच्या दक्षिण भागात वितरण परवाना मंजूर करण्यासाठी टोरेन्ट पॉवर लि. यांचा अर्ज (सन २०१० च्या प्रकरण क्र. ७)**

टोरेन्ट पॉवर लि.ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ सह कलम १५ आणि मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ च्या तरतुदींना अनुसरुन आर-इन्फ्रा -वितरण क्षेत्राच्या दक्षिण भागात वितरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज १७ जानेवारी २०११ रोजी (सन २०११ चे प्रकरण क्र. ७) दाखल केला.

टोरेन्ट पॉवर लि.ने १० मे २०११ रोजी त्यांच्या वितरण परवाना मंजूरीच्या अर्जासंबंधात, जाहीर सूचना दोन (२) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात (फायनाशिलय एक्सप्रेस आणि बिझनेस स्डँण्ड) आणि दोन (२) मराठी दैनिक वर्तमानपत्रात (सकाळ आणि नवाकाळ) मध्ये प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात खप असणाऱ्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द केली. टोरेन्ट पॉवर लि.ने त्यांच्या अर्जावर सूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सूचना आणि / किंवा हरकती मागविल्या.

टोरेन्ट पॉवर लि.ने परवाना मंजूर करण्यासाठीच्या अर्जासंबंधात, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२) (दोन) नुसार, आणि प्रस्तावित क्षेत्रामध्ये, जर संरक्षणाच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही कॅन्टोनमेंट, विमानतळ, किल्ला, दारुगोळा, डॉकयार्ड किंवा कॅम्प किंवा कोणतीही इमारत किंवा जागा यांचा संपूर्णपणे किंवा त्यांच्या काही भागाचा समावेश असल्यास केंद्र सरकारची त्यास कोणती हरकत असू शकेल का यासंबंधी आयोगाने केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयांकडून (संरक्षण मंत्रालय, नागरी वाहतूक मंत्रालय आणि जहाज बांधणी मंत्रालय) पत्रांनी माहिती मागविली.

आयोगाने परवाना मंजूरीकरिता टोरेन्ट पॉवर लि. ची पात्रता खालील निकषांच्या आधारे निश्चित केली:

- पुरवठयासाठी किमान क्षेत्राची आवश्यकता (इ-१)
- पुरेशा भांडवलाची आवश्यकता (इ-२)
- पत-पात्रतेची आवश्यकता (इ-३)
- कामकाज संहीतेची आवश्यकता (इ-४)

- स्वत:च्या नेटवर्क रोल-आऊट आराखडयाची आवश्यकता (इ-५)

पटलावर असलेली सर्व माहिती विचारात घेतल्यानंतर, केंद्र सरकारने, विद्युत वितरण परवाना (पुरेसे भांडवल, पत-पात्रता आणि कामकाज संहीतेची अतिरिक्त आवश्यकता) नियम, २००५ मध्ये विहित केलेल्या अतिरिक्त आवश्यकतांची, टोरेन्ट पॉवर लि. ने पूर्तता केलेली नाही. तसेच, सदर टोरेन्ट पॉवर लि. ने प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात स्वत:ची वितरण यंत्रणा उभारण्यासंबंधी विद्युत अधिनियम, २००३ मध्ये विहित करण्यात आलेल्या अनिवार्य आवश्यकतेची पूर्तता केलेली नाही.

टोरेन्ट पॉवर लि.चा अर्ज विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदींची तसेच परवाना मंजूरी संबंधातील अन्य बाबींची पूर्तता करित नसल्याचे आढळून आल्यामुळे, आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (६) च्या खंड (बी) नुसार , अर्ज नाकारण्यापूर्वी , आपली बाजू मांडण्याची संधी टोरेन्ट पॉवर लि.ला २ ऑगस्ट २०११ रोजी दिली.

आयोगाने आपले मत व्यक्त केले की, टोरेन्ट पॉवर लि. चा अर्ज परवाना मंजूर करण्यासंबंधी खालील आवश्यकतांची पूर्तता करीत न ासल्याचे आढळून आले आहे:-

- विद्युत वितरण परवाना (पुरेसे भांडवल, पत-पात्रता आणि कामकाज संहीतेची अतिरिक्त आवश्यकता) नियम, २००५ मधील नियम क्र.३च्या स्पष्टीकरणाच्या संदर्भात किमान क्षेत्राच्या आवश्यकतेची पूर्तता करण्यात आलेली नाही.
- विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ मधील सहाव्या परंतुकानुसार, स्वत:ची वितरण यंत्रणा असण्यासंबंधी, ज्या क्षेत्रात वीज पुरवठा करण्यासाठी वितरण परवान्याची मागणी करण्यात आली आहे त्या भागाच्या भौगोलिक क्षेत्राकरिता कृती आराखडा तयार करणे आणि त्या क्षेत्रात स्वत:चे वितरण जाळे उभारण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखणे, तसेच "पुरवठयासाठी किमान क्षेत्राच्या" आवश्यकतेची टोरेन्ट पॉवर लि. ने पूर्तता केलेली नाही.
- अनन्य परवाना विद्युत अधिनियम, २००३ शी विसंगत आहे.

वरील बाबी विचारात घेऊन, आयोगाने टोरेन्ट पॉवर लि. चा अर्ज दि. ११ ऑगस्ट २०११च्या आदेशाने नामंजूर केला.

**महाराष्ट्र राज्यातील आर-इन्फ्रा वितरणच्या पुरवठयाच्या क्षेत्रात वितरण परवाना मंजूर करण्यासाठी लॅन्को इन्फ्राटेक लि. चा अर्ज (सन २०१० च्या प्रकरण क्र. ८)**

लॅन्को इन्फ्राटेक लि.ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ सह कलम १५ आणि मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ च्या तरतुदींना अनुसरुन आर-इन्फ्रा -वितरणच्या पुरवठयाच्या क्षेत्रात वितरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज २८ जानेवारी २०११ रोजी (सन २०११ चे प्रकरण क्र. ८) दाखल केला.

लॅन्को इन्फ्राटेक लि.ने १० मे २०११ रोजी त्यांच्या वितरण परवाना मंजूरीच्या अर्जासंबंधात, जाहीर सूचना दोन (२) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात (टाईम्स् ऑफ इंडिया आणि इंडियन एक्सप्रेस) आणि दोन (२) मराठी दैनिक वर्तमानपत्रात (लोकमत आणि महाराष्ट्र टाईम्स्) मध्ये प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात खप असणाऱ्या वर्तमानपत्रांत प्रसिध्द केली. लॅन्को इन्फ्राटेक लि. ने त्यांच्या अर्जावर सूचनेच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत सूचना आणि / किंवा हरकती मागविल्या. त्यानंतर लॅन्को इन्फ्राटेक लि.ने त्यांच्या अर्जातील पुरवठयाच्या क्षेत्रात चेने आणि वर्सोवा गावांचा समावेश केला असल्याबाबत वरील जाहीर सूचनेच्या संदर्भात ४ जून, २०११ रोजी वर नमूद केलेल्या वर्तमानपत्रांमध्ये या संबंधी पुरवणी सूचना लॅन्को इन्फ्राटेक लि.ने प्रसिध्द केली.

लॅन्को इन्फ्राटेक लि.ने परवाना मंजूर करण्यासाठीच्या अर्जासंबंधात, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२) (दोन) नुसार, आणि प्रस्तावित क्षेत्रामध्ये, जर संरक्षणाच्या प्रयोजनासाठी केंद्र सरकारच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही कॅन्टोनमेंट, विमानतळ, किल्ला, दारुगोळा, डॉकयार्ड किंवा कॅम्प किंवा कोणतीही इमारत किंवा जागा यांचा संपूर्णपणे किंवा त्यांच्या काही भागाचा समावेश असल्यास केंद्र सरकारची त्यास कोणती हरकत असू शकेल का यासंबंधी आयोगाने केंद्र सरकारच्या संबंधित मंत्रालयांकडून (संरक्षण मंत्रालय, नागरी वाहतूक मंत्रालय आणि जहाज बांधणी मंत्रालय) पत्रांनी माहिती मागविली.

आयोगाने परवाना मंजूरीकरिता लॅन्को इन्फ्राटेक लि. ची पात्रता खालील निकषांच्या आधारे निश्चित केली:

- पुरवठयासाठी किमान क्षेत्राची आवश्यकता (इ-१)
- पुरेशा भांडवलाची आवश्यकता (इ-२)
- पत-पात्रतेची आवश्यकता (इ-३)
- कामकाज संहितेची आवश्यकता (इ-४)
- स्वत:च्या नेटवर्क रोल-आऊट आराखडयाची आवश्यकता (इ-५)

पटलावर असलेली सर्व माहिती विचारात घेतल्यानंतर, केंद्र सरकारने, विद्युत वितरण परवाना (पुरेसे भांडवल, पत-पात्रता आणि कामकाज संहितेची अतिरिक्त आवश्यकता) नियम,२००५ मध्ये विहित केलेल्या अतिरिक्त आवश्यकतांची, लॅनको इन्फ्राटेक लि. ने पूर्तता केली आहे. तथापि, सदर लॅन्को इन्फ्राटेक लि. ने प्रस्तावित पुरवठयाच्या क्षेत्रात स्वत:ची वितरण यंत्रणा उभारण्यासंबंधी विद्युत अधिनियम, २००३ मध्ये विहित करण्यात आलेल्या अनिवार्य आवश्यकतेची पूर्तता केलेली नाही.

लॅन्को इन्फ्राटेक लि.चा अर्ज विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदींची तसेच परवाना मंजूरी संबंधातील अन्य बाबींची पूर्तता करीत नसल्याचे आढळून आल्यामुळे, आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (६) च्या खंड (बी) नुसार, अर्ज नाकारण्यापूर्वी, आपली बाजू मांडण्याची संधी लॅन्को इन्फ्राटेक लि.ला २ ऑगस्ट २०११ रोजी दिली.

लॅन्को इन्फ्राटेक लि. चा अर्ज तपासल्यानंतर, आयोगाने, लॅन्को इन्फ्राटेक लि. चा अर्ज परवाना मंजूरीच्या संबंधातील बाबींची जसे- ज्या क्षेत्रात वीज पुरवठा करण्यासाठी वितरण परवान्याची मागणी करण्यात आली आहे त्या भागाच्या भौगोलिक क्षेत्राकरिता कृती आराखडा तयार करणे आणि त्या क्षेत्रात स्वत:चे वितरण जाळे उभारण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखणे, या बाबींची पूर्तता करीत नसल्याचे मत व्यक्त केले. त्यामुळे, आयोगाने लॅन्को इन्फ्राटेक लि. चा अर्ज ११ ऑगस्ट २०११ रोजीच्या आदेशाने नामंजूर केला.

**वीज व्यापार परवाना**

**मे.एनटीएस पॉवरचा वीज व्यापार परवान्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ नुसार अर्ज (सन २०१० चे प्रकरण क्र. ३५)**

मे. एनटीएस पॉवरने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ च्या विनियम ५.४ नुसार 'वर्ग अ' मध्ये महाराष्ट्र राज्यात पहिल्या वर्षी २० दशलक्ष युनिट्स आणि पाच वर्षांदरम्यान हळूहळू १०० दशलक्ष युनिट्सहून अधिक विजेचा व्यापार करण्यासाठी अर्ज सादर केला. या प्रकरणी आयोगाने ४ जानेवारी, २०१० रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली आणि ४ मे, २०११ रोजीच्या आदेशाच्या द्वारे एनटीएस पॉवरला वीज व्यापार परवाना क्र. सन २०११ चा १ मंजूर केला. आयोगाने असे मत व्यक्त केले की, मे. एनटीएस पॉवरने तांत्रिक, वाणिज्यिक आणि वित्तीय आवश्यकता पूर्ण केल्या असल्यामुळे विजेचा व्यापार परवाना मिळविण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी), विनियम, २००४ नुसार पात्र ठरत आहे.

**ट्वेन्टी फर्स्ट सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि. ची वीज व्यापार परवान्याच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ नुसार याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. ८०)**

मे. ट्वेन्टी फर्स्ट सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि.ने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ च्या विनियम ५.४ नुसार घ्वर्ग अङ मध्ये महाराष्ट्र राज्यात पहिल्या वर्षी ८० दशलक्ष युनिट्स आणि पाच वर्षांदरम्यान १०० दशलक्ष युनिट्सहून अधिक विजेचा व्यापार करण्यासाठी अर्ज सादर केला. या प्रकरणी आयोगाने १७ नोव्हेंबर, २०११ रोजी जाहिर सुनावणी आयोजित केली आणि १५ डिसेंबर, २०११ रोजीच्या आदेशा द्वारे ट्वेन्टी फर्स्ट सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि.ला वीज व्यापार परवाना क्र. सन २०११ चा ३ मंजूर केला. आयोगाने असे मत व्यक्त केले की, ट्वेन्टी फर्स्ट सेन्चुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि. ने तांत्रिक, वाणिज्यिक आणि वित्तीय आवश्यकता पूर्ण केल्या असल्यामुळे विजेचा व्यापार परवाना मिळविण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज व्यापार परवाना अटी), विनियम, २००४ नुसार पात्र ठरत आहे.

**वीज पारेषण परवाना**

**मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडची अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडच्या पारेषण परवान्याच्या सुधारणेसाठी, २००६ मध्ये सुधारित झालेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ च्या विनियम ७ अंतर्गत याचिका. (सन २०१० चे प्रकरण क्र. ६२)**

वीजनिर्मितीच्या विकासामध्ये गुंतलेल्या आणि महाराष्ट्रातील तिरोडा येथील कोळशावर आधारित औष्णिक वीज प्रकल्पाची क्षमता ३ X ६६० मेगावॅट पासून ५ X ६६० मेगावॅट पर्यंत वाढविण्याची योजना आखलेल्या मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडची उपकंपनी असलेल्या मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडने २००६ मध्ये सुधारित झालेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ च्या विनियम ७ अंतर्गत अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडच्या पारेषण परवान्याच्या (२००९ चा परवाना क्र.२) सुधारणेसाठी अर्ज दाखल केला. राज्य पारेषण कंपनीने देखील सल्ला दिला की, मे. महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड ट्रान्समिशन कंपनी लि. ने तिरोडा - कोराडी येथे ७६५ केव्ही पारेषण वाहिनीच्या विकासासाठी अर्ज सादर केला असल्याने तिरोडा आणि कोराडी येथे प्रत्येकी दोन ४०० केव्ही बेजसह ४०० केव्ही डी/सी तिरोडा - कोराडी - २ पारेषण वाहिन्यांची यापुढे गरज राहणार नाही. या प्रकरणी आयोगाने ३ मार्च, २०११ रोजी जाहिर सुनावणी घेतली आणि ३० मार्च, २०११ रोजी आदेश पारित करुन मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडचा पारेषण परवाना क्र. २००९ चा २ मध्ये सुधारणा केली. आयोगाने असे मत व्यक्त केले की, मे. अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेडने पारेषण परवाना क्र. २००९ चा २ मध्ये मर्यादित सुधारणा करावी आणि परवाना क्र. २००९ च्या २ मधून खाली बाबीं वगळण्यात याव्यात.

- तिरोडा (गोंदिया) ते प्रस्तावित ४०० केव्ही कोराडी - २ उपकेंद्रापर्यंतची क्वॉड कण्डक्टर सह ४०० केव्ही डबल सर्किट पारेषण वाहिनी
- तिरोडा उपकेंद्र येथे तिरोडा-कोराडी - २ डबल सर्किट पारेषण वाहिनीसाठी दोन ४०० केव्ही बेज
- कोराडी - २ उपकेंद्र येथे तिरोडा-कोराडी - २ डबल सर्किट पारेषण वाहिनीसाठी दोन ४०० केव्ही बेज

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडची पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ सह कलम १५ च्या तरतुदी अंतर्गत याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. ७०)**

मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी पारेषण परवान्याच्या मंजुरीकरिता, २००६ मध्ये सुधारित झालेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार अर्ज सादर केला. अर्जामध्ये पारेषण क्षेत्रासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ च्या अनुसूची २ मध्ये जोडलेल्या परवाना अर्जातील भाग २ : सर्वसाधारण अटी आणि शर्तींचा उल्लेख केलेला होता. आयोगाने या प्रकरणी तांत्रिक वैधता बैठक दि. २६ मे, २०११ रोजी घेतली आणि २७ जुलै, २०११ रोजी जाहिर सुनावणी आयोजित केली आणि ११ ऑगस्ट, २०११ रोजी आदेश पारित करुन मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड ला पारेषण परवाना क्र.२०११ चा १ मंजूर केला. आयोगाने असे मत व्यक्त केले की, मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने तांत्रिक, वाणिज्यिक आणि वित्तीय आवश्यकता पूर्ण केल्या असून विनिर्दिष्ट केलेल्या पारेषण वाहिन्यांसाठी पारेषण करण्याकरिता पारेषण परवाना मिळविण्यासाठी, २००६ मध्ये सुधारित झालेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार पात्र ठरत आहे.

**मे.नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टीमस् प्रा.लि. यांची मविनिआ (वीज व्यापार परवानासाठी) विनियम, २००४ अंतर्गत वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज (सन २०१० च्या प्रकरण क्र. ६१)**

मे.नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टीमस् प्रा.लि. यांनी महाराष्ट्र राज्यात दर वर्षी १००० दशलक्ष युनिटस्चा पुढील पाच वर्षात व्यापार करण्याकरिता राज्यांतर्गत वीज व्यापार परवाना मंजूर करण्यासाठी ०८ सप्टेंबर २०१० रोजी अर्ज सादर केला.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२) सह मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ च्या विनियम ७ मधील तरतुदींना अनुसरुन, अर्जदाराने त्याच्या परवानासाठीच्या अर्जावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी दोन (२) इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रात (बिझनेस स्टॅण्डर्ड आणि फ्री प्रेस जर्नल) आणि दोन (२) मराठी दैनिक वर्तमानपत्रात (नवशक्ती आणि नवाकाळ) मध्ये ११ डिसेंबर, २०१० रोजी जाहीर सूचना प्रसिध्द केली.

अर्जदार परवाना मंजूर करण्यासाठी पात्र असल्याची सकृत्दर्शनी खात्री झाल्यावर, आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) नुसार अर्जदाराला वीज व्यापार परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावाबाबत सूचना आणि हरकती जनतेकडून मागविण्यासाठी दि. १२ जून २०११ रोजी आयोगाने जाहीर सूचना प्रसिध्द केली.

या प्रकरणी २८ जूलै २०११ रोजी जाहीर सूनावणी घेण्यात आली. आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ५२ मधील तरतुदींना अनुसरुन अर्जदारांने तांत्रिक आवश्यकतांची आणि पुरेशा भांडवला संदर्भात तसेच मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ मधील तरतुदींच्या संदर्भात अर्जदाराच्या पात्रतेचे सविस्तर विश्लेषण केले आणि आयोगास आढळून आले की, अर्जदार राज्यांतर्गत वीज व्यापार सुरु करण्यासाठी परवाना मंजूरीकरिता तांत्रिक, वाणिज्यिक आणि आर्थिक आवश्यकतांची पूर्तता करीत आहे.

त्यानुसार आयोगाने आपल्या २ सप्टेंबर २०११ च्या आदेशाने मे.नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टीमस् प्रा.लि.ला, महाराष्ट्र राज्यात २५ वर्षे दर वर्षी १००० दशलक्ष युनिटस्च्या वर राज्यांतर्गत विजेचा व्यापार करण्यासाठी वीज व्यापार परवाना (वर्गवारी-एफ) मंजूर केला.

## वीज खरेदी

**मार्ग -१ ने स्पर्धात्मक बोली प्रक्रियेवर आधारित वीज दराच्या माध्यमातून दिर्घ-कालीन तत्त्वावर ६०० मेगावॉट (± १० टक्के) बेस लोड वीज खरेदी करण्यासाठी वीज मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रमाण बोली दस्तावेजांशी प्रस्तावासाठीच्या विनंतीमध्ये आणि वीज खरेदी करारामध्ये घेतलेल्या तफावतींना मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र.८८ )**

मार्ग- १ ने स्पर्धात्मक बोली प्रक्रियेवर आधारित वीज दराच्या माध्यमातून दिर्घ-कालीन तत्वावर ६०० मेगावॉट (± १० टक्के) बेस लोड वीज खरेदी करण्यासाठी वीज मंत्रालयाने निर्गमित केलेल्या प्रमाण बोली दस्तावेजांशी प्रस्तावासाठीच्या विनंतीमध्ये आणि वीज खरेदी करारामध्ये घेतलेल्या तफावतींना मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीने याचिका सादर केली.

महावितरण कंपनीने मार्ग १ खाली आणि प्रमाण बोली दस्तावेजांपासून काही फारकती घेऊन सुधारित बोली दस्तावेज प्रस्तावाच्या विनंतीसाठी आणि प्रारुप वीज खरेदी कराराकरिता सादर केले.

आयोगाने प्रस्तावाच्या विनंतीमध्ये केलेल्या तफावतींना मंजूरी दिली. प्रस्तावाच्या विनंती मध्ये करण्यात आलेल्या तफावती आणि वीज खरेदी करारातील तफावती या मार्ग- १ च्या प्रमाण बोली दस्तावेजाशी अनुरूप करण्यासाठी आणि कोळसा मंत्रालयाच्या कोळसा ब्लॉक वाटपाच्या पत्रातील बदलांना अनुरूप करण्यासाठी आवश्यक होत्या.

**महावितरण कंपनीची १२५ मेगावॉट वीज दीर्घ-कालीन तत्त्वावर खरेदी करण्यासाठी मे.अदानी पॉवर महाराष्ट्र लि. (एपीएमएल) यांच्याशी केलेल्या वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी आणि वीज दर स्वीकारण्यासाठी याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र. ५६)**

महावितरण कंपनीने १२५ मेगावॉट वीज दिर्घ-कालीन तत्त्वावर खरेदी करण्यासाठी मे.अदानी पॉवर महाराष्ट्र लि. (एपीएमएल) यांच्याशी केलेल्या वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी आणि वीज दर स्वीकारण्यासाठी याचिका सादर केली. याचिकेमध्ये महावितरण कंपनीने सादर केले की त्यांनी २२ जून २०१० रोजी (सन २०१० चे प्रकरण क्र. २२) मार्ग-२ च्या टप्पा दोन अंतर्गत २००० मेगावॉट (-२०%+३०%) वीज खरेदी करण्यासाठी बोली प्रक्रियेच्या माध्यमातून ठरविलेला वीज दर स्वीकारण्यासाठी याचिका सादर केली. मे. एपीएमएल ने ७ ऑगस्ट २००९ रोजी दिलेल्या देकारामधील अटी व शर्तीच्यां आधारे वाटाघाटी करुन ठरविलेल्या रु. ३.२८ प्रति युनिट या लेव्हलाइज्ड वीज दराने अतिरिक्त १२५ मेगावॉट वीज पुरवठा करण्यासाठी २ जानेवारी २०१० च्या पत्राने देकार कळविला. महावितरणने सन २०१४-१५ आणि २०१५-१६ करिता कमाल मागणीकरिता वीज दराच्या मागणी-पुरवठयामध्ये अनुक्रमे ८ टक्के आणि १० टक्के वाढ धरुन अंदाज तयार केले. त्यामुळे, १२२२ मेगावॉट आणि १८० मेगावॉट अनुक्रमे शिल्लक दाखविण्यात आली. महावितरण मंडळाने त्यांच्या मंडळ ठराव क्र. १०१८ दि. ५ जानेवारी २०१० ने मे.एपीएमएल कडून अतिरिक्त १२५ मेगावॉट वीज खरेदी करण्यास मंजूरी दिली आणि या संबंधीचा प्रस्ताव मंजूरीसाठी महाराष्ट्र शासनाकडे १२ जानेवारी २०१० रोजी सादर केला. महाराष्ट्र शासनाने, मंत्रीमंडळाच्या ऊर्जा उप-समितीच्या ६ मे २०१० रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्णयानुसार २४ मे २०१० रोजी मे. एपीएमएल कडून अतिरिक्त १२५ मेगावॉट वीज खरेदी

रु. ३.२८ प्रति युनिट या लेव्हलाइज्ड वीज दराने मे. एपीएमएल ने ७ ऑगस्ट २००९ रोजी कळविलेल्या अटी व शर्तीवर, आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून, करण्यास परवानगी दिली. त्यानंतर महावितरणने यापूर्वी मंजूरी देण्यात आलेल्या सन २००९ च्या प्रकरण क्र. २८ मधील २६०० मेगावॉट विजेशिवाय, मार्ग-१ च्या टप्पा २ अंतर्गत अतिरिक्त १२५ मेगावॉट वीज खरेदी करण्यासाठी मान्यता मागितली.

आयोगाचे असे मत झाले की, कर्नाटक आणि राजस्थान राज्यांमध्ये मार्ग- १च्या बोली प्रक्रियेद्वारे दीर्घ-कालीन वीज खरेदीकरिता ठरविण्यात आलेला लेव्हलाइज्ड दर हा महावितरणने मार्ग-१ च्या टप्पा-२ अंतर्गत दिर्घ-कालीन वीज खरेदीसाठी ठरविण्यात आलेल्या रु.३.२८ प्रति युनिट या वीज दरापेक्षा जास्त आहे.

आयोगाने निर्णय दिला की, वीज खरेदी करावयाचे परिमाण कमी असल्यामुळे स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून १२५ मेगावॉट खरेदीसाठी नवीन प्रक्रिया सुरु करणे योग्य होणार नाही. त्यामुळे, आयोगाने, एक विशेष बाब म्हणून, मे अदानी पॉवर महाराष्ट्र लि. यांच्याकडून अतिरिक्त १२५ मेगावॉट विजेची खरेदी रु.३.२८ प्रति युनिट या लेव्हलाइज्ड वीज दराने करण्यास व हा वीज दर स्वीकरण्यास मंजूरी दिली. ही खरेदी मे अदानी पॉवर महाराष्ट्र लि. यांच्याशी यापूर्वी मार्ग-१

च्या टप्पा २ अंतर्गत करण्यात आलेल्या वीज खरेदी करारातील त्याच अटी व शर्तीवर करावयाची होती.

**मे.आर-इन्फ्रा-वितरणने ३० जूलै २००९ रोजी मध्यम-कालीन वीज खरेदीसाठी पाठविलेल्या विनंतीच्या प्रस्तावाच्या संदर्भात सुरु केलेल्या मार्ग-१ च्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे ठरविलेल्या वीज दरानुसार, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३,८६(१) (बी) आणि कलम ८६ (१) (एफ) अंतर्गत, २६० मेगावॅट वीज खरेदीसाठीचा वीज दर स्वीकरण्याबाबत आणि ४ जून, २०१० चा वीज खरेदी करार मंजूर करण्याबाबत आणि वितरण परवानाधारकाने वीज दर कायदेशीरपणे स्वीकारण्याची विनंती मुद्दाम व हेतुपुरस्सर न करणे आणि वीज खरेदी करारास मुद्दाम व हेतुपुरस्सर मंजूरी न घेणे यामुळे निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वाद, याबाबत मे.वर्धा पॉवर कंपनी लि.,यांची याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र.११)**

याचिकाकर्त्याची मार्ग-१ च्या बोली प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर, याचिकाकर्त्याने, १ एप्रिल २०११ पासून सुरु होणाऱ्या तीन वर्षांकरिता २६० मेगावॅट वीज पुरवठा करण्यासाठी वीज दर स्वीकारण्यासाठी आणि याचिकाकर्ता व प्रतिवादी यांच्यात झालेल्या ४ जून २०१० च्या वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी, याचिका सादर केली. मे. वर्धा पॉवर कंपनी लि.,ने १ एप्रिल २०११ ते मार्च २०१४ या कालावधीत मध्यम-कालीन तत्त्वावर (तीन वर्षाकरिता) २६० मेगावॅट वीज रु.४.८५ प्रति युनिट या लेव्हलाइज्ड दराने पुरविण्यासाठी देकार कळविला आणि आर-इन्फ्राने हा वीज खरेदी करार खालील कारणास्तव रद्द करण्याची परवानगी मागितली:-

एक) वीज खरेदी कराराच्या कलम ३.१.१ नुसार याचिकाकर्त्याने इंधन पुरवठा करार केला नाही.

दोन) याचिकाकर्त्याने प्रारुप कसूर एस्क्रो करारात केलेल्या तफावती आणि तारण करारला आयोगाची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तीन) प्रतिवादीच्या वितरण परवाना क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्यासाठी आयोगाची स्वारस्य अभिव्यक्ति.

आयोगाने निर्णय दिला की, मे. वर्धा पॉवर कंपनी लि., व आर-इन्फ्रा आणि एएमएनपीइएल आणि आर-इन्फ्रा यांच्यात करण्यात आलेले वीज खरेदी करार हे भारत सरकारच्या मार्गदर्शक सूत्रानुसार स्पर्धात्मक बोलीच्या आधारे करण्यात आले आहेत. अंतिम सुनावणीनंतर बोली प्रक्रिया रद्द करण्यात आली नसेल तर स्पर्धात्मक बोली प्रक्रिया वैध असल्याबाबत गृहीत धरणे आवश्यक आहे आणि त्यामुळे, अंतरिम टप्प्यावर वीज खरेदी करार रद्द केल्यास स्पर्धात्मक बोली प्रक्रियेत बाधा येईल आणि हे न्यायाला धरुन होणार नाही व ते इष्टही नसेल. त्यामुळे आयोगाने, आर-इन्फ्राने, मे.वर्धा पॉवर कंपनी लि.,ला ज्या ७ मार्च २०११ च्या पत्राने करार रद्द केल्याचे कळविले होते त्या पत्रास, एक अंतरिम उपाय म्हणून, स्थगिती दिली.

**अंतिम आदेश**

आयोगाने आपल्या अंतिम आदेशात निर्णय दिला की, स्पर्धात्मक बोलीच्या द्वारे ठरविण्यात आलेल्या वीज दराने विजेचा पुरवठा करण्यासाठी पाठविण्यात आलेला विनंतीचा प्रस्ताव हा भारत सरकारने वितरण परवानाधारकाने वीज खरेदीकरिता बोली प्रक्रियेद्वारे वीज दर निश्चित करण्यासाठी अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक सूत्रांना अनुसरुन आहे. या विनंतीच्या प्रस्तावाची तपासणी स्पर्धात्मक बोलीची विश्वासार्हता आणि ग्राहक / जनतेचे हित या दोन निकषांवर केली असता, प्रतिवादीने वीज खरेदी करार रद्द करण्यासाठी ७ मार्च २०११ रोजी पाठविलेले पत्र वैध ठरत नाही आणि त्यामुळे, ते रद्द करणे आवश्यक आहे आणि त्यानुसार ते याद्वारे रद्द करण्यात येत आहे. आयोगाने प्रतिवादीला आणखी असे निर्देश दिले की, त्यांनी १० मे २०१० चे इरादा पत्र आणि ४ जून २०१० च्या वीज खरेदी कराराची अंमलबजावणी करावी आणि त्यांनी कोणत्याही अन्य संस्थांकडून ४ जून २०१० च्या याचिकाकर्त्याबरोबर केलेल्या वीज खरेदी करारात नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत, (अल्प-कालीन, मध्यम-कालीन किंवा दिर्घ-कालीन) वीज खरेदी करु नये.

आयोगाने प्रतिवादी आर-इन्फ्राला असेही निर्देश दिले की, त्यांनी भारत सरकारच्या वीज मंत्रालयाने स्पर्धात्मक बोली प्रक्रियेसाठी ठरविलेल्या मार्गदर्शक सूत्रांनुसार पारदर्शक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून ठरविलेला वीज दर स्वीकारण्यासाठी आवश्यक त्या दस्तावेज, माहिती आणि तपशीलासह विद्युत अधिनियम, २००३ च्या कमल ६३ खाली योग्य याचिका / अर्ज करावा आणि ४ जून २०१० चा वीज खरेदी करार पटलावर घेण्यासाठीही अर्ज करावा.

**आर-इन्फ्रा-वितरण आणि विदर्भ इंडस्ट्रीज् पॉवर लि., यांच्यात वीज खरेदी करारासाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेद्वारे ठरविलेला वीज दर स्वीकरण्यासाठी आर-इन्फ्रा-वितरणची याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. १२)**

आर-इन्फ्रा-वितरण आणि विदर्भ इंडस्ट्रीज् पॉवर लि., यांच्यात १३४ मेगावॅट विजेचा पुरवठा १ एप्रिल २०१३ पासून पुढील २ वर्षाच्या कालावधीकरिता रु. ४.८० प्रति युनिट या दराने करण्यासाठी केलेल्या वीज खरेदी करारासाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेद्वारे ठरविलेला वीज दर स्वीकरण्यासाठी आर-इन्फ्रा-वितरणने २८ जानेवारी २०११ रोजी प्रतिज्ञा-पत्राद्वारे याचिका दाखल केली.

मूळ वीज खरेदी करार हा स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे ठरविलेल्या रु. ४.८० प्रति युनिट या लेव्हलाइज्ड वीज दराने १३४ मेगावॅट वीज पुरवठा करण्यासाठी होता. तथापि, २१ जानेवारी २०११ च्या पुरवणीद्वारे आर-इन्फ्राने खरेदीचे परिमाण ४०४ मेगावॅट इतके रु. ४.२४ प्रति युनिट या लेव्हलाइज्ड वीज दराने करण्याची सुधारणा केली.

आयोगाने, विदर्भ इंडस्ट्रीज् पॉवर लि., यांच्या प्रकल्पाच्या युनिटस्ची प्रगती विचारात घेऊन असे मत व्यक्त केले की, एप्रिल २०१२ पासून विजेची उपलब्धता होण्याची शक्यता नाही. तथापि, विजेचे परिमाण आणि दर इ. बाबी या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित करण्यात आलेल्या असल्यामुळे आणि वीज खरेदी करार हा मार्च २०१४ पर्यंतच्या मध्यम-कालावधीसाठी असल्यामुळे, आयोगाने विदर्भ इंडस्ट्रीज् पॉवर लि., ने आर-इन्फ्राला १६ जून २०१० रोजी करण्यात आलेल्या वीज खरेदी करारात नमूद केल्याप्रमाणे १३४ मेगावॅट विजेचा पुरवठा,

वाटाघाटी करुन ठरविलेल्या रु.४.२४ प्रति युनिट या दराने, करण्यास मान्यता दिली.

**मार्ग-१ च्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे ठरविलेल्या वीज दरानुसार विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३,८६(१) (बी) अंतर्गत ५५ मेगावॉट वीज खरेदीसाठीचा वीज दर स्वीकरण्याबाबत आणि ४ ऑगस्ट २०१० च्या वीज खरेदी करार मंजूर करण्याबाबत आणि आर-इन्फ्रा-वितरणने वीज खरेदी करारारातील अटी व शर्तींचे मुद्दाम व हेतुपुरस्सर पालन न केल्यामुळे निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वाद, याबाबत मे.अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा.लि. (एएमएनइपीएल) ,यांची याचिका (अंतरिम आदेश- सन २०१० चे प्रकरण क्र.४२)**

एएमएनइपीएल यांनी सादर केलेल्या याचिकेत असे नमूद केले की, ते आर-इन्फ्रा लि., वितरण व्यवसायाला ठरलेल्या दिनांकापासून म्हणजेच १ एप्रिल २०११ पासून एकूण करारबध्द केलेल्या ५५ मेगावॉट क्षमतेपर्यंत विजेचा पुरवठा सुरु करण्यास, ४ ऑगस्ट २०१० च्या वीज खरेदी करारातील अटींना अधीन राहून, तयार आहेत.

एएमएनइपीएल ने सादर केले की, ते २४६ मेगावॉट क्षमतेचे (४*६१.५ मेगावॉट) कोळशावर चालणारे निर्मिती केंद्र उभारणार आहेत. एएमएनइपीएल ने यापूर्वीच ६१.५ मेगावॉटची तीन युनिटस् सुरु केली असून चौथे संच या वर्षाच्या एप्रिलमधील दुसऱ्या आठवडयात सुरु होण्याची शक्यता आहे आणि त्यापैकी फक्त १ संचाने वाणिज्यिकरित्या कामकाज ६ जानेवारी २०११ रोजी सुरु केले आहे आणि ते सध्या महावितरण कंपनीला सकाळी ६.०० ते संध्याकाळी ६.०० पर्यंतच्या कालावधीत ५४ मेगावॉट विजेचा पुरवठा ३० जून २०११ पर्यंत करीत आहेत.

आयोगाने आपल्या अंतरिम आदेशात एएमएनइपीएल सध्या त्यांच्या संच १ मधून महावितरण कंपनीला ५४ मेगावॉट वीज पुरवित आहे आणि त्यांच्या अन्य संचांनी वाणिज्यिकरित्या कामकाजास सुरुवात केलेली नाही, याची नोंद घेतली. एएमएनइपीएल सध्या आर-इन्फ्रा-वितरणला वीज खरेदी करारानुसार विजेचा पुरवठा करण्याच्या स्थितीत नाही. तथापि, वीज खरेदी करार हा तीन (३) वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात आलेला असल्यामुळे, त्याची कायदेशीर वैधता ही, या प्रकरणातील कार्यवाहीच्या निष्कर्षांच्या आणि ते अंतिमत: निकाली काढण्याच्या अधीन राहून असल्यामुळे, आयोगाने आर-इन्फ्राला निर्देश दिले की, या प्रकरणातील कार्यवाहीचे अंतिम निष्कर्ष उपलब्ध होईपर्यंत, आर-इन्फ्रा-वितरण ४ ऑगस्ट २०१० चा वीज खरेदी करार संपुष्टात आणणार नाही आणि आयोगाच्या पुढील आदेशापर्यंत जैसे थे परिस्थिती कायम ठेवेल.

## अंतिम आदेश

एएमएनइपीएल ने सादर केले की, ही याचिका सादर करण्याच्या वेळी त्यांच्या पहिल्या संचाने वाणिज्यिकरित्या कामकाजास सुरुवात केली होती आणि त्याच संचातून महावितरण कंपनीला ५४ मेगावॉट विजेचा पुरवठा करण्यात येत आहे. एएमएनइपीएल ने आणखी सादर केले की, १५ एप्रिल २०११ च्या आदेशानंतर याचिकाकर्त्याच्या दुसऱ्या ६१.५ क्षमतेच्या संचाने देखील वाणिज्यिकरित्या कामकाजाची सुरुवात केली आहे. एएमएनइपीएल ने राज्य भार प्रेषण केंद्राला ४ मे २०११ च्या पत्राने वाणिज्यिकरित्या कामकाजाची सुरुवात ७ मे २०११ला झाल्याचे घोषित करण्याची विनंती केली आहे. आर-इन्फ्रा आणि एएमएनइपीएल यांच्या वीज खरेदी करारासंबंधात, दुसरा संच आर-इन्फ्राला वीज पुरवठा करण्याच्या स्थितीत असल्याने, आयोगाने एएमएनइपीएल ला निर्देश दिले की, त्यांनी निर्धारणाच्या (शेडयूलिंग) सर्व औपचारिकता पूर्ण कराव्यात आणि आर-इन्फ्राला, ४ ऑगस्ट २०१० च्या वीज खरेदी करारानुसार, ५५ मेगावॉट वीज पुरवठा १ जूलै २०११ पासून करण्यास सुरुवात करावी.

त्याशिवाय, आयोगाने प्रतिवादी आर-इन्फ्राला निर्देश दिले की, त्यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या ६३ अंतर्गत योग्य याचिका/ अर्ज आवश्यक त्या दस्तावेज, माहिती व तपशीलासह, भारत सरकारच्या वीज मंत्रालयाच्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या मार्गदर्शक सूत्रानुसार केलेल्या पारदर्शक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून ठरविलेला वीज दर स्वीकारण्यासाठी, तातडीने दाखल करावा.

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ आणि स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या मार्गदर्शक सूत्रांनुसार मार्ग-१ च्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे आणि बोली दस्तावेजाद्वारे मध्यम-कालीन वीज खरेदीसाठी प्रस्तावित विजेच्या परिमाणास मंजूरी देण्याकरिता टाटा पॉवर कंपनी लि.,ची याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. २०)**

टाटा पॉवर कंपनी लि., च्या वितरण व्यवसायाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१ व ६३ आणि मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ च्या विनियम २३ अंतर्गत, मार्ग-१ च्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेद्वारे मध्यम-कालीन वीज खरेदीच्या प्रस्तावित परिमाणास मंजूरी देण्यासाठी आणि विद्युत अधिनियम,२००३ च्या कलम ६३ आणि भारत सरकारच्या वीज मंत्रालयाने १९ जानेवारी २००५ रोजी अधिसूचित आणि सुधारित केल्याप्रमाणे "वितरण परवानाधारकाने वीज खरेदीसाठी ठरवावयाचा वीज दर निश्चित करण्यासाठीच्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेकरिता मार्गदर्शक सूत्रांना" अनुसरुन, बोलीच्या दस्तावेजांना मंजूरी देण्यकरिता याचिका सादर केली.

टीपीसी-वितरणने मध्यम-कालीन तत्त्वावर बेस लोड आणि डियुरल लोडकरिता वीज प्राप्त करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे ३ पुरवठयाचे कालावधी प्रस्तावित केले:-

| पुरवठा कालावधी | पुरवठयाचा नियोजित दिनांक | पुरवठा समाप्तीचा नियोजित दिनांक | वीज प्राप्त करुन घेण्याचे परिमाण (मेगावॉट) | |
|---|---|---|---|---|
| | | | बेस | डयुरल (०९००:२३००) |
| पुरवठा कालावधी-१ | १ एप्रिल, २०१२ | ३१ मार्च, २०१३ | १५० | १०० |
| पुरवठा कालावधी-२ | १ एप्रिल, २०१३ | ३१ मार्च, २०१४ | २०० | १५० |
| पुरवठा कालावधी-३ | १ एप्रिल, २०१४ | ३१ मार्च, २०१५ | २०० | १५० |

आयोगाने असे मत व्यक्त केले की, टीपीसी-वितरणने आर्थिक वर्ष २०१०-११ करीता प्रस्तावित केलेली मागणी आणि ग्राहक बदलाच्या कालावधीतील प्रत्यक्ष करण्यात आलेली विजेची मागणी विचारात घेता, टीपीसी-वितरणने पुढील वर्षांकरिता मागणीचे केलेले अंदाज वाजवी असल्याचे दिसून येते. तथापि, वीज मागणीचे अंदाज करण्यासाठी वापरण्यात आलेल्या गृहीतकांच्या संदर्भात, आयोगाने असा सल्ला दिला / सूचना केली की, विजेच्या विक्री आणि वापरासाठीच्या मागील माहितीमध्ये सुधारणा करण्यासाठी दुय्यम माहिती-संग्रहाचा वापर करावा. आयोगाने वेगवेगळया पुरवठा कालावधीसाठी टीपीसी-वितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे मार्ग-१ च्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून मध्यम-कालीन तत्त्वावर खरेदी करावयाच्या विजेच्या परिमाणास मंजूरी दिली.

**मार्ग-१ च्या बोली प्रक्रियेद्वारे ठरविलेला वीज दर स्वीकारण्यासाठी आणि मध्यम-कालीन तत्त्वावर खरेदी करावयाची मागणी केलेली क्षमता १००० मेगावॉट पर्यंत इतकी कपात करण्यास मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र. २३)**

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत मार्ग-१ च्या बोली प्रक्रियेद्वारे ठरविलेला वीज दर स्वीकारण्यासाठी आणि मध्यम-कालीन तत्त्वावर खरेदी करावयाच्या मागणी केलेल्या क्षमतेमध्ये १००० मेगावॉट पर्यंत इतकी कपात करण्यास मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीने याचिका सादर केली. सहा बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर केल्या आणि आर्थिक नसलेल्या बोली उघडण्यात आल्या. सर्व सहा बोलीदार पात्र असल्याचे मुल्यांकन समितीला आढळून आले. निविदा-पोटी प्राप्त झालेले महापारेषणाच्या जाळयापर्यंतचे दर रु. ४.२७ प्रति युनिट ते रु. ४.८८ प्रति युनिट पहिल्या वर्षाकरिता आणि दुसऱ्या वर्षाकरिता रु. ४.२२ प्रति युनिट ते रु.५.४३ प्रति युनिट, असे असल्याचे आढळले.

महावितरण कंपनीच्या मंडळाने, दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी द्वि-सदस्य समिती नेमण्याची सूचना केली. मंडळाने २००० मेगावॉट ऐवजी १००० मेगावॉट वीज १ मार्च २०११ ते २९ फेब्रुवारी २०१२ या १ वर्षाच्या कालावधी दरम्यान खरेदी करावयाच्या परिमाणाच्या प्रस्तावास मान्यता दिली आणि संचालक (संचालन) आणि संचालक (अर्थ) यांच्या द्वि-सदस्य समितीने बोलीदारांबरोबर दराबाबत वाटाघाटी केल्यानंतर बोलीदारांनी वाटाघाटी करुन निश्चित करण्यात आलेल्या रु. ४.१० प्रति युनिट या दरास सहमती दिली.

एपीएमएल ने, दिर्घ-कालीन वीज खरेदीसाठी, त्यांच्या मार्ग-१, टप्पा-२ खाली तिरोदा विद्युत प्रकल्पातील संच २ आणि संच ३ मधून १३२० मेगावॉट विजेचा पुरवठा करण्याचे मान्य केले असल्याची आणि वीज खरेदी करारानुसार वाणिज्यिकरित्या कामकाजाची सुरुवात करण्यापूर्वी निर्माण झालेली वीज महावितरण कंपनीला पुरवावयाची असल्याची, आयोगाने नोंद घेतली. स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून ठरविण्यात आलेल्या दराने आणि त्यात ग्राहक आणि महावितरणच्या हिताच्या दृष्टिकोनातून द्वि-सदस्य समितीने महापारेषणच्या जाळयापर्यंत ठरविलेल्या रु. ४.१० प्रति युनिट दराने विजेचे निर्धारण केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष आणि १ दिवसाच्या कालावधीकरिता विजेचा पुरवठा करण्यासाठी, आयोगाने तिरोदा युनिट १ मधून किंवा मुंद्रा विद्युत प्रकल्पातून किंवा (तिरोदा विद्युत प्रकल्पाच्या संच २ आणि संच ३ शिवाय) अन्य कोणत्याही विजेच्या स्त्रोतातून ८०० मेगावॉट वीज मध्यम-कालीन तत्त्वावर खरेदी करण्यास मान्यता दिली. तसेच आयोगाने रत्नागिरी येथील जेएसडब्ल्यू कंपनीच्या विद्युत प्रकल्पातून रु. ४.१० प्रति युनिट दराने विजेचे निर्धारण केल्याच्या दिनांकापासून १ वर्ष आणि १ दिवसाच्या कालावधीकरिता २०० मेगावॉट वीज मध्यम-कालीन तत्त्वावर खरेदी करण्यास मान्यता दिली.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. आणि अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा.लि., यांच्यात करण्यात आलेल्या वीज खरेदी करारानुसार विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित केलेला वीज दर स्वीकारण्यासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि., ची याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. ८४)**

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. आणि अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा.लि., यांच्यात करण्यात आलेल्या वीज खरेदी करारानुसार विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित केलेला वीज दर स्वीकारण्यासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. ने याचिका सादर केली. बोली प्रक्रियेतकरिता विहित मुदतीपेक्षा लागलेला जादा कालावधी आयोगाने माफ केला आणि भविष्यात नवीन बोली प्रक्रिया सुरु करताना त्याकरीता स्पर्धात्मक बोली प्रक्रियेखाली विहित करण्यात आलेल्या कालावधीचे पालन करण्यास आर-इन्फ्राला निर्देश दिले. विनंतीच्या प्रस्तावातील बोली दस्तावेजामध्ये निश्चित करण्यात आलेल्या अटी व शर्तींना अनुसरुन निवड प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर, आयोगाने खालील तक्यात नमूद केल्याप्रमाणे ५५ मेगावॉट विजेकरिता वीज दर स्वीकारण्यास मान्यता दिली. स्वीकारण्यासाठी मान्यता दिलेला लेव्हलाइज्ड वीज दर खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | पुरवठयाचा कालावधी | वेळ (तासांमध्ये) | परिमाण | लेव्हलाइज्ड वीज दर (रुपये प्रति युनिट) |
|---|---|---|---|---|
| १ | १ जूलै, २०११ पासून सुरु होणारा व ३१ मार्च, २०१४ रोजी संपणारा | २४ तास | ५५ मेगावॉट | ४.८० |

अभिजीत एमएडीसी नागपूर प्रा.लि., बरोबर केलेला अंतिम वीज खरेदी करार यथोचितपणे सही केलेल्या एस्क्रो करार आणि तारण करारासह सादर करण्याचे निर्देश आयोगाने आर-इन्फ्राला दिले.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि., आणि वर्धा पॉवर कंपनी.लि., यांच्यात करण्यात आलेल्या वीज खरेदी करारानुसार विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित केलेला वीज दर स्वीकारण्यासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि., ची याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. ८५)**

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.,आणि वर्धा पॉवर कंपनी लि., यांच्यात करण्यात आलेल्या वीज खरेदी करारानुसार विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून निश्चित केलेला वीज दर स्वीकारण्यासाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. ने

याचिका सादर केली.

बोली प्रक्रियेकरिता विहित मुदतीपेक्षा लागलेला जादा कालावधी आयोगाने माफ केला आणि भविष्यात नवीन बोली प्रक्रिया सुरु करताना त्याकरीता स्पर्धात्मक बोली प्रक्रियेखाली विहित करण्यात आलेल्या कालावधीचे पालन करण्यास आर-इन्फ्राला निर्देश दिले. विनंतीच्या प्रस्तावातील बोली दस्तावेजामध्ये निश्चित करण्यात आलेल्या अटी व शर्तींना अनुसरुन निवड प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर आयोगाने सन २०११ च्या प्रकरण क्र. ११ मधील ३१ मे २०११ च्या आदेशात उल्लेख केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे २६० मेगावॉट विजेकरिता वीज दर स्वीकारण्यास मान्यता दिली. स्वीकारण्यासाठी मान्यता दिलेला लेव्हलाइज्ड वीज दर रु.४.८५ प्रति युनिट होता. वर्धा पॉवर कंपनी लि., बरोबर केलेला अंतिम वीज खरेदी करार यथोचितपणे सही केलेल्या एस्क्रो करार आणि तारण करारासह सादर करण्याचे निर्देश आयोगाने आर-इन्फ्राला दिले.

**महानिर्मिती कंपनी आणि महावितरण कंपनी यांच्यामधील वीज खरेदी करार -सन २०११ च्या प्रकरण क्र. ७१ मधील ३० नोव्हेंबर २०११ चा आदेश**

महानिर्मिती कंपनी आणि महावितरण कंपनी यांच्यामधील दि.१ एप्रिल २००९ च्या वीज खरेदी कराराच्या पुरवणीस मान्यता देण्याच्या संबंधातील सन २०१० च्या प्रकरण क्र.१०३ मधील दि.३० मार्च २०११ च्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्याच्या प्रकरणी

महानिर्मिती कंपनीच्या २६ नवीन निर्मिती प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या विजेची खरेदी करण्यासाठी महानिर्मिती कंपनी आणि महावितरण कंपनी यांच्यामधील वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी महावितरण कंपनीने याचिका सादर केली होती. आयोगाने प्रकल्पांची उभारणी पूर्ण झाली किंवा नाही हे निश्चित करण्यासाठी वाजवी निकष ठरविण्यासाठी एक समिती नेमली ज्यामध्ये जमीन संपादन, कोळसा पुरवठा, पाणी पुरवठा आणि अन्य महत्वाचे स्रोत यात समन्वय घडवून आणणे, या सारख्या महत्वाच्या प्रक्रियांवर भर देण्यात आला होता. त्याप्रमाणे , ज्या प्रकल्पांनी या निकषांची पुर्तता केली असेल त्यांच्या वीज खरेदी करारांना आयोगाने मान्यता दिली. महानिर्मिती कंपनीने सन २०११ च्या प्रकरण क्र. ७१ अन्वये दाखल केलेल्या याचिकेत या यादीमध्ये आणखी काही प्रकल्पांचा समावेश करण्याची मागणी केली, यासाठी आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या निकषांची पुर्तता केली आहे हे सिध्द करण्यासाठी आवश्यक माहितीदेखील जोडली. आयोगाने या संबंधी आढावा घेतला आणि यादीतील ज्या अतिरिक्त प्रकल्पांनी पुरेशी प्रगती केली होती त्यांना मान्यता दिली.

**इक्झोरा कन्स्ट्रक्शन (प्रा) लि., मुंबई, यांनी आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१७-१८ या कालावधीकरिता मध्यम कालीन वीज खरेदीस आणि वीज खरेदी करावयाच्या विजेच्या परिमाणास मान्यता देण्यासाठी दाखल केलेली याचिका (सन २०११ च्या प्रकरण क्र. १४९ मधील १६-०१-२०१२ चा आदेश)**

इक्झोरा कन्स्ट्रक्शन (प्रा) लि., मुंबई, (आयसीपीएल) हे, महाराष्ट्र राज्यातील पनवेल येथील विशेष आर्थिक क्षेत्राला (सेझ), जे रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यातील तळेगाव आणि पनशील या गावात आणि पनवेल तालुक्यातील भोकरपाडा या गावात वसलेले आहे, वीज पुरवठा करण्यासाठी आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा पुरविणारे एक 'सह-विकासक' आहे. आयसीपीएल ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ खाली आर्थिक वर्ष २०१४ ते आर्थिक वर्ष २०१८ या कालावधीतील मध्यम कालीन वीज खरेदी आणि खरेदी करावयाच्या विजेच्या परिमाणास मंजूरी देण्याकरिता प्रतिज्ञापत्राद्वारे १२ ऑक्टोबर २०११ रोजी याचिका सादर केली.

आयसीपीएल ने आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१७-१८ या कालावधीकरिता नमूद केलेल्या अंदाजित विजेच्या मागणीचे विश्लेषण केल्यानंतर, आयोगाने आपल्या १६ जानेवारी २०१२ च्या आदेशाने या कालावधीकरिता आयसीपीएल ला खाली नमूद केल्याप्रमाणे वीज खरेदीचे परिमाण मंजूर केले.

| कालावधी | विजेची मागणी (मेगावॉट मध्ये) |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१४ | ३ |
| आर्थिक वर्ष २०१५ | ११ |
| आर्थिक वर्ष २०१६ | १७ |
| आर्थिक वर्ष २०१७ | २५ |
| आर्थिक वर्ष २०१८ | ३५ |

याचिकाकर्त्याने, मध्यम-कालीन वीज खरेदीसाठी, 'वितरण परवाना-धारकाने वीज खरेदीकरिता बोली प्रक्रियेद्वारे वीज दर निश्चितीकरणासाठी मार्गदर्शक सूत्रांमध्ये' नमूद करण्यात आलेल्या सर्व लागू असलेल्या अटींना अनुसरून एक टप्प्याची बोली प्रक्रिया मंजूर करण्याची विनंती देखील आयोगाने मान्य केली.

## मुक्त प्रवेश

स्टॅण्ड बाय वीज मागणी मंजूर न करुन आणि वीज एक्स्चेंजच्या माध्यमातून वीज खरेदीसाठी मुक्त प्रवेश मंजूर न करुन आयोगाने सन २०१० च्या प्रकरण क्र. ८३ मध्ये पारित केलेल्या आदेशाचा भंग केल्याबाबत महावितरण कंपनीला दंड करण्यासाठी इंडो रामा सिंथेटिक्स (इंडिया) लि. ची याचिका. (सन २०१० च्या प्रकरण क्र. २७ मधील ०८-१२-२०११ चा आदेश)

याचिकाकर्त्याची स्टॅण्ड बाय मागणी मंजूर न करुन आणि वीज एक्स्चेंजच्या माध्यमातून वीज खरेदीसाठी मुक्त प्रवेश मान्यता न देऊन सन २०१० च्या प्रकरण क्र. ८३ मध्ये आयोगाने १ मार्च, २०११ रोजी पारित केलेल्या आदेशाचा भंग करुन, मविनिआ (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५ च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबाबत, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६, १५१ आणि १५१ (ए) अंतर्गत महावितरण कंपनीला दंड करण्यासाठी इंडो रामा सिंथेटिक्स (इंडिया) लि. ने ११ मार्च २०११ रोजी प्रतिज्ञा-पत्राद्वारे याचिका दाखल केली.

आयोगाने २० ऑक्टोबर,२०११ रोजीच्या आदेशान्वये ही याचिका खालील निरीक्षण / निर्देशांसह निकाली काढली:-

- इंडो रामा सिंथेटिक्स् (इंडिया) लि. (आयआरएसएल) ने महावितरण कंपनीशी २० डिसेंबर २०१० रोजी जोडणीसाठीच्या करारावर सही करुन, त्यांची स्व-वापरासाठीची निर्मिती सुविधा ग्रीडच्या २२० केव्ही पातळीशी एकरुप केली. त्यामुळे, आयआरएसएल त्यांच्या स्व-वापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पाकरिता अतिरिक्त स्टॅण्डबाय मागणी करण्याकरिता पात्र ठरले असल्याने आयोगाने महावितरणला अतिरिक्त मागणी आयआरएसएल ला मंजूर करण्याचे निर्देश दिले.

- आयआरएसएल ला इंडियन एजर्नी एक्स्चेंजकडून १० मेगावॉट वीज खरेदी करण्यासाठी २५ ऑगस्ट २०११ रोजी मुक्त प्रवेशासाठी परवानगी दिल्यावर आणि त्यानंतर या परवानगीमधील काही खंड (क्लॉज) विद्युत अधिनियम, २००३ शी सुसंगत नसल्यामुळे मागे घेतल्यामुळे, महावितरण कंपनीने, आयोगाने सन २०१० च्या प्रकरण क्र. ८३ मध्ये १ मार्च २०११ रोजीच्या आदेशात दिलेल्या निर्देशांचे महावितरणने पालन केले आहे.

- आयोगाच्या आदेशानुसार स्व-वापरासाठीच्या प्रकल्पाच्या संचांकरिता स्टॅण्डबाय सुविधा घेणे आणि विद्युत अधिनियम,२००३ मधील तरतुदीनुसार कायदेशीर हक्क म्हणून मुक्त प्रवेश घेणे, या दोन्ही बाबी स्वतंत्र असून त्या एकमेकींशी जोडता येणार नाहीत. त्यामुळे, आयोगाने महावितरणला या दोन्ही वेगवेगळ्या बाबी एकमेकींशी न जोडण्याचे आणि आयआरएसएल च्या स्व-वापरासाठीच्या प्रकल्पाच्या संचांकरिता स्टॅण्डबाय मागणी मंजूर करण्याचे निर्देश दिले.

**महावितरण कंपनीची मुक्त प्रवेश ग्राहकांकरिता क्रॉस सबसिडी अधिभार आणि स्टॅण्डबाय आकारासंबंधी आणि क्रॉस सबसिडी अधिभार पुन्हा नव्याने निश्चित करण्यासाठी आणि मुक्त प्रवेशाशी संबंधित प्रश्न (सन २०१० चे प्रकरण क्र.४३)**

- महावितरण कंपनीने सादर केलेल्या पुर्नविलोकन याचिकेमध्ये कोणतेही वैध मुद्दे नसल्यामुळे आणि तसेच आयोगाच्या ५ सप्टेंबर २००६ च्या आदेशापासून ४५ दिवसाच्या आत याचिका सादर न केल्याने ही याचिका कालबाहय झाल्यामुळे, आयोगाने ९ सप्टेंबर २०११ च्या आदेशाने महावितरण कंपनीची पुर्नविलोकन याचिका खारीज केली. सन २००६ मध्ये असलेल्या वीज परिस्थितीमध्ये आता बदल झाला असल्यामुळे, आयोगाने क्रॉस सबसिडी अधिभार पुन्हा नव्याने निश्चित करण्याचा निर्णय घेतला. आयोगाने, योग्य विचार-विनिमय करुन विद्युत अधिनियम, २००३ मधील उद्दिष्टांना अनुसरुन असलेल्या भारत सरकारच्या वीज मंत्रालयाच्या वीज दराच्या धोरणामध्ये नमूद करण्यात आलेले क्रॉस सबसिडी अधिभाराचे सूत्र स्वीकारले आणि सर्व वितरण परवाना धाराकांकरिता क्रॉस सबसिडी अधिभाराची फेरनिश्चिती केली.

- संबंधित ग्राहक वर्गवारीला लागू असलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराच्या २५ टक्के इतका क्रॉस सबसिडी अधिभार नूतनशील ऊर्जा स्त्रोतातून मुक्त प्रवेश व्यवहारांकरिता निश्चित करण्यात आला. वीज विद्युत अधिनियम, २००३ मधील उद्दिष्टांना अनुसरुन नूतनशील स्त्रोतामधून विजेच्या निर्मितीस प्रोत्साहान देण्यासाठी आयोगाने कमी क्रॉस सबसिडी अधिभार मंजूर केला आणि टीपीसी-वितरण, आर-इन्फ्रा-वितरण आणि महावितरण कंपनी या तीन वितरण परवानाधारकांकरिता क्रॉस-सबसिडी अधिभाराचे फेर- निश्चितीकरण केले आणि बेस्ट उपक्रम हे स्थानिक प्राधिकरण असल्यामुळे, त्यांना विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ (३) आणि प्रचलित मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ मधील विनियम १९ नुसार वितरण मुक्त प्रवेशातून सूट देण्यात आली.

**मे. नवलाख ट्रान्सलाईन्स् यांनी भेदभावरहित मुक्त प्रवेशाच्या तरतुदी संबंधीत असलेल्या वादावर अभिनिर्णयासाठी दाखल केलेली याचिका (सन २०१० च्या प्रकरण क्र. ४१ मधील २०-१०-२०११ चा आदेश)**

मे.नवलाख ट्रान्सलाईन्स्, पवन ऊर्जा विकासक, यांनी, प्रतिज्ञापत्राद्वारे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ (३) आणि मविनिआ (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ मधील विनियम ३ व १८ (२) आणि मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम,२००४ मधील विनियम ९२ ते ९४ अंतर्गत, महावितरण कंपनीने भेदभावरहित मुक्त प्रवेश न देण्याबाबतच्या वादावर अभिनिर्णय देण्यासाठी याचिका १८ ऑगस्ट, २०१० रोजी आयोगाकडे सादर केली.

आयोगाने आपल्या २० ऑक्टोबर, २०११ च्या आदेशाने खालील निरिक्षण/ निर्देशांसह याचिका निकाली काढली:-

- महावितरण किंवा याचिकाकर्ता दोघांनाही परस्पर सहमतीने कोणताही अंतरिम क्रॉस सबसिडी अधिभार ठरविण्याचा अधिकार नाही. प्रस्तावित संपूर्ण अंतरिम व्यवस्था ही न टिकण्याजोगी, अनधिकृत, अधिकारबाहय आणि त्यामुळे अवैध आहे.

- आयोगाने त्यानंतर सन २०१० च्या प्रकरण क्र. ४३ मध्ये क्रॉस सबसिडी अधिभार पुन्हा नव्याने निश्चित करण्यासाठी ९ सप्टेंबर २०११ रोजी आदेश पारित केला. त्यामुळे, ९ सप्टेंबर २०११ पासून, मुक्त प्रवेश ग्राहकाने नूतनशील स्त्रोतांपासूनच्या ऊर्जेची खरेदी केली तर क्रॉस सबसिडी अधिभार लागू असलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराच्या २५ टक्के राहील.

- महावितरणने मुक्त प्रवेश व्यवहारांसाठी कोणताही प्रशासकीय आकार लावण्यापूर्वी आयोगाची पूर्व-परवानगी घेणे महावितरणवर कायदेशीरपणे बंधनकारक आहे.
- महावितरणने जमापत्र तातडीने निर्गमित करावेत.

## एकूण महसुली गरज आणि अचूक समायोजनाबाबतचे आदेश

**महावितरण कंपनीची आर्थिक वर्ष २००९-१० करिता अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१०-११ साठी तात्पूरते समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. १००)**

आयोगाने ३१ ऑक्टोबर २०११च्या आदेशाने महावितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २००९-१० च्या अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०१०-११ च्या तात्पूरत्या अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यास मंजूरी दिली.

या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः-

अ) आयोगाने रु.३,२६५ कोटीचा दिलासा दिला, ज्याची वसूली ग्राहकांकडून वीज दराच्या माध्यमातून करण्यात येईल.

ब) आयोगाने सर्व ग्राहक वर्गवारींना १ नोव्हेंबर २०११ पासून १२ (बारा) महिन्यांकरिता आकारावयाच्या वर्गवारी-निहाय अतिरिक्त ऊर्जा आकारांची तरतूद केली.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि-वितरण व्यवसायाची आर्थिक वर्ष २००८-०९ च्या अचूक समायोजनासाठी, आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका (सन २०१० च्या प्रकरण क्र. ७२ मधील २९-०७-२०११ चा आदेश)**

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि-वितरण व्यवसायाने आर्थिक वर्ष २००८-०९ च्या अचूक समायोजनासाठी, आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका दाखल केली.

आयोगाने आपल्या २९ जुलै २०११ च्या आदेशाने आर-इन्फ्रा-वितरणच्या आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वीज दर निश्चित केला. या प्रकरणी २ एप्रिल २०११ रोजी मुंबई येथे जाहीर सुनावणी घेण्यात आली होती.

या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

- आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन केल्यानंतर अतिरिक्त महसूली तूट रु. ९५.६० कोटी होती जी आर्थिक वर्ष २०१०-११ च्या एकूण महसूली गरजेत वाढविण्यात आली.
- आर्थिक वर्ष २००९-१० करिता विविध बाबींचे तात्पूरते समायोजन केल्यानंतर एकूण महसूली गरज आर्थिक वर्ष २००९-१० करिता रु ५५१०.४३ कोटी होती मात्र आर-इन्फ्राने यासाठी प्रस्तावित केलेली रक्कम रु. ५६६८.१५ कोटी होती.
- आर-इन्फ्राने वर्ष २०१०-११ करिता वार्षिक महसूली गरज रु.५२४४.२८ कोटी प्रस्तावित केली होती. तथापि, आयोगाने रु. ४८३६.११ कोटी मंजूर केली.
- आर-इन्फ्राने आर्थिक वर्ष २०१०-११ करिता एकत्रित महसुली तूट रु. २७८७.८० कोटी इतकी प्रस्तावित केली होती. तथापि, आयोगाने रु.२३१६.२१ कोटी मंजूर केली.
- आयोगाने नियामक मत्ता आकार आणि क्रॉस सबसिडी अधिभार ज्या ग्राहकांकडून वसूल करावयाचा आहे त्यांची वर्गवारी केली. त्यांचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे आहे-

| अ.क्र. | तपशील | आकार लागू असलेले गट | | |
|---|---|---|---|---|
| | | गट -१ | गट-२ | गट-३ |
| १ | नियामक मत्ता वसूलीसाठी आकार | होय | होय | होय |
| २ | क्रॉस सबसिडी अधिभार | नाही | होय | नाही |

**टीप-**

गट-१: आर-इन्फ्रा वितरणच्या वायर्स्‌मधून ज्यांना आर-इन्फ्रा वितरणकडून वीज पुरवठा होत आहे असे ग्राहक

गट-२: आर-इन्फ्रा वितरणच्या वायर्स्‌मधून ज्यांना टीपीसी-वितरणकडून वीज पुरवठा होत आहे असे ग्राहक

गट-३: टीपीसी-वितरणच्या वायर्स्‌मधून ज्यांना टीपीसी-वितरणकडून वीज पुरवठा होत आहे असे ग्राहक

**टाटा पॉवर कंपनी लि. च्या वितरण व्यवसाय (टीपीसी-वितरण) यांची आर्थिक वर्ष २००९-१० करिता अचूक समायोजनासाठी आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी याचिका (सन २०११ च्या प्रकरण क्र.१०४ मधील १५-०२-२०१२ चा आदेश)**

मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ नुसार आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, टाटा पॉवर कंपनी लि. च्या वितरण व्यवसाय (टीपीसी-वितरण) ने आर्थिक वर्ष २००९-१० करिता अचूक समायोजनासाठी आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी अर्ज सादर केला.

आर्थिक वर्ष २००९-१० व आर्थिक वर्ष २०१०-११ चे लेखापरीक्षीत लेखे उपलब्ध असल्यामुळे, आयोगाने आपल्या १५ फेब्रुवारी २०११ च्या आदेशाद्वारे आर्थिक वर्ष २००९-१० व आर्थिक वर्ष २०१०-११ मधील खर्च व महसूलाचे अंतिम अचूक समायोजन केले. या प्रकरणी जाहीर सुनावणी मुंबई येथे २६ नोव्हेंबर २०११ रोजी घेण्यात आली.

सदर आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः-

- याचिकाकर्त्याने अचूक समायोजनेच्या याचिकेसोबत करासाठी केलेल्या प्रत्यक्ष परिगणनेचे विवरण-पत्र आणि त्याच्या समर्थनार्थ दाखल केलेले उत्पन्नाचे विवरण-

पत्र (रिटर्न ऑफ इन्कम) दस्तावेज पुरावा म्हणून आयोगाने स्वीकारले. करपात्र उत्पन्नाचे भाग-निहाय वाटप आणि त्यावरील कर हे मान्यता दिलेल्या भाग-निहाय उत्पन्न व खर्चाच्या भाग-निहाय वाटपाच्या आधारे करण्यात आले आहे.

- या आदेशात विचारात घेण्यात आलेल्या भागाकरिता वाटप करण्याजोगा कर रु. ५.२८ कोटी असून तो या याचिकेत करण्यात आलेल्या रु.२९ कोटीच्या मागणीच्या ऐवजी मंजूर करण्यात येत आहे.
- विद्युत ग्राहकांनी ज्या मत्तांच्या निर्मितीसाठी अंशदान दिले आहे त्यांना अशा मत्तांची विक्री केल्यास त्यापासून लाभ मिळण्याची शक्यता नसल्याने आणि मत्तांच्या निर्भांडवलीकरणाचे विविध गर्भितार्थ असल्यामुळे, आयोगाने अतिथी गृह इ.सारख्या मत्तांच्या निर्भांडवलीकरणाच्या विषयाचा फेर-विचार केला. आयोगाने असे मत व्यक्त केले की, ग्राहकांने अशा मत्तांकरिता यापूर्वी केव्हातरी रक्कम अदा केली असल्यामुळे, या मत्ता विनियमित व्यवसायाच्या लेखा पुस्तकामध्ये यापुढेही दाखवण्यात येतील. जर अतिथी गृहांचा वापर अन्य गट कंपन्यांनी किंवा अन्य व्यवसायांनी त्याच ताळेबंदाच्या अंतर्गत केला तर अतिथी गृहाच्या वापरासाठी बाजार दराने योग्य ते भाडे त्यांनी द्यावे आणि असे भाडे हे विनियमित व्यवसायाचे वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न म्हणून विचारात घेण्यात येईल. त्यामुळे, जेव्हा अशी मत्ता विकण्यात येईल तेव्हा विनियमित व्यवसायाला बाजार दराने किंमत मिळू शकेल. त्यामुळे, आयोग टीपीसी ने प्रस्तावित केल्याप्रमाणे अतिथी गृह आणि अन्य प्रशासकीय मत्तांचे निर्भांडवलीकरण करण्यास परवानगी देऊ शकत नाही.
- टीपीसी-वितरणने मागणी केल्याप्रमाणे रु. ५९.०९ कोटी ऐवजी आर्थिक वर्ष २००९-१० करिता अंतिम समायोजन केल्यानंतर आर्थिक वर्ष २००९-१० करिता रु. १८.९२ कोटीच्या महसूली तूटीस आयोगाने मान्यता दिली.
- टीपीसी-वितरणने मागणी केल्याप्रमाणे रु. ७५.७४ कोटी ऐवजी आर्थिक वर्ष २०१०-११ करिता अंतिम समायोजन केल्यानंतर आर्थिक वर्ष २०१०-११ करिता रु. ९६.०३ कोटीच्या महसूली शिलकीस आयोगाने मान्यता दिली.
- मागील कालावधीतील वसूली, मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या निकालाचा परिणाम आणि टीपीसी-निर्मितीच्या तूटीमधील टीपीसी-वितरणच्या हिश्याची वसूली, या बाबी विचारात घेऊन आयोगाने टीपीसी-वितरणने मागणी केलेल्या रु.७१८.३८ ऐवजी रु.३१८.२३ कोटी इतक्या एकूण तूटीस मान्यता दिली.

## नूतनशील ऊर्जा आदेश

**पहिल्या नियंत्रण कालावधीच्या दुसऱ्या वर्षासाठी व्यापक वीज दराच्या निश्चितीकरण प्रकरणी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० च्या विनियम ८ अंतर्गत आयोगाचा स्वत:हून दिलेला आदेश. (सन २०११ चे प्रकरण क्र. ३९)**

आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० नुसार उचित नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन आणि १५ एप्रिल, २०११ रोजी या प्रकरणी झालेल्या जाहीर सुनावणीमध्ये विविध हितसंबंधितांनी या संबंधात व्यक्त केलेले अभिप्राय/सूचना यांचा समावेश केल्यानंतर, पवन, मिनी/मायक्रो जल प्रकल्पांसहित लघु जल प्रकल्प, सौर पीव्ही, सौर औष्णिक, सौर छतावरील आणि अन्य लघु सौर उपकरणे, बायोमास प्रकल्प आणि ऊसाच्या चिपाडावर आधारीत सहनिर्मिती प्रकल्प इ. सारख्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पांसाठी लेव्हलाईज्ड वीज दर निश्चित केला. या आदेशामध्ये उल्लेख करण्यात आलेला लेव्हलाईज्ड वीज दर आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये कार्यान्वित झालेल्या नवीन नतूनशील ऊर्जा प्रकल्पांसाठी लागू राहील.

आ.व. २०११-१२ दरम्यान कार्यान्वित झालेल्या नूतनशील ऊर्जा प्रकल्पांसाठी लेव्हलाईज्ड वीज दर खालीलप्रमाणे आहेत :-

**अ) पवन ऊर्जा प्रकल्प :**

| २०११-१२ दरम्यान निर्देशांकित भांडवली खर्च (लाख/मेवॉ) |
|---|
| रु. ४८९.५३ |

**आ.व. २०११-१२ दरम्यान कार्यान्वित झालेल्या नवीन पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी लेव्हलाईज्ड वीज दर**

| तपशील | वीज दराचा कालावधी | लेव्हलाईज्ड एकूण वीज दर (आ.व. २०११-१२) | वाढीव घसाऱ्याचा लाभ (घेतला असल्यास) | नक्त लेव्हलाईज्ड वीज दर (वाढीव घसाऱ्याचा लाभ समायोजित केल्यानंतर) (घेतला असल्यास) |
|---|---|---|---|---|
| | | (रु./युनिट) | (रु./युनिट) | (रु./युनिट) |
| पवन ऊर्जा प्रकल्प | | | | |
| पवन क्षेत्र -१ | १३ | ५.३७ | (०.८१) | ४.५६ |
| पवन क्षेत्र -२ | १३ | ४.६७ | (०.७०) | ३.९६ |
| पवन क्षेत्र -३ | १३ | ३.९७ | (०.६०) | ३.३८ |
| पवन क्षेत्र -४ | १३ | ३.५८ | (०.५४) | ३.०४ |

**ब) लघु जल विद्युत प्रकल्प आणि मिनी/मायक्रो जल विद्युत प्रकल्प :**

| प्रकल्पाचे आकारमान | २०११-१२ दरम्यान निर्देशांकित भांडवली खर्च (लाख/मेवॅ) |
|---|---|
| > १ मेवॅ पेक्षा जास्त आणि ५ मेगावॅटपर्यंत आणि त्यासह | रु. ५२२.८० |
| > ५ मेवॅ पेक्षा जास्त ते २५ मेवॅ | रु. ४७५.२८ |

आ.व. २०११-१२ दरम्यान कार्यान्वित झालेल्या नवीन लघु जल विद्युत प्रकल्पांसाठी लेव्हलाईज्ड वीज दर

| तपशील | | वीज दराचा कालावधी | लेव्हलाईज्ड एकूण वीज दर (आ.व. २०११-१२) | वाढीव घसाऱ्याचा लाभ (घेतला असल्यास) | नक्त लेव्हलाईज्ड वीज दर (वाढीव घसाऱ्याचा लाभ समायोजित केल्यानंतर) (घेतला असल्यास) |
|---|---|---|---|---|---|
| | | | (रु./युनिट) | (रु./युनिट) | (रु./युनिट) |
| लघु जल विद्युत प्रकल्प | | | | | |
| मिनी मायक्रो जल विद्युत प्रकल्प | ५०० किवॅ आणि त्याखालील | ३५ | ५.५१ | (०.५९) | ४.९२ |
| | ५०० किवॅ पेक्षा जास्त आणि १ मेवॅपर्यंत आणि त्यासह | ३५ | ५.०१ | (०.५९) | ४.४२ |
| अन्य लघु जल विद्युत प्रकल्प | १ मेवॅ पेक्षा जास्त आणि ५ मेवॅ पर्यंत आणि त्यासह | ३५ | ४.५१ | (०.५९) | ३.९२ |
| | ५ मेवॅ पेक्षा जास्त ते २५ मेवॅ पर्यंत आणि त्यासह | १३ | ३.८७ | (०.५३) | ३.३४ |

**क) सौर फोटोव्होल्टॅनिक (पीव्ही) ऊर्जा प्रकल्प :**

| २०११-१२ दरम्यान किमाा भांडवली खर्चाचे लक्ष्य (लाख/मेवॅ) |
|---|
| रु. १४४२.०० |

आ.व. २०११-१२ दरम्यान कार्यान्वित झालेल्या नवीन सौर पीव्ही प्रकल्पांसाठी लेव्हलाईज्ड वीज दर

| तपशील | वीज दराचा कालावधी | लेव्हलाईज्ड एकूण वीज दर (आ.व. २०११-१२) | वाढीव घसाऱ्याचा लाभ (घेतला असल्यास) | नक्त लेव्हलाईज्ड वीज दर (वाढीव घसाऱ्याचा लाभ समायोजित केल्यानंतर) (घेतला असल्यास) |
|---|---|---|---|---|
| | | (रु./युनिट) | (रु./युनिट) | (रु./युनिट) |
| सौर ऊर्जा प्रकल्प | | | | |
| सौर ऊर्जा पीव्ही प्रकल्प | २५ | १५.६१ | (२.५१) | १३.१० |

ड) आ.व. २०११-१२ दरम्यान सुरु झालेल्या छपरावरील नवीन सौर पीव्ही आणि अन्य लघु सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी वीज दर

| नवीन नूतनशील ऊर्जा प्रकल्प - सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी वीज दर (महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० च्या विनियम ३.१ चा संदर्भ) | | | | |
|---|---|---|---|---|
| तपशील | वीज दराचा कालावधी | लेव्हलाईज्ड एकूण वीज दर (आ.व. २०११-१२) | वाढीव घसाऱ्याचा लाभ (घेतला असल्यास) | नक्त लेव्हलाईज्ड वीज दर (वाढीव घसाऱ्याचा लाभ समायोजित केल्यानंतर) (घेतला असल्यास) |
| | वर्ष | (रु./युनिट) | (रु./युनिट) | (रु./युनिट) |
| सौर ऊर्जा प्रकल्प | | | | |
| छपरावरील सौर पीव्ही आणि अन्य लघु सौर ऊर्जा प्रकल्प | २५ | १६.११ | (२.५१) | १३.६० |

**इ) सौर औष्णिक ऊर्जा प्रकल्प :**

| २०११-१२ दरम्यान भांडवली खर्चाचे लक्ष्य (लाख/मेवॅ) |
|---|
| रु. १५००.०० |

आर्थिक वर्ष २०११-१२ दरम्यान कार्यान्वित झालेल्या सौर औष्णिक ऊर्जा प्रकल्पांसाठी वीज दर

| नवीन नूतनशील ऊर्जा प्रकल्प - सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी वीज दर (महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० च्या विनियम ३.१ चा संदर्भ) | | | | |
|---|---|---|---|---|
| **तपशील** | **वीज दराचा कालावधी** | **लेव्हलाईज्ड वीज दर (आ.व. २०११-१२)** | **वाढीव घसाऱ्याचा लाभ (घेतला** | **नक्त लेव्हलाईज्ड वीज दर (वाढीव घसाऱ्याचा असल्यास) लाभ समायोजित केल्यानंतर) (घेतला असल्यास)** |
| | **वर्ष** | **(रु./युनिट)** | **(रु./युनिट)** | **(रु./युनिट)** |
| **सौर ऊर्जा प्रकल्प** | | | | |
| सौर औष्णिक ऊर्जा | २५ | १५.२४ | (२.३९) | १२.८५ |

फ) बायोमास ऊर्जा प्रकल्पांसाठी वीज दर :

| |
|---|
| सन २०१०-११ दरम्यान प्रमाणकानुसार भांडवली |
| खर्च : रु. ४०२.५४ लाख/ मेवॉ |

वीज दर : सर्व विद्यमान आणि नवीन बायोमास प्रकल्पांना ३१ मार्च २०१३ पर्यंत वीज दर लागू राहील.

| **आर्थिक वर्ष** | **स्थिर आकार (रु/युनिट)** | **अस्थिर आकार (रु/युनिट)** | **वीज दर (रु/युनिट)** |
|---|---|---|---|
| २०१०-११ ते २०१२-१३ | १.७० | ३.२८ | ४.९८ |

ग) अ-खनिज ऊसाच्या चिपाडावर इंधनावर आधारीत सहनिर्मिती ऊर्जा प्रकल्पांसाठी

## वीज दर :

| |
|---|
| सन २०१०-११ दरम्यान प्रमाणकानुसार भांडवली |
| खर्च : रु. ३९८.०७ लाख/ मेवॉ |

वीज दर : सर्व विद्यमान आणि नवीन अ-खनिज इंधनावर आधारीत सहनिर्मिती ऊर्जा प्रकल्पांना ३१ मार्च २०१३ पर्यंत वीज दर लागू राहील.

| आर्थिक वर्ष | स्थिर आकार (रु/युनिट) | अस्थिर आकार (रु/युनिट) | वीज दर (रु/युनिट) |
|---|---|---|---|
| २०१०-११ ते २०११-१२ | २.२६ | २.५३ | ४.७९ |

अन्-अर्हताकारी अ-खनिज इंधनावर आधारीत सहनिर्मिती प्रकल्पांसाठी (विद्यमान आणि नवीन) आर्थिक वर्ष २०१०-११ दरम्यान वीज दर रु. २१४ प्रति युनिट होता आणि आर्थिक वर्ष २०११-१२ साठी रु. २.१८ प्रति युनिट इतका वीज दर राहील.

**ऊसाच्या चिपाड्यावर आधारित सह-निर्मिती प्रकल्पाच्या विजेसाठी अंतरिम प्रति युनिट दर मंजूर करण्याकरिता मे.काय पॉवर ॲन्ड पेपर लि., यांची याचिका- (सन २०१० चे प्रकरण क्र ८९)**

मे.काय पॉवर ॲन्ड पेपर लि.,(याचिकाकर्ता) ने २४ नोव्हेंबर २०१० रोजी महावितरणच्या ग्रीडला वीज पुरवठा करण्यासाठी अंतरिम प्रति युनिट रु.४.७९ चा दर मंजूर करण्यासाठी आयोगापुढे याचिका सादर केली. या प्रकरणी २० जानेवारी २०११ आणि ९ मार्च २०११ रोजी सुनावण्या झाल्या. या प्रकरणाच्या सर्व बाजू विचारात घेऊन, आयोगाने हे प्रकरण निकाली काढताना असा निर्णय दिला की, सन २०१० च्या प्रकरण २० मध्ये आयोगाने दि.१४ जुलै २०१० रोजी दिलेल्या आदेशात आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१२-१३ पर्यंत अर्हताकारी ऊसाच्या चिपाडयावर आधारित सह-निर्मिती प्रकल्पाकरिता नमूद केलेला लेव्हलाइज्ड वीज दर ३१ मार्च २०१३ पर्यंत चालू राहील. त्यानंतर, आवश्यकता असल्यास, वाहतूक खर्च, माल भरणे व उतरवण्याची मजूरी आणि कामगारांवरील खर्च, इ.मध्ये झालेल्या वाढीमुळे आयोग या चिपाडयावर आधारित सह-निर्मिती प्रकल्पाच्या अस्थिर खर्चाची छाननी करुन वीज दरात सुधारणा करु शकेल. त्यामुळे या टप्प्यावर आयोगाने सन २०१० च्या प्रकरण क्र. २० मध्ये आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१२-१३ पर्यंत अर्हताकारी सह-निर्मिती प्रकल्पांकरिता १४ जुलै २०१० च्या आदेशाने मंजूर केलेले लेव्हलाइज्ड वीज दर ३१ मार्च २०१३ पर्यंत लागू राहणार असल्यामुळे आयोगाला सध्या या लेव्हलाइज्ड वीज दरात बदल करण्याची गरज वाटत नाही.

आयोगाने दि. १४ जुलै २०१० रोजी दिलेल्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१२-१३ पर्यंत लागू असलेल्या लेव्हलाइज्ड वीज दरानुसार महावितरण कंपनी चिपाडयावर आधारित सह-निर्मिती प्रकल्पाकडून वीज खरेदी करण्यास सहमती दर्शविल्याची आयोगाने नोंद घेतली. त्यामुळे याचिकाकर्त्याला रु. ४.७९ हा वीज दर ३१ मार्च २०१३ पर्यंत लागू राहील.

**मे. डी एलआय पॉवर (इंडिया) प्रा.लि., यांनी आयोगाने सन २०१० च्या प्रकरण क्र. २० मध्ये मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१०,नुसार आयोगाने स्वतः दि.१४ जुलै २०१० रोजी पारित केलेल्या आदेशाने निश्चित केलेल्या व्यापक वीज दरासंबंधी स्पष्टीकरण मागणारी याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. ३)**

मे.डी एल आय.पॉवर (इंडिया) प्रा.लि.,(याचिकाकर्ता) ने आयोगाने दि.२७ डिसेंबर २०१० च्या आदेशात १ मेगावॅट पेक्षा जास्त आणि ५ मेगावॅट सह व पर्यंतच्या लघु-जल प्रकल्पांकरिता लागू केलेला रु.४.२६ प्रति युनिटचा लेव्हलाइज्ड वीज दर हा सर्व ३५ वर्षांकरिता लागू राहणार आहे किंवा आयोगाच्या दि. १४ जुलै २०१० च्या आदेशातील परिशिष्ट -२ ए मधील तक्त्यात नमूद करण्यात आलेला फ्रन्ट लोडेड वीज दर लागू राहील, याबाबत स्पष्टीकरण मागण्यासाठी आयोगापुढे याचिका दाखल केली.

या प्रकरणी ११ फेब्रुवारी २०११ रोजी सुनावणी घेण्यात आली आणि

आयोगाने, मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० च्या आधारे, मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१० मधील विनियम, ८ अंतर्गत लघु-जल प्रकल्पासह विविध नूतनशील ऊर्जा प्रकल्पाकरिता व्यापक वीज दर निश्चित करण्याकरिता, आयोगाने सन २०१० च्या प्रकरण क्र. २० मध्ये दि. १४ जुलै २०१० रोजी स्वत: आदेश पारित केला आहे. आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये सुरु झालेल्या नवीन १ मेगावॉट पेक्षा जास्त आणि ५ मेगावॉट सह व पर्यंतच्या लघु-जल प्रकल्पाकरिता लेव्हलाइज्ड वीज दर रु.४.२६ प्रती युनिट हा वाणिज्यिक कामकाजास सुरुवात झाल्याच्या दिनांकापासून ३५ वर्षाच्या कालावधीसाठी लागू राहील; तर सदर आदेशाच्या परिशिष्ट - २ ए मधील नमूना १.२ मध्ये नमूद केलेली फ्रन्ट लोडेड वीज दराची परिगणना ही आर्थिक वर्ष २०१०-११ मध्ये सुरु झालेल्या नवीन जल प्रकल्पाकरिता वीज दर म्हणून विचारात घेण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे, आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये सुरु करावयाच्या नवीन लघु-जल प्रकल्प मिनी आणि मायक्रो जल प्रकल्पांकरिता लेव्हलाइज्ड वीज दर आयोगाद्वारे, सन २०११ च्या प्रकरण क्र. ३९ मध्ये निश्चित करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण) आणि एनटीपीसी यांच्यामध्ये पवन ऊर्जा खरेदीसाठी झालेल्या ऊर्जा खरेदी करारास परवानगी मागण्यासाठी केंद्रीय विद्युत नियामक आयोगाचा (केंविनिआ) दि. ९.११.२०१० रोजीचा आदेश आणि केंविनिआ (नूतनशील ऊर्जा स्रोतांपासून वीज दर निश्चितीकरणासाठी अटी आणि शर्ती) विनियम, २००९ नुसार महावितरण कंपनीची याचिका. (सन २०११ चे प्रकरण क्र. ६६)**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (याचिकाकर्ता) आणि एनटीपीसी यांच्यामध्ये पवन ऊर्जा खरेदीसाठी झालेल्या ऊर्जा खरेदी करारास परवानगी मागण्यासाठी केंद्रीय विद्युत नियामक आयोगाचा दि. ९.११.२०१० रोजीचा आदेश आणि केंविनिआ (नूतनशील ऊर्जा स्रोतांपासून वीज दर निश्चितीकरणासाठी अटी आणि शर्ती) विनियम, २००९ नुसार महावितरण कंपनीने २ मे, २०११ रोजी याचिका दाखल केली. या प्रकरणी ९ मे, २०१० रोजी सुनावणी झाली. आयोगाने याचिकाकर्ता आणि एनटीपीसी यांच्यात स्वाक्षांकित झालेल्या ऊर्जा खरेदी कराराची तपासणी केली. यामध्ये आयोगाला असे निदर्शनास आले की, पवन प्रकल्प कार्यान्वित झाल्याच्या तारखेचा - जी एनटीपीसी मंडळाच्या गुंतवणूक परवानगीच्या अधीन आहे - स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे, लागू करण्यायोग्य वीज दरामध्ये अनिश्चितता आहे. एनटीपीसी ही भारत सरकारची एक कंपनी असून तिच्या वीज दराचे नियमन केंद्रीय विद्युत नियामक आयोगाकडून करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, केंद्रीय विद्युत नियामक आयोगाच्या ९ नोव्हेंबर, २०१० च्या आदेशामध्ये, याचिका क्र. २५६/२०१० (स्वत:हून), उल्लेख करण्यात आलेला पवन ऊर्जा वीज दर आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये कार्यान्वित झालेल्या पवन ऊर्जा प्रकल्पांना लागू आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन, केंद्रीय विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा स्रोतांपासून वीज दर निश्चितीकरणासाठी अटी आणि शर्ती) विनियम, २००९ च्या विनियम ८(१) ला अनुसरुन, केंद्रीय विद्युत नियामक आयोग त्यानंतरच्या वर्षासाठी देखील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानासाठी स्वत:हून व्यापक वीज दर निश्चित करेल. नंतरच्या वर्षासाठी केंविनिआने निश्चित केलेला वीज दर एनटीपीसीच्या त्या वर्षात कार्यान्वित झालेल्या पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी देखील लागू राहील. एनटीपीसीच्या पवन ऊर्जा प्रकल्पासाठी पवन क्षेत्रनिहाय लागू असलेल्या वीज दराच्या सबंधात, ज्या दराने याचिकाकर्ता वीज खरेदी करील, त्या संबंधात याचिकाकर्ता या आयोगास कळवेल आणि आगाऊ परवानगी घेईल.

वरील बाब विचारात घेऊन आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) च्या उप-कलम (बी) आणि (इ) अंतर्गत या आयोगाची कार्ये पार पाडताना, आयोगाने, नंदुरबार जिल्ह्यातील चकाला गावातील ३९ मेवॅ पवन ऊर्जा प्रकल्पातून पवन ऊर्जा प्राप्त करण्यासाठी महावितरण कंपनी आणि एनटीपीसी यांच्यात झालेल्या ऊर्जा खरेदी करारास (इपीए)/पीपीए मान्यता दिली. सुनावणी दरम्यान, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१०च्या विनियम ७.२ च्या परंतुकाचा संदर्भ करण्यात आला होता.

याबाबत असे स्पष्टीकरण देण्यात आले की, वरील परिच्छेदामुळे या प्रकरणातील निर्णयावर विनियम ७.२ च्या परंतुकाचा परिणाम होत नाही; कारण सदर परंतुक, ज्या निर्मिती कंपन्यांच्या वीज दराचे नियमन विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ७९ द्वारे होते, अशा निर्मिती कंपन्यांना लागू होत नाही.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. (आर-इन्फ्रा-वितरण) यांची मविनिआ (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० शी संबंधित विविध मुद्यावर स्पष्टीकरण मागण्यासाठी याचिका (सन २०११ चा प्रकरण क्र.५७)**

आर-इन्फ्रा-वितरणने आयोगासमोर १८ मार्च २०११ रोजी याचिका सादर केली. या याचिकेमधे त्यांनी, (१) व्यापारांकडून नूतनशील ऊर्जा खरेदी केल्यास अशा प्रकरणी ठेवावयाचे ट्रेडिंग मार्जिन (२) आर्थिक वर्ष २०१०-११ आणि २०११-१२ करिता सौर ऊर्जा खरेदीचे बंधन किंवा आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ करिता सौर ऊर्जा खरेदीच्या बंधनाची एकत्रित साध्ये, माफ करणे, (३) ऊसाच्या चिपाडयावर आधारीत नूतनशील ऊर्जेचा पूरवठा करणाऱ्यांना, त्यांनी जर विजेचा पुरवठा महावितरण कंपनीला केला असता तर त्यांना करातून जी सूट मिळाली असती ती सूट जाऊ दिल्यामुळे त्याची भरपाई करण्यासाठी आर-इन्फ्रा-डीला जो अतिरिक्त खर्च सहन करावा लागेल तो ग्राहकांकडून वसूल करण्यास परवानगी देणे, (४) नूतनशील ऊर्जा निर्मात्यांशी जोडलेल्या व्यापाऱ्यांकडून विजेची खरेदी केल्यास अशी खरेदी, जरी अशा ऊर्जेस अधिपसंती देण्यात आली असली किंवा असा निर्माता नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र विनियमाखाली नोंदणीकृत असला तरीदेखील, ही आर-इन्फ्राने/वितरण परवानाधारकाने नूतनशील ऊर्जा खरेदीबाबतच्या बंधनाची पूर्ततेसाठी पात्र समजावयाची का, (५) तसेच महाराष्ट्राबाहेर निर्माण केलेली नूतनशील ऊर्जा पसंतीच्या दराने खरेदी करण्यात आली असल्यास अशी ऊर्जा ही महाराष्ट्रातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेला पुरविण्यात आलेली असेल तर अशी ऊर्जा ही नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनासाठी विचारात घेण्यात येईल का, या मुद्यांबाबत स्पष्टीकरणत मागण्यात आले होते.

आयोगाने नियामक प्रक्रिया अनुसरून आणि पटलावर असलेल्या माहितीच्या आधारे असे स्पष्टीकरण दिले की, परस्परांनी सहमती दिलेली किंमत अधिक ट्रेडिंग मार्जिन 'जर राज्य आयोगाने मान्यता दिलेल्या दरापेक्षा' जास्त नसेल तर वितरण परवानाधारक नूतनशील ऊर्जा वीज व्यापाराकडून घेऊ शकेल. त्याशिवाय, सौर ऊर्जा खरेदीच्या बंधनासंबधी, आयोग आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ करिता आर्थिक वर्ष २०११-१२ च्या अखेरीस एकत्रित आढावा घेईल, त्याचप्रमाणे ऊसावरील कराकरिता होणारा अतिरिक्त खर्च ग्राहकांकडून वसूल करण्यासंबंधी, आयोगाचे असे मत आहे की आर-इन्फ्रा-वितरण आणि वितरण परवानाधारकांनी महाराष्ट्र शासनाने ऊसावरील करातून माफी देण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्यातील अन्य वितरण परवानाधाराकांना लागू होईल असे धोरण आखण्यासाठी, महाराष्ट्र शासनाशी संपर्क साधावा.

चौथ्या मुद्याच्या संदर्भात, नूतनशील ऊर्जेचे निर्माते ज्यांना नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्राची पध्दत स्वीकारावयाची आहे ते त्यांच्या ऊर्जेची विक्री आणि प्रमाणपत्राची विक्री वेगवेगळी करू शकतील. तथापि, ऊर्जेमध्ये प्रमाणपत्राचा समावेश नसल्यामुळे ती मुख्यतः पारंपारिक विजेसमान असते. त्यामुळे 'नूतनशील प्रमाणपत्र पध्दतीखाली' मान्य केलेल्या क्षमेतेवर, वीज व्यापाऱ्याकडूंन किंवा नूतनशील ऊर्जा निमिर्त्याकडून थेट किंवा अन्य परवानाधारकांकडून खरेदी केलेली 'पारंपारिक ऊर्जा' ही नूतनशील ऊर्जेच्या खरेदीची पूर्तता म्हणून बंधनात असलेल्या व्यक्ति किंवा संस्था समजू शकत नाही.

शेवटच्या मुद्याबाबत आयोगाचे असे मत आहे की, विकासक जर, महाराष्ट्र राज्यातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकडे वीज पुरविली जाईपर्यंत, लागू असलेल्या सर्व आकारांचा आणि देय हानीचा भरणा करण्यास तयार असतील तर, ग्राहकांना आंतर-राज्य व्यवहारांशी संबंधित होणारा अतिरिक्त खर्च सहन करावा लागणार नाही. महाराष्ट्रातील राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेकडे पुरवावयाच्या विजेच्या संदर्भात एक आंतर-राज्य व्यवहार म्हणून होणारा खर्च आणि महाराष्ट्रात निर्माण झालेल्या नूतनशील ऊर्जेपासून करावयाच्या वीज खरेदीवरील खर्च हा सारखाच असणार आहे. त्यामुळे, अशा रितीने प्राप्त केलेली वीज, ही जर दीर्घ-कालीन व्यवस्था करण्यात आली असेल तर, वितरण परवानाधारकांने नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाची पूर्तता करण्यासाठी पात्र परिमाण म्हणून विचारात घेण्यात येईल.

## भार नियमन

**महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेची महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सिंगल फेज आणि स्वतंत्र कृषी पंपाचा उपयोगकर्त्यांवर अति भार नियमन लागू केल्यामुळे त्यांनी मविनिआच्या भार नियमन मार्गदर्शक सूत्रांची व पध्दतीचे उल्लघंन केल्यामुळे त्यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई सुरु करण्यासाठी याचिका (सन २०१० च्या प्रकरण क्र. ८१)**

महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने, महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सिंगल फेज आणि स्वतंत्र कृषी फिडरच्या (कृषी भार व्यवस्थापन फिडर्स) उपयोगकर्त्यांवर अति भार नियमन लागू केल्यामुळे त्यांनी मविनिआच्या भार नियमन मार्गदर्शक सूत्रांची व पध्दतीचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्या विरुध्द दंडात्मक कारवाई सुरु करण्यासाठी, याचिका २८ ऑक्टोबर, २०१० रोजी दाखल केली. या याचिकेत कृषी भार व्यवस्थापन फिडर्स्ना कमीत -कमी १० तास विजेचा पुरवठा करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली होती.

सिंगल फेज आणि कृषी फिडर अलगीकरण योजनेला जोडलेल्या कृषी पंपाना वीज पुरवठा करावयाच्या तासांच्या संख्येचा प्रश्न हा केवळ कृषी पंपाकरिता विजेच्या उपलब्धतेचा प्रश्न नसून तो महाराष्ट्र राज्याच्या जल स्त्रोतांचे संवर्धन करण्याच्या धोरणाशी देखील निगडीत असलेला एक प्रश्न असल्यामुळे, आयोगाने महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा सचिवांना या प्रकरणामध्ये एक पक्षकार केले. महाराष्ट्र शासनाने या प्रकरणी त्यांचे लेखी म्हणणे दि. ६ एप्रिल २०११ रोजी पाठविले. त्यामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, महाराष्ट्रातील जनतेला आर्थिक आणि सामाजिक लाभ उपलब्ध करुन देण्यासाठी, राज्यातील जल स्त्रोतांचा टिकाऊ विकास होण्यासाठी आणि त्यांचा इष्टतम वापर व व्यवस्थापन करणे शक्य व्हावे याकरिता, महाराष्ट्र शासनाने, कृषी पंपाना दर दिवशी फक्त ८ तास विजेचा पुरवठा करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. जेव्हा यंत्रणेमध्ये अतिरिक्त वीज उपलब्ध असेल तेव्हा वीज पुरवठा दर दिवशी १० तासापर्यंत रात्रीच्या वेळी करता येईल.

त्यानुसार, आयोगाने आपल्या ९ मे २०११ च्या आदेशाने असा निर्णय दिला की, कृषी पंपाना विजेचा पुरवठा दर दिवशी फक्त ८ तास करण्यात येईल. जेव्हा यंत्रणेमध्ये अतिरिक्त वीज उपलब्ध असेल तेव्हा रात्रीच्या वेळी ११.०० वाजल्यापासून १० तासापर्यंत विजेचा पुरवठा दर दिवशी करण्यात येईल आणि दिवसाच्या वेळी दर दिवशी ८ तासांचा वीज पुरवठा आळी-पाळीच्या तत्वावर (कमाल मागणीचे तास वगळून) करण्यात येईल. यंत्रणेमध्ये वीज पुरवठयाची स्थिती समाधानकारक नसेल तेव्हा कृषी पंपाना विजेचा पुरवठा दर दिवशी फक्त ८ तास करण्यात येईल.

वर नमूद केलेल्या परिस्थितीत, महावितरण विरुध्द दंडात्मक कारवाई सुरु करण्याची गरज नसल्याची आयोगाने नोंद घेतली.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि., ने आयोगाने मान्यता दिलेल्या भार नियमनासाठीच्या कार्यपध्दतीचे पालन न करण्याबाबत आयोगाने स्वतःहून घेतलेली सुनावणी (सन २०१० च्या प्रकरण क्र. २३)**

आयोगाने, महावितरण कंपनीने भार नियमन कार्यपध्दतीचे पालन न केल्या प्रकरणी दि.३० जून २०१० रोजी स्वतःहून सुनावणी आयोजित केली.

आयोगाने ३० मे २०११ च्या आदेशान्वये खालील निरीक्षणे नोंदवून/ निर्देश देऊन ही याचिका निकाली काढली:-

- आयोगाच्या पूर्व-परवानगीशिवाय महवितरण कंपनीने भार नियमनाच्या कार्यपध्दतीत कोणताही बदल एकतर्फी करु नये. तथापि, आयोगाला असे वाटते की, ही परिस्थिति टाळता आली असती जर-
  - ➢ महवितरण कंपनीने परिस्थितीचे गांर्भीय (भार नियमनाचा प्रसंग ६ देखील अवलंबिता येत नाही) आयोगाच्या नजरेस आणून देऊन विचारविनिमय केला असता तर

- ➢ महावितरण कंपनीने त्यांच्या कोराडी युनिट क्र. १, २, ३ आणि ४, भुसावळ युनिट क्र. १, पारस युनिट क्र. २, परळी युनिट क्र. १, २ येथील वीज निर्मिती शून्य भार नियमन करण्यासाठी वापरली असती आणि कोणत्याही परिस्थितीत राज्याच्या सामायिक पूल मधून शून्य भार नियमनासाठी वीज वळवली नसती तर. ही गंभीर बाब आहे. जुन्या युनिटस् मधील ऊर्जेचा वापर केल्यामुळे, महावितरण कंपनीच्या क्षेत्रातील विजेची तुट आणखी वाढली.
- ➢ महावितरण कंपनीने, राज्याच्या सामायिक पूल मधील वीज वापरण्याऐवजी, पुरेशी अतिरिक्त वीज खरेदी करण्याची गरज आहे.

- आयोगाने असा निष्कर्ष काढला की, शून्य भार नियमनांची अंमलबजावणी करण्यासाठी महावितरण कंपनीने ग्रीडची मदत घेतली. दुसऱ्या शब्दात, महावितरणने शून्य भार नियमनाकरिता पुरेशी वीज प्राप्त करुन घेतली नसल्यामुळे महावितरणाच्या काही ग्राहकांना ग्रीडमधील विजेचा त्यांचा हिस्सा मिळू शकला नाही. आयोगाच्या दृष्टीने महावितरणने त्यांच्या वरील जबाबदारीचे पालन न केल्याचा हा एक गंभीर प्रमाद आहे.
- आयोगाने निर्देश दिले की, महावितरण कंपनीने ग्रीडमधील वीज वापरण्याऐवजी महावितरण कंपनीने वीज खरेदी केली असती तर शून्य भार नियमन क्षेत्रातील ग्राहकांनी महावितरण कंपनीला रु. ९२.३८ कोटी प्रदान केले असते. त्यामुळे या रकमेची वसूली शून्य भार नियमन न केलेल्या क्षेत्रात येणाऱ्या महावितरणच्या ग्राहकांकडून इंधन समायोजन आकाराच्या माध्यमातून वसूल करण्यात यावी आणि शून्य भार नियमनाच्या क्षेत्रातील ग्राहकांनी हा अतिरिक्त खर्च सहन करावा.
- महावितरणने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यानुसार भविष्यात जेव्हा मान्यता दिलेल्या भार नियमनाच्या कार्यपध्दतीपासून फारकत घेण्याची गरज असेल तेव्हा महावितरणने आयोगाशी संपर्क साधावा. तोपर्यंत, मान्यताप्राप्त भार नियमनाच्या कार्यपध्दतीशी फारकत घेणारी कोणतेही परिपत्रक महावितरणने निर्गमित करु नये. येथून पुढे, पूर्वनियोजित भार नियमनामध्ये आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही बदल महावितरणने एकतर्फी करु नये.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. चा महावितरणच्या परवाना क्षेत्रातील महसूली विभागांच्या मुख्यालयात शून्य भार नियमन पुढे चालू ठेवण्यासाठी अर्ज (सन २०१० च्या प्रकरण क्र. ७६)**

महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रातील महसूली विभागांच्या मुख्यालयात शून्य भार नियमन १ डिसेंबर २०१० पासून पुढे एक वर्ष चालू ठेवण्यासाठी महावितरणने १ नोव्हेंबर २०१० रोजी याचिका सादर केली.

ही याचिका प्रलंबित असतानाच्या कालावधीकरिता, आयोगाने २६ नोव्हेंबर २०१० च्या आदेशाने शून्य भार नियमनांची मुदत प्रथम २८ फेब्रुवारी २०११ पर्यंत वाढविली आणि त्यानंतर २४ फेब्रुवारी २०११ च्या आदेशाने ही मुदत पुढे आणखी ३० जून २०११ पर्यंत वाढविली.

महावितरणने ७ जून २०११ रोजी एक संकीर्ण अर्ज सन २०११ च्या प्रकरण क्र. ७६ मध्ये दाखल केला. महावितरणने सन २०१० ची प्रकरण क्र. ७६ मधील याचिका मागे घेण्यासाठी परवानगी देण्याची विनंती केली. या प्रकरणी ११ जून २०११ रोजी झालेल्या सुनावणीत महावितरणने असे मत मांडले की, राज्यातील वीज पुरवठयाची स्थिती सुधारली असल्यामुळे, त्यांनी सन २०१० ची प्रकरण क्र. ७६ मधील शून्य भार नियमनाची योजना पुढे चालू ठेवण्यासाठी केलेली याचिका मागे घेण्याचे प्रस्तावित केले आहे.

त्यानुसार, आयोगाने आपल्या २० ऑक्टोबर २०११ च्या आदेशान्वये महावितरणची सन २०११ च्या प्रकरण क्र. ७६ मधील याचिका मागे घेतली म्हणून खारीज केली. या आदेशानुसार, शून्य भार नियमनाच्या मॉडेलचे अस्तित्व १ जूलै २०११ पासून संपुष्टात आले.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ची अन्य प्रादेशिक क्षेत्रातील अ, ब, क, ड गटांच्या विभागातील वीज भार नियमन मागे घेण्यासाठी याचिका (सन २०१० च्या प्रकरण क्र. ९३)**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने २ डिसेंबर, २०११ रोजी अन्य प्रादेशिक क्षेत्रातील अ, ब, क, ड गटांच्या विभागातील वीज भार नियमन मागे घेण्यासाठी दि. १ डिसेंबर २०११ तारीख असलेली याचिका सादर केली.

अन्य प्रादेशिक क्षेत्रातील अ, ब, क, ड गटांच्या विभागातील वीज भार नियमन मागे घेण्याच्या प्रस्तावाचा पाठपुरावा न करण्याचा निर्णय महावितरणने घेतला असल्याचे पत्र महावितरण कंपनीकडून ४ जानेवारी, २०११ रोजी आयोगास प्राप्त झाले.

महावितरण कंपनीने ४ एप्रिल, २०११ रोजी आयोगास प्रतिज्ञा-पत्राद्वारे सादर केले की, महावितरण कंपनीने, जेव्हा कंप्रता योग्य बॅन्डमध्ये असेल तेव्हा केंद्रीय ग्रीडकडून अल्प-कालीन वीज आणि युआय वीज प्राप्त करुन आणि वीज भार व्यवस्थापन योजनांद्वारे वीज भार कमी करुन, भार नियमन पूर्णपणे मागे घेण्यासाठी नियोजन केले असल्यामुळे, महावितरण कंपनीला अन्य प्रादेशिक क्षेत्रातील अ, ब, क, ड गटांच्या विभागातील वीज भार नियमन मागे घेण्यासाठीच्या मूळ याचिकेच्या सुनावणीची आता गरज वाटत नाही. त्यानुसार महावितरण कंपनीने सादर केले की, कृषी वीज भार व्यवस्थापन योजना आणि औद्योगिक ग्राहकांना साप्ताहिक वीज पुरवठा आळीपाळीने करणे, या व्यतिरिक्त संपूर्ण वीज भार नियमन मागे घेण्यात आले आहे.

महावितरण कंपनीने अन्य प्रादेशिक क्षेत्रातील अ, ब, क, ड गटांच्या विभागातील वीज भार नियमन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला / रद्द केला असल्यामुळे आयोगाने २० ऑक्टोबर, २०११ च्या आदेशान्वये विद्यमान याचिका निकाली काढली.

## अन्य आदेश

**विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ८६ (१) (इ) अंतर्गत टाटा पॉवरच्या कर्नाक रिसिव्हींग केंद्र येथे ६०.४८ केडब्ल्यूपी छपरावरील सौर विद्युत प्रकल्पाला वीज जोडणी देण्यासाठी महापारेषण कंपनीला निर्देश**

**देण्याकरिता मे.टाटा पॉवर कंपनी लि. यांची याचिका (सन २०११ चे प्रकरण क्र. ७७)**

कॉर्पोरेट कार्यालयाच्या इमारतीमध्ये होणाऱ्या विजेचा वापर हा रिसिव्हींग केंद्राच्या सहाय्यकारी वापराचा एक भाग म्हणून किंवा पारेषण हानीचा एक भाग म्हणून विचारात घेता येत नाही. कॉर्पोरेट कार्यालयाच्या इमारतीमध्ये वरील ऊर्जेचा वापर मीटरप्रमाणे नोंद घेऊन त्याचा, पारेषण उप-केंद्राच्या सहाय्यकारी वापरापेक्षा वेगळा, हिशोब ठेवणे आवश्यक आहे.

छपरावरील सौर पी.व्ही.प्रकल्प ज्या केंद्र सहाय्यकारी बस (४१५ व्ही) ला सध्या जोडलेला असतो तो, टाटा पॉवर कंपनी - वितरण व्यवसायाच्या, ज्या द्वारे वाणिज्यिक इमारतीला वीजेचा पुरवठा करण्यात येतो. त्या मत्तेचा भाग म्हणून मानण्यात यावा.

सौर प्रकल्पाकडून होणाऱ्या वीज पुरवठयाच्या मीटर मधील नोंदी वेगळया ठेवण्यात याव्या आणि असा पुरवठा हा टाटा पॉवर कंपनी - वितरण व्यवसायाने नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या करावयाच्या पूर्ततेचा एक भाग म्हणून विचारात घेण्यात यावा.

पारेषण ग्रीडच्या उपकेंद्राकडून होणाऱ्या विजेच्या सहाय्यकारी वापराचा हिशोब आणि हाताळणीचा प्रश्न हा चालू कामगिरीचा एक भाग म्हणून पाहता येत नाही. महापारेषण/ महावितरण कंपन्यांना आयोगाचा असा सल्ला आहे की, त्यांनी पुढील दोन महिन्यात या प्रश्नाचा सविस्तर अभ्यास करावा आणि त्यांचे रास्त म्हणणे वेगळया याचिकेद्वारे सादर करावे.

आयोग टाटा पॉवर कंपनी, महापारेषण कंपनी आणि महावितरण कंपनीला असे निर्देश देते की, त्यांनी याबाबतीत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या आदेशाच्या दिनांकापासून चार आठवडयात सादर करावा.

टाटा पॉवर - सौर आणि टाटा पॉवर वितरण यांनी संयुक्तपणे ६०.४८ केडब्ल्यूपी छपरावरील सौर विद्युत प्रकल्पाच्या मीटरमधील नोंदी संयुक्तपणे घेण्याच्या प्रक्रियेचा रास्तपणा ठरविणे व त्याची पडताळणी करणे यासाठी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) हे उचित प्राधिकरण राहील. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राशी संपर्क व्यवस्थेच्या माध्यमातून सौर वीज निर्मितीसाठीच्या मीटरमधील नोंदीची माहिती प्रत्येक ठराविक कालांतराने उपयोगात आणण्यासाठी व्यवहार्यता संबंधित कंपन्या तपासून पाहतील. तसेच, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने टाटा पॉवर कंपनीशी सल्लामसलत करुन, मीटर मधील नोंदीच्या, प्रत्येक ठराविक कालावधीनंतर कमीत-कमी प्रत्येक तिमाहीत एकदा याप्रमाणे पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी एक योग्य कार्यपध्दती निश्चित करेल.

**मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम,२०११ ची अंमलबजावणी पुढे ढकलण्यासाठी बेस्ट उपक्रमाची याचिका (सन २०१० चे प्रकरण क्र. ४३)**

कर्नाक रिसिव्हींग केंद्राच्या छपरावरील सौर प्रकल्पाला जोडणी मंजूर करण्यासाठी महापारेषण कंपनीला निर्देश देण्याकरिता मे. टाटा पॉवर कंपनी लि. ने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ८६ (१) (इ) अंतर्गत दाखल केलेली याचिका

आयोगाने असा निर्णय दिला की, मविनिआ नूतनशील ऊर्जा विनियमानुसार, टीपीसीच्या पारेषण उप-केंद्रातील ४१५ व्ही सहाय्यकांची बसच्या सौर प्रकल्पाची सध्याची जोडणी व्यवस्था ही राज्याअंतर्गत पारेषण यंत्रणेचा आंतरजोडण बिंदू म्हणून समजता येत नाही

बेस्ट उपक्रमाने, विद्युत अधिनिमय,२००३ च्या कलम ९४ (२), मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम,२००४ च्या विनियम ८५ (ए) आणि मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम,२०११ च्या विनियम ४.१, ९९ आणि १०० अंतर्गत, बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम,२०११ ची अंमलबजावणी पुढे ढकलण्यासाठी याचिका सादर केली.

आयोगाने निर्णय दिला की, वीज दराच्या अटी व शर्ती निश्चित करण्यासह वीज दर निश्चित करताना बहु-वर्षीय वीज दराच्या तत्त्वापासून मार्गदर्शन घेणे विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१ च्या खंड (एफ) नुसार आयोगावर बंधाकारक आहे. आयोगाने असे मत व्यक्त केले की, बहु-वर्षीय वीज दराची पध्दत स्वीकारणे आयोगावर बंधाकारक नसल्याच्या बेस्ट उपक्रमाच्या म्हणण्याला कोणताही आधार नाही.

आयोगाने बेस्ट उपक्रमाची व्यवसाय आराखडा आणि बहु-वर्षीय वीज दरासाठी याचिका सादर करताना विहित मुदतीचे वेळेचे बंधन पाळण्यात येणाऱ्या अडचणींची दखल घेतली आणि बेस्ट उपक्रम त्यांचा व्यवसाय आराखडा आणि बहु-वर्षीय वीज दराची याचिका पाच वर्षाच्या कालावधीसाठी प्रथमच दाखल करीत असल्यामुळे, आयोगाने विनियम १०० मधील "अडचणी दूर करण्याचे अधिकारां" चा आधार घेणे आणि त्यानुसार विनियम १९.१ मधील तरतुदींचे पालन करण्यात बेस्टला येणारी अडचण दूर करणे उचित होईल, असे आयोगाला आढळून आले. त्यामुळे, आयोगाने विशिष्ट आदेश पारित करुन त्याद्वारे अडचण दूर करण्यासाठी बेस्ट उपक्रमाला त्यांचा व्यवसाय आराखडा आणि बहु-वर्षीय वीज दरासाठी याचिका सादर करण्याची मुदत चार महियांनी म्हणजेच, ३१ ऑगस्ट २०११ रोजी किंवा त्यापूर्वी, इतकी वाढवून दिली.

**महानिर्मिती कंपनीचे परळी युनिट ६ आणि पारस युनिट ३**

**सन २००९ च्या प्रकरण क्र.१०७**

**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. (महावितरण कंपनी) च्या परळी युनिट ६ व पारस युनिट ३ च्या आर्थिक वर्ष २००७-०८ आणि आर्थिक वर्ष २००८-०९ च्या अचूक समायोजनास मान्यता आणि आर्थिक वर्ष २००९-१० करिता वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वीज दराच्या निश्चितीकरणासाठी याचिका**

महानिर्मिती कंपनीची नवीन औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे -परळी युनिट ६ आणि पारस युनिट ३  ही प्रत्येकी २५० मेगावॉट क्षमतेची केंद्रे असून, ती अनुक्रमे १ नोव्हेंबर, २००७ आणि ३१ मार्च २००८ मध्ये सुरु करण्यात आली. आयोगाने परळी युनिट ६ करिता (सन २००८ चे प्रकरण क्र.२६) बहु-वर्षीय वीज दराचा आदेश २१ ऑक्टोबर, २००९ रोजी पारित केला. या आदेशाद्वारे, आयोगाने परळी युनिट ६ करिता वीज निर्मितीचा दर आर्थिक वर्ष २००७-०८ च्या उरलेल्या कालावधीकरीता (नोव्हेंबर, २००७ ते मार्च २००८), आर्थिक वर्ष २००८-०९ आणि २००९-१० करिता निश्चित केला. आयोगाने पारस युनिट ३ करिता बहु-वर्षीय वीज दराचा आदेश (सन २००८ चे प्रकरण क्र. ९५) दि.१५ डिसेंबर २००९ रोजी पारित केला.

या आदेशात, आयोगाने पारस युनिट ३ करीता वीज निर्मितीचा दर आर्थिक वर्ष २००८-०९ आणि २००९-१० करीता निश्चित केला होता.

महानिर्मिती कंपनीने त्यांच्या वरील याचिकेद्वारे, परळी युनिट ६ आणि पारस युनिट ३ या दोन युनिट्सकरिता आर्थिक वर्ष २००९-१० करीता वार्षिक कामगिरीच्या आढाव्यास आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वीज दरास मान्यता मागितली होती. आयोगाने, आपल्या यापूर्वीच्या वीज दराच्या आदेशात मान्यता दिलेल्या भांडवली खर्चासह याचिका पुन्हा सादर करण्यास महानिर्मिती कंपनीला निर्देश दिले. महानिर्मिती कंपनीने याची पूर्तता केल्यानंतर, आयोगाने या प्रकरणांची सुनावणी घेतली आणि वर नमूद केल्याप्रमाणे आदेश पारित केला.

**सन २०११ च्या प्रकरण क्र. ७९**

**मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम १०० अंतर्गत सन २००९ च्या प्रकरण क्र. १०७ मधील दि. १३ एप्रिल २०११ च्या आदेशाच्या संबंधात महानिर्मिती कंपनीच्या परळी युनिट ६ आणि पारस युनिट ३ मधून आर्थिक वर्ष २०११-१२ मध्ये करावयाच्या ऊर्जेच्या विक्रीवर आदेशातील वीज दराची मुदत वाढविण्यासाठी आणि त्याप्रमाणे आकारणी करणे चालू ठेवण्यासाठी याचिका**

आयोगाने या प्रकरणी सुनावणी घेतली आणि सन २००९ च्या प्रकरण क्र. १०७ मधील आदेशात निश्चित केलेला वीज दर लागू करण्याची मुदत, नवीन वीज दराचा आदेश पारित होईपर्यंत, वाढवून दिली.

**सन २०११ च्या प्रकरण क्र.८१**

**परळी युनिट ६ आणि पारस युनिट ३ च्या आर्थिक वर्ष २००७-०८ आणि आर्थिक वर्ष २००८-०९ चे अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २००९-१० च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१०-११ चा वीज दर निश्चित करण्यासाठी आयोगाच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. १०७ मधील १३ एप्रिल, २०११च्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या. ची याचिका**

आयोगाने सन २००९ च्या प्रकरण क्र. १०७ वरील आदेशामध्ये, याचिकादाराने इंधनावर प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची वसूली करणे आणि दुरुस्तीच्या कामासाठी सक्तीने काम बंद ठेवावे लागल्याने अनुपलब्धता/ कमी पी.एल.एफ.मुळे स्थिर खर्चाची वसूली न करणे, या दोन मुद्यांसाठी परवानगी दिलेली नसल्यामुळे, महानिर्मिती कंपनीने मुख्यत्वे करुन या दोन मुद्यांवर परवानगी मागण्यासाठी ही याचिका सादर केली होती. आयोगाने या प्रकरणी सुनावणी घेऊन आपल्या पूर्वीच्या आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी याचिकादाराने नमूद केलेले मुद्दे ग्राहय धरता येत नसल्याचा आदेश पारित केला.

**सन २०११ च्या प्रकरण क्र.७४ आणि सन २०११ च्या प्रकरण क्र. ७५**

**महानिर्मिती कंपनी विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मविनिआ) आणि अन्य, यांच्या विरोधात मा. विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे दाखल करण्यात आलेल्या सन २०१० च्या अपील क्र.७२ आणि सन २०१० च्या अपील क्र.९९ मधील दि.२४ मे २०११ रोजी देण्यात आलेल्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी याचिका**

आयोगाने, परळी युनिट ६ करिता सन २००८ च्या प्रकरण क्र.२६ मधील २१ ऑक्टोबर २००९ च्या आदेशाने आणि पारस युनिट ३ करीता सन २००८ च्या प्रकरण क्र.९५ मधील १५ डिसेंबर २००९ च्या दिलेल्या आदेशाने, महानिर्मिती कंपनी बाधित झाल्यामुळे या कंपनीने मा. विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे अनुक्रमे २०१० चे अपील क्र.७२ आणि सन २०१० चे अपील क्र.९९ दाखल केले. या अपीलातील महत्वाचे मुद्दे, भांडवली खर्चाची परिगणना, प्रकल्प उभारणीतील विलंबामुळे उभारणीच्या काळातील व्याज आणि मुख्यालयातील खर्च अंशतः नामंजूर करणे, केंद्र-निहाय घसाऱ्यापोटीच्या अग्रिमाची परिगणना नामंजूर करणे इ., असे होते. मा.विद्युत अपील न्यायाधिकरणाने दोन्ही प्रकरणी सुनावणी झाल्यानंतर आपले निकाल दिले. त्यानंतर, मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या आदेशाची पुर्तता करण्यासाठी, आयोगाने यातील प्रश्नांची फेर-तपासणी केली आणि मा.विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या मार्गदर्शक सूत्रांना अनुसरून, वरीलप्रमाणे पुर्नविलोकन आदेश निर्गमित केले.

**महानिर्मिती कंपनीच्या वीज दराच्या आदेशा संबंधात मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाचा निकाल - सन २०११ च्या प्रकरण क्र. ७२**

महानिर्मिती कंपनी विरुध्द मविनिआ आणि अन्य, यांच्याविरुध्द दाखल केलेल्या सन २००९ च्या अपील क्र.१९१ मध्ये मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दि. २७ एप्रिल २०११ रोजीच्या आदेशाच्य अंमलबजावणीसाठी याचिका

आयोगाने महानिर्मिती कंपनीच्या सन २००८ च्या प्रकरण क्र. ११५ मध्ये आर्थिक वर्ष २००९-१० करिता वीज दराचा आदेश १७ ऑगस्ट २००९ रोजी पारित केला. या आदेशात आयोगाने व्यक्त केलेल्या काही निरिक्षण आणि मतांमुळे बाधित होऊन महानिर्मिती कंपनीने मा.विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे सन २००९ चे अपील क्र.१९१ दाखल केले. या प्रकरणी मा.विद्युत अपील न्यायाधिकरणाने २७ एप्रिल २०११ रोजी निकाल दिला. हा आदेश मा.विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणी संबंधी आहे.

**महानिर्मिती कंपनीचे परळी युनिट ७ आणि पारस युनिट ४ - सन २०११ च्या प्रकरण क्र. ६९**

**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी म. (महानिर्मिती कंपनी) ची आर्थिक वर्ष २०१०-११ करिता पारस युनिट ४ आणि परळी युनिट ७ च्या अंतिम वीज दर निश्चित करण्याच्या आणि एकूण महसूली गरजेस मान्यता देण्यासाठी याचिका**

महानिर्मिती कंपनीच्या २५० मेगावॅट परळी युनिट ७ ने वाणिज्यिक दृष्टया कामाची सुरुवात ३१ जुलै २०१० रोजी आणि पारस युनिट ४ ने ३१ ऑगस्ट २०१० रोजी केली. आयोगाने सन २०११ चे प्रकरण क्र. ६९ मध्ये पारस युनिट ४ आणि परळी युनिट ७ करिता आर्थिक वर्ष २०१०-११ साठी अंतिम वीज दरास आणि एकूण महसूली गरजेस मान्यता देण्यासाठी २२ डिसेंबर २०११ रोजी आदेश पारित केला. या आदेशात, मा.विद्युत अपील न्यायाधिकरणाने महानिर्मिती कंपनीच्या परळी युनिट ६ व पारस युनिट ७ करिता भांडवली खर्च निश्चित करण्यासाठी दिलेल्या निर्देशांची नोंद आयोगाने घेतली आणि मा.विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या मार्गदर्शक सूत्रांची पुर्तता केली. महानिर्मिती कंपनीने याचिकेत मागणी केल्याप्रमाणे, परळी युनिट ६ आणि ७ च्या सामाईक उपकरणांवरील संपूर्ण खर्च परळी युनिट ६ च्या नावे टाकण्यात आला आणि पारस

युनिट ३ आणि युनिट ४ मधील संपूर्ण खर्च पारस युनिट ३ च्या नावे टाकण्यात आला.

**महानिर्मिती कंपनीची २०११-१२ करिता एकूण महसूली गरज -सन २०११ च्या प्रकरण क्र. ४४**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी म. (महानिर्मिती कंपनी) ची बहु-वर्षीय वीज दर विनियम -२०११ ची अंमलबजावणी पुढे ढकलण्यासाठी याचिका

**सन २०११ च्या प्रकरण क्र. ६८**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी म. (महानिर्मिती कंपनी) ची आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक कामगिरीचा आढावा आणि सन २०११-१२ वर्षाकरिता वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आणि एकूण महसूली गरजेस मान्यता देण्यासाठी याचिका

**सन २०११ च्या प्रकरण क्र. १०७**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी म. (महानिर्मिती कंपनी) ची आर्थिक वर्ष २००९-१० करिता अचूक समायोजनेस मान्यता देण्यासाठी आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या वार्षिक कामगिरीच्या आढाव्यास मान्यता देण्यासाठी याचिका

वरील तिन्ही आदेश महानिर्मिती कंपनीच्या आर्थिक वर्ष २०११-१२ साठीच्या वीज दरांचे निश्चितीकरण बहु-वर्षीय वीज दर विनियिम, २०११ नुसार न करता ते मविनिआ वीजदर नियम, २००५ नुसार करण्यासंबंधी आहेत.

आयोगाने केलेल्या बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ द्वारे वीज दर विनियम, २००५ रद्द करण्यात आले आहेत. महानिर्मिती कंपनीने आयोगापुढे दाखल केलेल्या याचिकेत अशी मागणी केली की, आर्थिक वर्ष २०११-१२ करिता वीज दर निश्चित करताना, बहु-वर्षीय वीज दर विनियम,२०११, जे १ एप्रिल २०११ पासून लागू करण्यात आले आहेत, त्यांच्याऐवजी वीज दर विनियम, २००५ नुसार लागू करावेत. याचिकाकर्त्याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, बहु-वर्षीय वीज दर विनियम पुढील २ वर्षाच्या कालावधीकरिता महानिर्मिती कंपनीला लागू न करण्यास आयोगाने सहमती दर्शविली. त्यानुसार आयोगाने सन २००१ च्या प्रकरण क्र. १०७ मध्ये पारित केलेल्या आदेशानुसार आर्थिक वर्ष २००९-१० करिता अचूक समायोजन केले आणि आर्थिक वर्ष २०१०-११ करिता वार्षिक कामगिरीचा आढावा घेतला.

**महानिर्मिती कंपनीच्या इंधन समायोजन आकारांची परिगणना करण्याच्या पध्दती बदल - सन २०११ च्या प्रकरण क्र. १०३**

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ (४) नुसार महानिर्मिती कंपनीच्या केंद्रांकरिता इंधन समायोजन आकारांची परिगणना करण्याच्या पध्दतीचे पुर्नविलोकन करण्यासाठी याचिका

आयोगाने, एफ ओ सी ए आदेशाद्वारे सन २००० पासून वीज दराच्या आदेशात विचारात घेण्यात आलेल्या वीज निर्मितीसाठीच्या अस्थिर खर्चाच्या तुलनेत प्रत्यक्ष केलेल्या खर्चात झालेली तफावत ग्राहकांकडून वसूल करण्यासाठी शासकीय वीज निर्मिती आणि वितरण कंपन्याकरिता एक पध्दत आखून दिली. त्यानंतर सन २००५ मध्ये ही पध्दत राज्यातील अन्य विद्युत कंपन्याना देखील वीज दरासंबंधीच्या विनियमाच्या माध्यमातून लागू करण्यात आली. या दोन्ही पध्दती जरी इंधन समायोजन आकाराच्या वसूलीच्या प्रश्नाशी संबधित होत्या तरी त्या दोन्ही पध्दतींमध्ये थोडासा फरक होता-पहिली पध्दत ही सन २००० मध्ये लागू करण्यात आली होती आणि दुसरी पध्दत २००५-०६ लागू करण्यात आली होती व त्यामध्ये केंद्रीय विद्युत नियामक आयोगाच्या आदेशांचा संदर्भ घेण्यात आला होता.

आयोगाने या आदेशाद्वारे हा प्रश्न सोडविला आणि मविनिआ वीज दराच्या विनियम २००५ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या एकच पध्दत राज्यातील सर्व विद्युत वितरण परवानाधारकांना नियतकालिक इंधन समायोजन आकारांची वसूली करण्याकरिता आदेशाच्या दिनांकापासून लागू राहील याची आयोगाने खात्री केली.

**मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि., यांची मुंबई परवानाक्षेत्राकरिता त्यांच्या वितरण परवान्यांची मुदत २५ वर्षासाठी वाढविण्याकरिता/ नूतनीकरण करण्याकरिता याचिका (सन २०१० व प्रकरण क्र. ७८)**

आर-इन्फ्राचा मानीव वितरण परवाना १५ ऑगस्ट २०११ पर्यंत वैध होता. त्यामुळे, आर-इन्फ्राने १ नोव्हेंबर २०१० रोजी याचिका दाखल केली ज्यामध्ये नंतर सुधारणा करण्यात येऊन त्यांनी सुधारित याचिका ४ मार्च २०११ रोजी सादर केली. या सुधारित याचिकेमध्ये त्यांच्या वितरण परवान्याची मुदत १० जुन २००३ पासून किंवा १६ ऑगस्ट २०११ पासून २५ वर्षांनी वाढविण्याची, विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १८ च्या तरतुदीनुसार, विनंती करण्यात आली होती. याला दुसरा पर्याय म्हणून, आर-इन्फ्राने, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ खाली, त्याच्या परवान्याचे नूतनीकरण दि. १६ ऑगस्ट २०११ पासून २५ वर्षाच्या कालावधीकरिता करण्याची विनंती केली.

आयोगाने आपल्या १ एप्रिल २०११ च्या आदेशात असे मत व्यक्त केले की, सर्व अर्जदारांना, मानीव किंवा मानीव नसलेल्या परवान्याच्या मंजूरीसाठी, विद्युत अधिनियम, २००३ च्या संपूर्ण कलम १५ ची तसेच मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मधील आवश्यकतांची पूर्तता, वितरण परवान्याच्या मंजूरीकरिता अर्ज करताना, करावी लागेल. त्यानुसार आयोगाने असा निर्णय दिला की, ही याचिका विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ खाली, परवान्याच्या मंजूरीकरिता केलेला अर्ज म्हणून मानता येणार नाही आणि त्यामुळे विद्युत अधिनियम, २००३ च्या संपूर्ण कलम १५ ची व तसेच मविनिआ (वितरण परवान्याच्या सर्वसाधारण अटी) विनियम, २००६ मधील आवश्यकतांची पूर्तता, वितरण परवान्याच्या मंजूरीसाठी अर्ज करताना, करावी असे निर्देश आयोगाने आर-इन्फ्राला दिले.

**रिलायस इन्फ्रास्ट्रक्चरला त्यांच्या ग्राहकांना वीज पुरवठा करण्याकरिता टाटा पॉवर कंपनी लि.,ने त्यांच्या वीज निर्मिती केंद्रामधून रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरला विजेचा पुरवठा करण्याबाबत (सन २०१० चे प्रकरण क्र.१३)**

महाराष्ट्र शासनाने दि. ०७ मे २०१० रोजी एक "ज्ञापन" निर्गमित केले. सदर "ज्ञापना" मध्ये इतर सूचनांबरोबरच, ५ सदस्यांच्या समितीचा अहवाल देखील नमूद करण्यात आला होता. हा अहवाल, महाराष्ट्र शासनाकडे आर-इन्फ्रा, टीपीसी आणि बेस्ट यांनी, आर-इन्फ्राला

तिच्या ग्राहकांना विजेचा पुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी टीपीसीच्या निर्मिती केंद्रामधून आर-इन्फ्रा विजेचा पुरवठा करण्यासंबंधी, सादर केलेल्या अभिवेदनाच्या संदर्भात, निर्गमित करण्यात आला होता. सदर "ज्ञापनामध्ये", महाराष्ट्र शासनाने असे मत व्यक्त केले होते की, जनहिताच्या दृष्टीकोनातून समितीने सादर केलेल्या अहवालातील काही ठळक तत्वाच्या आधारे आयोगाने या संबंधी योग्य उपाययोजना लवकर करावी.

सदर ७ मे २०१० च्या "ज्ञापनाच्या" संदर्भात, आयोगाने सन २०१० च्या प्रकरण क्र.१३ मध्ये कार्यवाही सुरू केली. आयोगाने बांद्रा येथील रंगशारदा नाटय मंदिरात २८ जून २०१० आणि ३ जुलै २०१० रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली.

महाराष्ट्र शासनाने त्यांच्या ७ जून २०१० च्या "ज्ञापना"मध्ये विहित केलेल्या ठळक तत्वांच्या संदर्भात आयोगाने आपल्या १९ मे २०११ च्या आदेशात खालीलप्रमाणे निर्णय दिलाय:-

अ) **टीपीसीने आपल्या निर्मिती केंद्रामधून मुंबईतील वितरण परवानाधारकांना विजेचा पुरवठा प्राधान्य क्रमाने नियंत्रित / वाजवी दराने करणे आणि आर-इन्फ्राकडे वीज खरेदी करार नसल्यामुळे आपल्या वर्चस्वाचा फायदा घेऊ नये, विजेचा व्यापार करण्यासाठी वीज टीपीसी वितरणाकडे वळवू नये किंवा आर-इन्फ्राला, त्यांच्या ग्राहकांवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून, जादा दराने वीज पुरवठा न करण्याबाबत.**

आयोगाने असे मत व्यक्त केले की, मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी याच प्रकरणी असा स्पष्ट निर्णय दिला आहे की, वीज निर्मात्याला कोणत्याही विशिष्ट वीज विद्युत कंपनीला, विशेषतः जर तिने वीज खरेदी करार केलेला नसेल तर, विजेचा पुरवठा करण्यासाठी सक्ती करता येत नाही आणि कोणत्याही परवनाधारकाच्या ग्राहकांना झालेला त्रास किंवा अन्य वितरण परवानाधारकांना विजेचा पुरवठा करणे योग्य आहे किंवा नाही हे ठरविणे आयोगाच्या अखत्यारित येत नाही.

त्यानुसार आयोगाने निर्णय दिला की, टीपीसी आणि आर-इन्फ्रा यांच्यामध्ये वीज खरेदी करार नसल्यामुळे आयोग टीपीसी-निर्मिती कंपनीला आर-इन्फ्राला विजेचा पुरवठा करण्याची सक्ती करु शकत नाही आणि करु नये.

ब) टीपीसीने वीज खरेदी करारानुसार बेस्ट आणि टीपीसी-वितरणला विजेचा पुरवठा केल्यानंतर टीपीसीकडून जितकी वीज आर-इन्फ्राला वाजवीपणे पुरविण्यात येईल त्याशिवाय, आपल्या ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेली वीज वाजवी दराने उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या अपयशामुळे ग्राहकांना वीज दरात कोणतीही वाढ सहन करावी लागू नये याची खात्री करण्याची जबाबदारी आणि आर-इन्फ्राचे सबसिडी देणारे ग्राहक टीपीसी-वितरणकडे बदलून गेल्यामुळे आर-इन्फ्राच्या सबसिडी मिळणाऱ्या ग्राहकाला वीज दरातील असाधारण वाढीचा धक्का सहन करावा लागू नये यासाठी एक पध्दत अवलंबण्याची गरज, हे विषय आयोगाने, आर-इन्फ्राने त्यांच्या आर्थिक वर्ष २०१०-११ च्या एकूण महसूली गरज आणि वीज दर निश्चिती करण्यासाठी आर-इन्फ्राने सादर केलेली याचिकेवर (त्यावेळी प्रलंबित असलेल्या सन २०१० चे प्रकरण क्र. ७२) कार्यवाही करताना विचारात घेण्याचा निर्णय घेतला.

क) मुंबईमधील परवानाधारकांना विजेचा पुरवठा केल्यानंतर जर अतिरिक्त वीज शिल्लक राहिली तर अशी शिल्लक वीज मुंबईमध्ये अन्य वितरण परवानाधारकांपैकी ज्यांच्याकडे कमी वीज उपलब्ध असेल त्यांना खरेदीच्या सरासरी खर्चा इतक्या दराने किंवा आयोगाने निश्चित करावयाच्या अन्य कोणत्याही वाजवी दराने विजेचा पुरवठा करण्याबाबत, आयोगाने असा निर्णय दिला की, या प्रश्नावर सन २०१० च्या प्रकरण क्र. ९ मधील दि. २३ ऑगस्ट २०१० च्या आदेशाने यापूर्वीच निर्णय देण्यात आला आहे.

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., ने पारेषण आकारांची मागणी करणारे दि.३० मार्च २०१० चे पत्र रद्द करण्यासाठी मे.वर्धा पॉवर कंपनी लि., ची याचिका (सन २०१० च्या प्रकरण क्र. २९)**

मे.वर्धा पॉवर कंपनी लि., ने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (एफ) सह मविनिआ (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २००५ मधील विनियम ९.४ खाली, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., ने पारेषण आकारांची मागणी करणारे निर्गमित केलेले दि. ३० मार्च २०१० चे पत्र रद्द करण्यासाठी, एक याचिका दि. ९ जून २०१० च्या प्रतिज्ञापत्राद्वारे सादर केली.

आयोगाने आपल्या १ जून २०११ च्या आदेशाने निर्णय दिला की, दि. १९ डिसेंबर २००९ रोजी वहन व्यवस्था चालू होती आणि त्यामुळे, याचिकाकर्त्या मे.वर्धा पॉवर कंपनी लि., ने दि. १९ डिसेंबर २००९ ते ३० मार्च २०१० या कालावधीतील १०१ दिवसांकरिता होणाऱ्या पारेषण आकारांची रक्कम रु. ९,०४,०६,१२०.१० महापारेषण कंपनीला त्यांनी पाठविलेल्या दि. ३० मार्च २०१० च्या देयकाप्रमाणे, शेडयूल बँकेच्या प्रचलित व्याज दराने व्याजासह, महापारेषण कंपनीला या आदेशापासून ४ आठवडयाच्या आत अदा करावी.

**मे.अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा.लि. यांची, विद्युत प्रकल्प सुरु करण्यासाठी लागणाऱ्या विजेच्या जोडणीला वीज दरातील वर्गवारी लागू करण्यासंबंधीच्या, महावितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१०-११ मधील वीज दर निश्चितीकरण्याबाबतच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. १११ मधील दि.१२ सप्टेंबर २०१० च्या आदेशासंबंधी स्पष्टीकरण मागणारी याचिका (सन २०११ च्या प्रकरण क्र. ३७)**

मे.अभिजीत एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा.लि. यांनी, विद्युत प्रकल्प सुरु करण्यासाठी लागणाऱ्या विजेच्या जोडणीला वीज दरातील वर्गवारी लागू करण्यासंबंधीच्या, महावितरण कंपनीच्या आर्थिक वर्ष २०१०-११ मधील वीज दर निश्चितीकरणाबाबतच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. १११ मधील दि. १२ सप्टेंबर २०१० च्या आदेशासंबंधी स्पष्टीकरण मागण्याकरिता एक याचिका दाखल केली.

आयोगाने आपल्या २० जुलै २०११ च्या आदेशात नमूद केले की, विद्युत प्रकल्पाच्या नित्याच्या कामकाजात सहाय्यकारी उपकरणांसाठी लागणारी वीज ही प्रकल्पाने स्वत: निर्माण केलेल्या विजेतून घेण्यात येते. परंतु, विद्युत प्रकल्प बंद पडण्यासारख्या आणीबाणीच्या प्रसंगी, प्रकल्प सुरु करण्यासाठी प्रकल्पाच्या सहाय्यकारी उपकरणांना वीज पुरवठा करण्यासाठी ग्रीडमधून

पुरवठा करणे आवश्यक ठरते. ग्रीडमधून अशी मदत, प्रकल्प कोणत्या प्रकारचा असेल त्यावर अवलंबून, फक्त काही काळापुरती आवश्यक असते. विद्युत यंत्रणेचा विद्युत प्रकल्प हा एक महत्वाचा भाग असल्यामुळे ग्रीडमधून अशी मदत देणे आवश्यक असते. तथापि, अशा रितीने दिलेल्या ग्रीडच्या मदतीचा हिशोब म्हणजेच वापरलेल्या युनिटस्चे समायोजन ग्रीडमध्ये पुरवठा केलेल्या विजेतून करावयाचे का अशा प्रकल्पाने वापरलेल्या युनिटस् करिता प्रकल्पाला आकारणी करावयाची का, याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. हा प्रश्न केवळ महाराष्ट्र राज्यापुरता नसून तो राष्ट्रीय पातळीवर देखील लागू होत असल्यामुळे आयोगाचे असे मत आहे की, केंद्रीय विद्युत प्राधिकरण ही केंद्रीय पातळीवर असलेली एक तांत्रिक संस्था असल्यामुळे या विषयावर मार्गदर्शक सूत्रे निश्चित करण्यासाठी ती एक उचित प्राधिकरण आहे. त्यामुळे आयोगाने दोन्ही पक्षकारांना वरील विषयासंबंधी केंद्रीय विद्युत प्राधिकरणांशी संपर्क साधण्याचे निर्देश दिले आणि त्यानंतर या विषयाशी संबंधीत सर्व अनुकूल व प्रतिकूल मुद्दे विचारात घेतल्यानंतर, आवश्यकता असल्यास, महावितरण कंपनी त्यांच्या येत्या वीज दर निश्चितकरणाच्या याचिकेत सुरुवातीच्या वीज वापरासाठी जोडणीकरिता वीज दरात वेगळी वर्गवारी प्रस्तावित करु शकेल.

**सन २०११ चे प्रकरण क्र.५९**

ग्रामपंचायत, रत्नागिरी, यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या याचिकेत अशी विनंती केली की, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच्याच्या स्तरावर स्वंयसेवी ग्राहक संस्थेला ग्राहकांचे गाऱ्हाणे मांडता येण्याचा अधिकार असावा यासाठी "तक्रारदार" या शब्दाची व्याख्या ज्याप्रमाणे ग्राहक संरक्षण अधिनियम- १९८६ च्या कलम २ (१) (बी) (दोन) मध्ये केली आहे ती महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये स्वीकारण्यासाठी या विनियमांमध्ये सुधारणा करण्यात यावी. सदर विनियमांमध्ये फक्त ग्राहकाला त्याचे/ तिचे गाऱ्हाणे ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच/ विद्युत लोकपाल यांच्यापुढे मांडण्याची परवानगी आहे.

याचिकाकर्त्याने विद्युत अधिनियम २००३ मधील कलम १७५ चा संदर्भ देऊन असे सादर केले की, विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदी या, त्या वेळेपुरत्या अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्यात न्यूनता आणण्यासाठी नसून या तरतूदी या त्या त्या कायद्यांमध्ये असणाऱ्या तरतुदींशिवाय अतिरिक्त तरतुदी आहेत आणि अन्य राज्यांबरोबर दिल्ली, गुजरात, उत्तराखंड या राज्यातील विद्युत नियामक आयोगांनी त्यांच्या राज्यातील स्वंयसेवी ग्राहक संघटनांना ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल यांच्यापुढे गाऱ्हाणे मांडण्यास परवानगी दिली आहे.

राज्यातील सर्व चारही वितरण परवानाधारकांना या याचिकेत पक्षकार करण्यात आले होते, याचिकाकर्त्याने मागणी केल्याप्रमाणे विनियमांमध्ये सुधारणा करण्यास वितरण परवानाधारकांनी योग्य कारणमीमांसेसह विरोध केला.

आयोगाने या संबंधी दि. २५ जानेवारी २०१२ रोजी आदेश पारित केला आणि तसे मत व्यक्त केले की, विद्युत अधिनियम २००३ मधील कलम २ (१५) मध्ये "ग्राहक" या शब्दाची अशी व्याख्या करण्यात आली आहे की, "अशी व्यक्ति जिला विजेचा पुरवठा स्वत:च्या वापरासाठी करण्यात येतो---- आणि त्यामध्ये ज्या व्यक्तीच्या जागेला त्या वेळेपुरता विजेचा पुरवठा प्राप्त करुन घेण्यासाठी विजेची जोडणी देण्यात आलेली आहे अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो"----तसेच, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम २ (१५) आणि कलम ४२ (५), (६) आणि (७) यांचे एकत्र वाचन केले असता ग्राहक गाऱ्हाणे मंच आणि विद्युत लोकपाल यांच्यासमोर "ग्राहका" शिवाय अन्य कोणालाही गाऱ्हाणे /अभिवेदन दाखल करण्यासाठी परवानगी देण्यासाठी वाव नाही. त्याशिवाय, कोणत्याही स्वंयसेवी ग्राहक संघटनेला तक्रार दाखल करण्याची इच्छा असेल तर विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२ (८) खाली विहित करण्यात आलेल्या अधिकारांनुसार, अशी संघटना एक तक्रारदार म्हणून ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत असलेल्या यंत्रेणेकडे जाऊ शकते.

आयोगाने आपल्या दि. २५ जानेवारी २०१२ च्या आदेशात याचिकाकर्त्याच्या मागणीनुसार विनियमांमध्ये सुधारणा केल्यास ते विद्युत अधिनियम २००३ च्या पलीकडे गेल्यासारखे होईल असा निर्णय देऊन, सन २०११ चे प्रकरण क्र. ५९ खारिज केले.

**बेस्ट उपक्रमाची मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ अंतर्गत आर्थिक वर्ष २०११-१२ करिता वार्षिक महसूली गरज आणि वीज दर निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करण्यासाठी परवानगी मागण्याकरिता याचिका**

बेस्ट उपक्रमाने १९ ऑक्टोबर २०११ च्या प्रतिज्ञापत्राद्वारे, मविनिआ (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ अंतर्गत आर्थिक वर्ष २०११-१२ करीता वार्षिक महसूली गरज आणि वीज दर निश्चितीकरणासाठी याचिका दाखल करण्यासाठी परवानगी मागण्याकरिता याचिका सादर केली. आयोगाने सन २०११ च्या प्रकरण क्र. ४३ मधील ५ मे २०११, च्या आदेशाने बेस्ट उपक्रमाला, मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ नुसार, जे १ एप्रिल २०११ पासून अंमलात आले आहेत, व्यवसाय आराखडा सादर करण्यासाठीची मुदत ४ महिन्यांनी वाढवून दिली. त्यानुसार, बेस्ट उपक्रमाने त्यांचा व्यवसाय आराखडा २५ ऑगस्ट २०११ रोजी सादर केला. बेस्ट उपक्रम त्यांची बहु-वर्षीय वीज दराची याचिका, त्यांच्या व्यवसाय आराखडयास मान्यता मिळाल्यानंतरच, सादर करु शकणार होते. व्यवसाय आराखडयाला मंजूरी आर्थिक वर्ष २०११-१२ च्या अखेरीस दिली जाण्याची शक्यता होती. त्यामुळे, याचिकाकर्त्याला आर्थिक वर्ष २०११-१२ साठी वार्षिक महसूली गरज आणि वीज दराची याचिका वेगवेगळया सादर करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. त्यामुळे आयोगाने, सन २०११ च्या प्रकरण क्र. १५० मधील ३० नोव्हेंबर २०११ च्या आदेशाने बेस्टला बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटी अंतर्गत वीज दर निश्चित करण्यातून ३१ मार्च २०१२ पर्यंत सूट दिली आणि बेस्ट उपक्रमाला निर्देश दिले की, त्यांनी, मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम ४.१ च्या दुसऱ्या परंतुकाच्या अंतर्गत त्यांची आर्थिक वर्ष २०११-१२ साठी वार्षिक महसूली गरज आणि वीज दर निश्चितीकरणासाठी याचिका ३० नोव्हेंबर २०११ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करावी.

## ग्राहक आधार आणि गाऱ्हाणे निवारण यंत्रणा

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२(५) आणि ४२(६) नुसार राज्यात,

वितरण परवानाधारकांनी स्थापन केलेल्या ग्राहक ग्राऱ्हाणे निवारण मंचाचे (सीजीआरएफ), आणि आयोगाने नेमलेल्या विद्युत लोकपाल यांचे कामकाज राज्यामध्ये प्रभावीपणे सुरु झालेले आहे. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयांच्या स्थापनेमुळे विद्युत ग्राहकांना त्यांच्या तक्रारींसाठी न्यायालयात न जाता सोडविणे शक्य झाले आहे.

## ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच :

राज्यातील चार वितरण कंपन्यांनी स्थापन केलेले एकूण १४ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच सध्या राज्यात कार्यरत आहेत. आयोगाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००३, हे विनियम तयार केल्यानंतर हे ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच स्थापन होण्यास सुरुवात झाली. हे विनियम २००६ मधील नवीन विनियमांद्वारे बदलण्यात आले असून त्यात २००७ मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्यात आली आहे.

२००७ मध्ये सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००६ नुसार ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाच्या कोणत्याही सदस्याचा (प्रत्येक मंचामध्ये ३ सदस्य, म्हणजेच एक अध्यक्ष आणि दोन सदस्य असतात) कार्यकाल संपल्यानंतर सदस्याचे पद भरण्यात येते. या मंचांमध्ये दोन सदस्यांपैकी एक सदस्य ग्राहकांचा प्रतिनिधी असतो आणि ग्राहक प्रतिनिधी पदासाठी इच्छुक व्यक्तिंकडून आलेल्या अर्जांमधून पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या व्यक्तीची नेमणूक आयोगाकडून नामनिर्देशाद्वारे वितरण कंपनीकडे करण्यात येते. अहवालाधीन काळांत, विद्यमान सदस्यांचा कार्यकाल संपल्यानंतर, ६ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे अध्यक्ष आणि एका ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे सदस्य, यांच्या बदली आलेल्या अर्जातून निवड करुन सुयोग्य नवीन व्यक्ती नेमण्यात आल्या किंवा जुन्या व्यक्तींची फेरनेमणूका करण्यात आल्या.

अहवालाधीन वर्षात, सन २०११ मध्ये बाधित विद्युत ग्राहकांनी सुमारे ११०० तक्रारी (याच कालावधीत मागील वर्षी १३५० तक्रारींच्या तुलनेत) राज्यांतील १४ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडे दाखल केल्या. सर्व ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांनी यापैकी ९६६ तक्रारींचे निवारण (मागील वर्षी १०५९ तक्रारींचे निवारण) केले. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडून कार्यवाही केलेल्या एकूण तक्रारींपैकी सर्वाधिक तक्रारी कोल्हापूर परिमंडलमधून (३६० तक्रारी) आल्या, त्यापाठोपाठ कल्याण परिमंडलचा क्रमांक (१८३ तक्रारी) लागतो.

ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांचे सदस्य, विद्युत लोकपाल, ग्राहक प्रतिनिधी आणि वितरण परवानाधारक यांची वार्षिक एक दिवसाची परिषद - ज्यामध्ये मागील वर्षी विविध ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांनी निवारण केलेल्या ग्राहकांच्या तक्रारीचा आढावा घेण्यात येतो आणि ग्राहकांच्या तक्रारी सोडविण्याच्या संदर्भात ग्राहकांना चांगली सेवा देण्याचे मार्ग आणि पध्दती याबाबत चर्चा करण्यात येते - मार्च २०१२ अखेरपर्यंत काही अपरिहार्य कारणांमुळे होऊ शकली नाही. ही परिषद एप्रिल, २०१२ मध्ये घेण्याचे ठरविले आहे.

## विद्युत लोकपाल (इलेक्ट्रिसिटी ओम्बड्समन)

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ (६) अन्वये दि. २७ डिसेंबर, २००४ रोजी विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयाची स्थापना झाली आणि त्वरित कार्यान्वित करण्यात आले. त्या दिवसापासून, अधिनियमाच्या कलम ४२ (५) अन्वये या कार्यालयाकडे गाऱ्हाणी न सोडविली गेल्यामुळे बाधित झालेल्या ग्राहकांकडून निवेदने येण्यास सुरुवात झाली. विद्युत लोकपालांकडे येणाऱ्या अभिवेदनांच्या संख्येत वाढ होत आहे.

२७ डिसेंबर, २००७ रोजी विद्युत लोकपाल पदाचा कार्यभार सांभाळणाऱ्या श्री डब्ल्यु. जी. गोरडे यांचा कार्यकाल २६ डिसेंबर, २०१० रोजी समाप्त झाल्यानंतर डॉ. सुरेश जोशी, भाप्रसे (निवृत्त) यांनी २० जानेवारी, २०११ रोजी विद्युत लोकपाल पद स्वीकारले.

राज्यातील विद्युत ग्राहकांची सोय विचारात घेऊन, विद्युत लोकपाल कार्यालयाकडे दाद मागण्यासाठी जाण्यास लागणारा कालावधी कमी करण्यासाठी आयोगाने सन २०११ मध्ये राज्यात एका ऐवजी दोन विद्युत लोकपालांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, नागपूर येथे विद्युत लोकपालांचे नवीन पद निर्माण करण्यात आले. न्या. श्री के. जे. रोही यांची विद्युत लोकपाल (नागपूर) म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी १ जुलै, २०११ पासून कार्यास सुरुवात केली. ग्राहकांना विद्युत लोकपाल कार्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी लागणाऱ्या कालावधीच्या आधारे, दोन्ही विद्युत लोकपालांमध्ये जिल्हा-निहाय क्षेत्रांची खालीप्रमाणे वाटणी करण्यात आली :-

**विद्युत लोकपाल (मुंबई)** : मुंबई, मुंबई-उपनगरे, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातातरा, पुणे, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, नंदुरबार.

**विद्युत लोकपाल (नागपूर)** :अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया, लातुर, बीड, नांदेड, उस्मानाबाद, औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली.

विद्युत लोकपाल (मुंबई) यांनी सन २०११-१२ मध्ये ११८ अभिवेदनांवर निर्णय दिला. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००६ नुसार ग्राहकांकडून आलेल्या अभिवेदनावर ६० दिवसामध्ये निर्णय घ्यावयाचा आहे. मुंबई विद्युत लोकपालांनी अभिवेदनांवर निर्णय देण्यासाठी सरासरी ३६ दिवसांचा अवधी घेतला. विद्युत लोकपाल (नागूपर) यांनी त्यांची नियुक्ती झाल्यापासून या वर्षभरात २१ अभिवेदनांवर निर्णय दिला.

विद्युत लोकपालांकडे आलेल्या अभिवेदनांपैकी बहुतांश अभिवेदने देयक, सदोष मीटर, वीज पुरवठ्याची गुणवत्ता आणि सेवेतील त्रुटी याबाबत होती. वाढत्या जागरुकतेबरोबर, ग्राहकांनी सेवेतील त्रुटी आणि वितरण परवानाधारकांना सेवा देताना निकष पाळण्यात आलेले अपयश याविषयी तक्रारी येण्यास सुरुवात झाली. बाधित ग्राहकांनी विविध प्रकरणी नुकसानभरपाईचा दावा केला आहे. काही

प्रकरणी सेवेतील त्रुटींसाठी, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५, नुसार नुकसानभरपाई देण्याचा निकाल देण्यात आला.

विद्युत अधिनियम, २००३ मध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे ग्राहकांच्या तक्रारींच्या त्वरित आणि अ-खर्चिक निवारणासाठी विद्युत लोकपाल ही यंत्रणा एक कार्यक्षम पर्यायी उपाययोजना आहे.

याशिवाय, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच/विद्युत लोकपाल यांनी दिलेल्या आदेशांची पूर्तता करण्यास दिरंगाई करणाऱ्या किंवा या आदेशांची पूर्तता न करणाऱ्या वितरण परवानाधारकांच्या कृतीमुळे बाधित झालेल्या ३४ ग्राहकांनी अधिनियमातील संबधित कलमा अंतर्गत आयोगाकडे तक्रारी दाखल केल्या.

या माहितीवरुन असे निदर्शनास येते की, विद्युत ग्राहकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी सतत जागृती होत आहे तसेच त्यांच्या तक्रारींच्या निवारणार्थ विविध व्यासपीठ उपलब्ध होत आहेत.

## अधिनियम आणि विनियमांची पूर्तता

प्रत्येक वितरण परवानाधारक त्यांच्या ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांची स्थापना करील, असे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल विनियम), २००६ मध्ये विहित करण्यात आले आहे. वितरण परवानाधारकाने त्याच्या संचालन क्षेत्रातील प्रत्येक वितरण परिमंडलामध्ये किमान एक मंच स्थापन करावा, अशी विनियमांमध्ये तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) ने त्यांच्या क्षेत्रात सन २००९ मध्ये बारामती, जळगाव आणि नांदेड हे तीन नवीन संचालन परिमंडल निर्माण केल्यानंतर, सन २०१० मध्ये आयोगाकडे ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच स्थापन करण्यापासून सूट मिळण्याची विनंती करणारी याचिका दाखल केली.

महावितरण कंपनीने नव्याने निर्माण करण्यात आलेल्या परिमंडलांमध्ये नवीन मंचांची स्थापन न करण्याबाबत दिलेल्या कारणांचा अभ्यास केल्यानंतर, आयोग, नव्याने निर्माण करण्यात आलेल्या परिमंडलांमध्ये नवीन मंचाची स्थापना करण्याची गरज नसल्याबाबत महावितरण कंपनीच्या मताशी सहमत झाला नाही. तथापि, महावितरण कंपनीने, सुरुवातीला नवीन परिमंडलांच्या कार्यक्षेत्रात मंचाच्या सुनावण्या, त्याबाबत ग्राहकांमध्ये विविध सूचना व प्रसारण साधनांद्वारे माहिती प्रसारित करुन साप्ताहिक तत्वावर, घेण्यास परवानगी दिली.

या प्रकरणी झालेल्या सुनावणीच्या दरम्यान, प्रतिवादी ग्राहक प्रतिनिधींनी महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांचे हक्क आणि गाऱ्हाणे निवारणासाठीची कार्यपध्दती याविषयी विद्युत ग्राहकांमधील जागरुकतेच्या पातळीबाबत निवेदन सादर केले. आयोगाने आपल्या कार्यालयास महावितरण कंपनीच्या क्षेत्रातील ग्राहकांमधील जागरुकतेच्या पातळीचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण करण्यासाठी अभ्यास आयोजित करण्याचे निर्देश दिले.

या सर्वेक्षणासाठी आयोगाच्या कार्यालयाने नवी दिल्ली येथील अनुभवी संस्थेची नियुक्ती केली आहे.

### टाटा पॉवर कंपनी लि. चा ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच:

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल विनियम), २००६ च्या विनियम, ४.१ च्या परंतुक (सी)- "जर वितरण परवानाधारकाच्या महाराष्ट्र राज्यातील त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांची संख्या एक लाख पन्नास हजारहून (१,५०,०००) कमी असेल तर मंच हा एक सदस्याचा असेल......", नुसार टाटा पॉवर कंपनीने स्थापन केलेल्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच पूर्वी केवळ एक सदस्य मंच होता. अहवाल वर्षात त्यांच्या वितरण क्षेत्रातील विद्युत ग्राहकांची संख्या वाढल्यामुळे टाटा पॉवर कंपनीने आता एकूण तीन सदस्यांचा मंच स्थापन केला आहे.

## परिशिष्ट १

## २०११-१२ मध्ये आयोगासमोर दाखल झालेल्या याचिका

| क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्राहक पंचायत, रत्नागिरी | उल्लेख नाही | २५.०१.२०११ | २०११ चे ५९ | ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ च्या कलम २(१) (बी) (दोन) नुसार तक्रारदाराची व्याख्या स्वीकारण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००६ मध्ये सुधारणा |
| २ | अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड | उल्लेख नाही | ०७.०४.२०११ | २०११ चे ६० | अदानी पॉवर महाराष्ट्र लि. (एपीएमएल) च्या आ.व. २०११-१२ ते आ.व. २०१५-१६ मधील पारेषण व्यवसायाच्या वीज दराच्या निश्चितीकरणासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ अंतर्गत याचिका |
| ३ | मे. राज लॅबोरेटरीज् | महावितरण कं. | २६.०४.२०११ | २०११ चे ६१ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांच्या आदेशाचे पालन न केल्याबाबत महावितरण कंपनी विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६ अंतर्गत याचिका |
| ४ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. | उल्लेख नाही | १५.०४.२०११ | २०११ चे ६२ | महापारेषण कंपनीसाठी वीज दर निश्चितीकरणाची तत्वे आणि मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ लागू करणे लांबणीवर टाकण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्याबाबत सदर विनियमांतील समर्थकारी तरतुदी अंतर्गत याचिका |
| ५ | मे. एमईसी इंजिनिअर्स | महावितरण कं. | २६.०४.२०११ | २०११ चे ६३ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांच्या आदेशाचे अंशतः पालन न केल्याबाबत महावितरण कंपनीविरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६ अंतर्गत याचिका |
| ६ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | ०६.०४.२०११ | २०११ चे ६४ | सामंजस्य कराराच्या माध्यमातून वीज प्राप्त करण्यासाठीची ५.१.२०११ ची अंतिम कालमर्यादा वाढविण्यासाठी याचिका |
| ७ | मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | उल्लेख नाही | २५.०४.२०११ | २०११ चे ६५ | अर्जदाराच्या विद्यमान परवानाक्षेत्रालगतच्या चेने आणि वर्सोवासह मुंबई उपनगर आणि परिसरात विजेचा पुरवठा करण्यासाठी वितरण परवान्याच्या मंजुरीसाठी अर्ज |
| ८ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | उल्लेख नाही | २९.०४.२०११ | २०११ चे ६६ | केंद्रीय विद्युत नियामक आयोगाचा (केंविनिआ) दि. ०९.११.२०१० चा आदेश आणि केंविनिआ विनियम, २००९ नुसार महावितरण आणि एटीपीसी यांच्यामध्ये पवन ऊर्जा खरेदीसाठी झालेल्या ऊर्जा खरेदी करारास मान्यता मिळण्यासाठी याचिका |
| ९ | मे. जेएसडब्ल्यु एनर्जी लि. | महावितरण कं. | २८.०४.२०११ | २०११ चे ६७ | मे. जेएसडब्ल्यु एनर्जी लि. आणि महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांच्यामध्ये उद्भवलेल्या वादाच्या अभिनिर्णयासाठी मे.जेएसडब्ल्यु एनर्जी लि. यांनी दाखल केलेली याचिका. |
| १० | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | ३१.०३.२०११ | २०११ चे ६८ | सन २०१०-११ साठी वार्षिक कामगिरीचा आढावा आणि वीज दराचे निश्चितीकरण आणि सन २०११-१२ करिता एकूण महसुली गरजेस मान्यता मिळविण्यासंबंधी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. ची याचिका |
| ११ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | ३१.०३.२०११ | २०११ चे ६९ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं.लि. च्या परळी युनिट क्र. ७ आणि पारस युनिट क्र. ४ करिता सन २०१०-११ आणि सन २०११-१२ साठी वीज दराच्या निश्चितीकरण आणि एकूण महसुली गरजेस मान्यतेसंबंधी याचिका |
| १२ | मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | उल्लेख नाही | १३.०५.२०११ | २०११ चे ७० | पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठी रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. ची याचिका |
| १३ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | १६.०५.२०११ | २०११ चे ७१ | महानिर्मिती कं. आणि महावितरण कं. यांच्यामध्ये दि. १ एप्रिल, २००९ रोजी स्वाक्षांकित झालेल्या ऊर्जा खरेदी कराराच्या पुरवणीस मान्यता मिळविण्याबाबत मा. आयोगाने दि. ३० मार्च २०११ (सन २०१० चे प्रकरण क्र. १०३) रोजी दिलेल्या आदेशाचे पुर्विलोकन करण्यासाठी याचिका |

| क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १४ | आयोग स्वतः | महानिर्मिती कं. | - | २०११ चे ७२ | महानिर्मिती कं. विरुध्द मविनिआ आणि अय - अपील क्र. २००९ चे १९१ मध्ये मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दि. २७ एप्रिल, २०११ रोजी दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी आयोगाने स्वतः सुरु केलेली कार्यवाही |
| १५ | दि टाटा पॉवर कं. लि. | उल्लेख नाही | १८.०५.२०११ | २०११ चे ७३ | बहु-वर्षीय वीज दर विनियमांमधील अतिरिक्त/ सुधारित निकषांना मान्यता मिळण्यासाठी मे. टाटा पॉवर कं. लि. ची याचिका |
| १६ | आयोग स्वतः | महानिर्मिती कं. | - | २०११ चे ७४ | महानिर्मिती कं. विरुध्द मविनिआ आणि अन्य - अपील क्र.२०१० चे ७२ मध्ये दि. २७ एप्रिल, २०११ रोजी मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी आयोगाने स्वतः होऊन सुरु केलेली कार्यवाही |
| १७ | आयोग स्वतः | महानिर्मिती कं. | - | २०११ चे ७५ | महानिर्मिती कं. विरुध्द मविनिआ आणि अन्य - अपील क्र. २०१० चे ९९ मध्ये दि. २४ मे, २०११ रोजी मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी आयोगाने स्वतः सुरु केलेली कार्यवाही |
| १८ | दि टाटा पॉवर कं. लि. | उल्लेख नाही | ३१.०५.२०११ | २०११ चे ७६ | टीपीसी-निर्मिती आणि टीपीसी-वितरण यांच्यातील वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी टाटा पॉवर कं. लि. ने दाखल केलेली याचिका |
| १९ | दि टाटा पॉवर कं. लि. | महापारेषण कं. | ०१.०६.२०११ | २०११ चे ७७ | टाटा पॉवरच्या कर्नाक रिसिव्हींग स्टेशन येथील ६०.४८ Kwp छपरावरील सौर ऊर्जा प्रकल्पास जोडणीच्या मंजुरीसाठी महापारेषण कंपनीला निर्देश देण्यासाठी याचिका |
| २० | दि टाटा पॉवर कं. लि. | महावितरण कं. | ३०.०५.२०११ | २०११ चे ७८ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(१)(इ) अंतर्गत दिलासा मागण्यासाठी याचिका |
| २१ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | ०२.०६.२०११ | २०११ चे ७९ | मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ च्या विनियम १०० अंतर्गत सन २००९ च्या प्रकरण क्र. १०७ मध्ये दि. १३ एप्रिल, २०११ रोजी दिलेल्या आदेशासंबंधात महानिर्मिती कंपनीच्या परळी युनिट ६ आणि पारस युनिट ३ मधून आर्थिक वर्ष २०११-२०१२ करिता विजेच्या विक्रीसाठीच्या वैधतेची मुदतवाढ आणि आकारणी चालू ठेवण्यासाठीच्या विनंतीकरिता याचिका |
| २२ | मे. २१ सेचुरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा.लि. (टीसीआयआयपीएल) | उल्लेख नाही | ३१.०५.२०११ | २०११ चे ८० | मविनिआ (वीज व्यापार परवाना अटी) विनियम, २००४ नुसार वीज व्यापाराच्या परवान्याच्या मंजुरीसाठी याचिका |
| २३ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | ३०.०५.२०११ | २०११ चे ८१ | परळी युनिट क्र. ६ साठी आ.व. २००७-०८ आणि आ.व. २००८-०९ करिता अचूक समायोजन आणि पारस युनिट क्र. ३ साठी अचूक समायोजन, परळी युनिट क्र. ६ आणि पारस युनिट क्र. ३ साठी आ.व. आर्थिक वर्ष २००९-१० साठी वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आर्थिक वर्ष २०१० ११ साठी वीज दराचे निश्चितीकरण या विषयीच्या सन २००९ च्या प्रकरण क्र. १०७ मधील दि. १३ एप्रिल, २०११ च्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| २४ | आयोग स्वतः | मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि., दि टाटा पॉवर कं. लि., आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | लागू नाही | २०११ चे ८२ | आयोगाच्या दि. २४.११.२००९ रोजीच्या आदेशाविरुध्द मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. ने दाखल केलेल्या अपील क्र. २००९ चे १९५ मध्ये मा.विद्युत अपील न्यायाधिकरणाने दि. ३१ मे, २०११ रोजी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी |
| २५ | श्री इंद्रदेव रामारेश मिश्रा | महापारेषण कं. | १०.०६.२०११ | २०११ चे ८३ | टॉवर उभारणी संबंधात महापारेषण कंपनीला निर्देश देण्यासाठी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६७ खाली याचिका |

| क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| २६ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि. | १४.०६.२०११ | २०११ चे ८४ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि. यांच्यामध्ये झालेल्या वीज प्राप्तीच्या कराराच्या संबंधात विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेमधून निश्चित केलेल्या वीज दराचा स्वीकार करण्यासाठी याचिका |
| २७ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | वर्धा पॉवर कं. लि. | १४.०६.२०११ | २०११ चे ८५ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड आणि वर्धा पॉवर कंपनी लि. यांच्यामध्ये झालेल्या वीज खरेदीच्या कराराच्या संबंधात विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत पारदर्शक बोली प्रक्रियेमधून निश्चित केलेल्या वीज दराचा स्वीकार करण्यासाठी याचिका |
| २८ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. | उल्लेख नाही | ०८.०६.२०११ | २०११ चे ८६ | आ.व.२०११-१२ साठी एकूण महसुली गरज, आ.व.२०१०-११ साठी वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आ.व.२००९-१० साठी अचूक समायोजन यांना मान्यता देण्यासाठी महापारेषण कंपनीची याचिका |
| २९ | मे. ॲक्युरेट प्लास्टिक कं. | मुख्य अभियंता, कल्याण, महावितरण कं., आणि उप अभि. वसई, महावितरण कं. | २०.०५.२०११ | २०११ चे ८७ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण, यांनी दि. ४.१०.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत महावितरण कंपनी विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, आणि १४६ अंतर्गत याचिका |
| ३० | मे. किप्रिल प्रॉडक्ट ॲण्ड पॅकेजिंग्स प्रा.लि. | मुख्य अभि., कल्याण, महावितरण कं., आणि उप अभि, वसई, महावितरण कं. | १९.०५.२०११ | २०११ चे ८८ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण, यांनी दि. १३.१०.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत महावितरण कंपनी विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, आणि १४६ अंतर्गत याचिका |
| ३१ | श्री सातु संभाजी खांडेकर | कार्य.अभि., सिटी सर्कल, महावितरण कं., सांगली | १३.०४.२०११ | २०११ चे ८९ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर यांनी सन २०१० च्या प्रकरण क्र. २७५ मध्ये पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत महावितरण विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, आणि मविनिआ, (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००६ च्या विनियम २२ अंतर्गत याचिका |
| ३२ | श्री सखाराम गणपतराव देशपांडे | कार्य. अभि., सिटी सर्कल, महावितरण कं. जालना | १३.०५.२०११ , | २०११ चे ९० | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, औरंगाबाद परिमंडल यांनी दि. ०४.११.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत महावितरण विरुध्द विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२ अंतर्गत याचिका |
| ३३ | मे. एस्सार पॉवर लि. | उल्लेख नाही | २३.०६.२०११ | २०११ चे ९१ | मुंबई उपनगर क्षेत्रात विजेच्या वितरणासाठी वितरण परवान्याच्या मंजुरीसाठी याचिका |
| ३४ | बेस्ट उपक्रम | उल्लेख नाही | २९.०६.२०११ | २०११ चे ९२ | मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ अंमलबजावणी लांबणीवर टाकण्यासाठीच्या सन २०११ च्या प्रकरण क्र. ४३ मध्ये दि. ५.५.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ३५ | श्री विठोबा मोगलप्पा पोगुल | मुख्य अभि., महावितरण कं., कोल्हापूर | २५.०३.२०११ | २०११ चे ९३ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांनी दि. १४.१२.२०१० रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत श्री विठोबा मोगलप्पा पोगुल यांची याचिका |
| ३६ | आर.एल.स्टील ॲण्ड एनर्जी लि. | महावितरण कं. | ५.०७.२०११ | २०११ चे ९४ | सन २०११ च्या प्रकरण क्र. ३१ मध्ये दि. २/०६/२०११ रोजी आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत याचिका |
| ३७ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. | लागू नाही | ०१.०७.२०११ | २०११ चे ९५ | (एक) विहित केलेल्या व्होल्टेज पातळीपेक्षा कमी व्होल्टेज पातळीने वीज पुरवठा देण्यात आलेल्या ग्राहकांना व्होल्टेज अधिभार म्हणून २% अतिरिक्त युनिट्सची वसुली, (दोन) सन २०११ च्या प्रकरण क्र. ३१ मध्ये मा. आयोगाने पारित केलेला दि. २ जून, २०११ रोजीचा आदेश, आणि (तीन) स्थगितीच्या मंजुरीसाठी महावितरण कंपनीचा संकीर्ण अर्ज |

| क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | मे. प्रेरणा स्टोन क्रशर, अकोला | उप अभि (संचा आणि देखभाल), विद्युत अभि. (ग्रामिण), महावितरण कं., अकोला | ०५.०७.२०११ | २०११ चे ९६ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, अमरावती परिमंडल, अकोला यांनी सन २०११ च्या प्रकरण क्र. १५ मध्ये दि. ०४.०६.२०११ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत याचिका |
| ३९ | मे. सुर्या बायो फ्युएल, सांगली | विद्युत अभि., सोलापूर, आणि विद्युत अभि. इस्लामपूर, महावितरण कं. | ०४.०७.२०११ | २०११ चे ९७ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच यांनी दि. ०४.०५.२०११ रोजी पारित केलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत याचिका |
| ४० | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. | उल्लेख नाही | ०६.०७.२०११ | २०११ चे ९८ | सन २०१० च्या प्रकरण क्र. २३ मध्ये दि. ३० मे, २०११ रोजी आयोगाने स्वत: दिलेल्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी याचिका |
| ४१ | श्री संजय अंकुश निकम | विद्युत अभियंता, सोलापूर, आणि विद्युत अभि, महावितरण कं., सोलापूर | ०४.०७.२०११ | २०११ चे ९९ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कोल्हापूर यांनी दि. २९/१०/२०१० रोजी दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत श्री संजय अंकुश निकम यांची याचिका |
| ४२ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. | उल्लेख नाही | १२.०७.२०११ | २०११ चे १०० | आ.व. २००९-१० साठी अंतिम अचूक समायोजन, आ.व.२०१०-११ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि आ.व. २०१०- ११ साठी वार्षिक कामगिरीचा आढावा यांच्या मंजुरीसाठी याचिका |
| ४३ | आयोग स्वतः | मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि., रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. आणि दि टाटा पॉवर कं. लि. | लागू नाही | २०११ चे १०१ | आरइफ्राच्या आ.व. २००९-१० साठीच्या वीज दर याचिकेवर दि. १५.६.२००९ रोजी आयोगाने दिलेल्या आदेशाच्या विरुध्द मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. ने दाखल केलेल्या अपील क्र. २००९ च्या १४४ मध्ये मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दि. १८ जुलै २०११ रोजी दिलेल्या निकालाची अंमलबजावणी |
| ४४ | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि. | उल्लेख नाही | २१.०७.२०११ | २०११ चे १०२ | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५ च्या तरतुदी अंतर्गत आ.व. २०१०-११ साठी वार्षिक कामगिरीचा आढावा आणि आ.व. २००९-१० साठी अचूक समायोजन यांच्या मान्यतेसाठी महापारेषण कंपनीची याचिका |
| ४५ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | २५.०७.२०११ | १०३ of २०११ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ (४) नुसार महावितरण कंपनीच्या केंद्रांसाठी इंधन समायोजन आकारांच्या (एफएसी) परिगणनेच्या पध्दतीच्या पुनर्विलोकनासाठी याचिका |
| ४६ | दि टाटा पॉवर कं. लि. | उल्लेख नाही | २५.०७.२०११ | २०११ चे १०४ | आ.व. २००९-१० साठी अचूक समायोजन आणि आ. व. २०१०-११ साठी वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी टाटा पॉवर कंपनी लि. (वितरण व्यवसाय)ची याचिका |
| ४७ | दि टाटा पॉवर कं. लि. | उल्लेख नाही | २५.०७.२०११ | २०११ चे १०५ | आ.व. २००९-१० साठी अचूक समायोजन आणि आ. व. २०१०-११ साठी वार्षिक कामगिरीचा आढाव्याच्या मान्यतेसाठी टाटा पॉवर कंपनी लि. (निर्मिती व्यवसाय)ची याचिका |
| ४८ | दि टाटा पॉवर कं. लि. | उल्लेख नाही | २५.०७.२०११ | २०११ चे १०६ | आ.व.२००९-१० साठी अचूक समायोजन आणि आ. व. २०१०-११ साठी वार्षिक कामगिरीच्या आढाव्यास मान्यता देण्यासाठी टाटा पॉवर कंपनी लि. (पारेषण व्यवसाय) ची याचिका |

| क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ४९ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | २५.०७/२०११ | २०११ चे १०७ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६१ आणि ६२, मविनिआ (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५ च्या भाग सी अंतर्गत, आ. व. २००९-१० साठी अंतिम अचूक समायोजन आणि आ. व. २०१०-११ साठी वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. ची याचिका |
| ५० | आयोग स्वत: | - | लागू नाही | २०११ चे १०८ | आयोगाच्या दि. १/६/२०१० च्या आदेशा विरुध्द (एक) मे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री आणि ॲग्रिकल्चर आणि (दोन) मे. के. रहेजा कॉर्पोरेशन प्रा. लि. यांनी दाखल केलेल्या अपील क्र. २०१० चा १५६ आणि २०१० चे १५५ मध्ये मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दि. ११ जुलै, २०११ रोजी दिलेल्या निकालाची अंमलबजावणी |
| ५१ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | महावितरण कं., महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (एमएसएलडीसी) | १५.०७.२०११ | २०११ चे १०९ | राज्य भार प्रेषण केंद्राकडून वीज निर्मिती कमी करण्यासाठी आलेल्या सूचीमुळे महानिर्मिती कंपनीच्या वीज केंद्राच्या कामगिरीच्या निकषांमधील अपेक्षित तफावती विचारात घेण्यासाठी याचिका |
| ५२ | एन. पोनरथनम (प्रोप्रायटर) व्हेल इण्डक्शन हार्डनिंग | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. आणि दि टाटा पॉवर कं.लि. | २७.०७.२०११ | २०११ चे ११० | दोन भागांच्या वीज दराची लहरीनुसार वसुली आणि आयोगाच्या आदेशातील लघु दाब ग्राहकांची चुकीची वर्गवारी यासाठी कलम १२९(१), १४२ आणि १४६ अंतर्गत कायदेशीर कार्यावाहीसाठी याचिका |
| ५३ | श्री रेणुका शुगर्स लि. | महावितरण कं. आणि महापारेषण कं. | १२.०७.२०११ | २०११ चे १११ | श्री रेणुका शुगर्स लि. ने त्यांच्या महाराष्ट्र राज्यातील "बांधा, मालकी, वापरा अणि हस्तांतरण करा" (बूट) च्या तत्वावर उभारलेल्या ३० मेगावॅट क्षमतेच्या ऊसाच्या चिपाडावरील ऊर्जा सहनिर्मिती प्रकल्पासाठी वहन सुविधा उभारण्यासाठी केलेल्या खर्चाची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि./महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. ने प्रतिपूर्ती करण्यासाठी याचिका |
| ५४ | श्री रविंद्र विनायक जावळेकर | जिल्हाधिकारी, वर्धा; महापारेषण कं., नागपूर | ०४.०८.२०११ | २०११ चे ११२ | मा जिल्हा दंडाधिकारी वर्धा यांनी दि. २२/७/२०११ रोजी दिलेला आदेश आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं. लि. यांनी भारतीय टेलिग्राफ अधिनियम, १८८५ अंतर्गत निर्गमित केलेल्या नोटीशीस आव्हान देणारी श्री रविंद्र विनायक जावळेकर यांची याचिका |
| ५५ | मे. गिमाटेक्स इंडस्ट्रिज प्रा.लि. | महावितरण कं. | ०८.०८.२०११ | २०११ चे ११३ | महावितरण कंपनीने विद्युत लोकपालांच्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल मे. गिमाटेक्स इंडस्ट्रीज प्रा. लि. वनी ची विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६ अंतर्गत कारवाईसाठी याचिका |
| ५६ | मे. गिमाटेक्स इंडस्ट्रिज प्रा.लि. | महावितरण कं. | ०८.०८.२०११ | २०११ चे ११४ | महावितरण कंपनीने विद्युत लोकपालांच्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल मे. गिमाटेक्स इंडस्ट्रीज प्रा. लि. हिंगणघाट ची विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४२, १४६ अंतर्गत दंडात्मक कारवाईसाठी याचिका |
| ५७ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | उल्लेख नाही | ०८.०८.२०११ | २०११ चे ११५ | रिलायन्स इफ्रास्ट्रक्चर लि. ची पारेषण व्यवसायाकरिता आ.व.२००९-१० साठी अचूक समायोजन आणि आ.व.२०१०-११ साठी तात्पुरत्या अचूक समायोजनाकरिता याचिका |
| ५८ | महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. | उल्लेख नाही | ११.०८.२०११ | २०११ चे ११६ | परळी युनिट ७ आणि पारस युनिट ४ च्या संबंधात प्रकल्पाच्या खर्चाचे निश्चितीकरण आणि वीज दराच्या निश्चितीसाठीच्या याचिकेवर दि. २१ जुलै, २०११ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान देण्यात आलेल्या निर्देशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कं. लि. ची याचिका |
| ५९ | मे. बोरेक्स मोरारजी लि. | महावितरण कं. | १६.०८.२०११ | २०११ चे ११७ | मा. आयोगाने सन २००२ च्या प्रकरण क्र. १७ (३), ३, ४ आणि ५ मध्ये दि. २४ नोव्हेंबर, २००३ रोजी दिलेल्या आदेशाचे स्पष्टीकरण मागण्यासाठी मे. बोरॅक्स मोरारजी लि. यांची याचिका |

| क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ६० | मे. सुपरफाईन. फोटो कं.प्रा.लि | महावितरण कं. | १६.०८.२०११ | २०११ चे ११८ | महाराष्ट्र शासनाच्या दि. १२ मार्च, १९९८ रोजीच्या पवन ऊर्जा निर्मितीवरील धोरणाबाबत स्पष्टीकरण, मेडाने मंजूर केलेले भांडवली अनुदान आणि मा. आयोगाने सन २००२ च्या प्रकरण क्र. १७(३), ३, ४ आणि ५ मध्ये दि. २४ नोव्हेंबर, २००३ रोजी पारित केलेल्या आदेशाचे स्पष्टीकरण मागण्यासाठी मे. सुपरफाईन फोटो कं. प्रा. लि. ची याचिका |
| ६१ | मे. डॉडसन लिण्डब्लॉम हायड्रो पॉवर प्रा. लि. | महावितरण कं. | १६.०८.२०११ | २०११ चे ११९ | प्रतिवाद्यास विजेचा पुरवठा करण्यासाठी याचिकाकर्त्याच्या निर्मिती केंद्राच्या क्षमता निर्देशांकाच्या परिगणनेबाबतच्या वादावर अभिनिर्णय, स्पष्टीकरण आणि निर्देश देण्यासाठी याचिका |
| ६२ | श्री अंजया राम अनपार्थी | महावितरण कं., आणि स्पॅन्को लि. | १२.०८.२०११ | २०११ चे १२० | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. आणि मे. स्पान्को लि. यांच्यामध्ये दि. २३ फेब्रुवारी, २०११ रोजी स्वाक्षांकित झालेल्या वीज वितरण फ्रॅन्चायसी कराराला आव्हान देणारी श्री अंजया राजम अनपार्थी यांची याचिका |
| ६३ | महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना | महावितरण कं. | १२.०८.२०११ | २०११ चे १२१ | महावितरण कंपनीने विविध ठिकाणी वितरण फ्रॅन्चायसी नेमण्यासाठी केलेल्या कराराच्या चौकशीच्या मागणीसाठी आणि कायद्यानुसार मानके आणि नियम निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेची याचिका |
| ६४ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | उल्लेख नाही | १८.०८.२०११ | २०११ चे १२२ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. ची तिच्या निर्मिती व्यवसायासाठी आ.व.२००९-१० साठी अचूक समायोजन आणि आ.व.२०१०-११ साठी तात्पुरत्या अचूक समायोजनाकरिता याचिका |
| ६५ | श्री अशोक सुसुरुद्दीन नडाफ | महावितरण कं. | १६.०८.२०११ | २०११ चे १२३ | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, कल्याण यांनी दि. २०/४/२०११ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याबाबत याचिका |
| ६६ | बेस्ट उपक्रम | उल्लेख नाही | २५.०८.२०११ | २०११ चे १२४ | बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि वाहतूक (बेस्ट) उपक्रमाने आ.व. २०११-१२ ते २०१५-१६ पर्यंतच्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी, मविनिआ (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ च्या विनियम ३२, ९४ अंतर्गत आणि बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११च्या विनियम ४.२ (दोन), ७.१ अंतर्गत दाखल केलेली याचिका |
| ६७ | बेस्ट उपक्रम | उल्लेख नाही | २६.०८.२०११ | २०११ चे १२५ | आ.व. २००९-१० साठी अंतिम अचूक समायोजन आणि आ.व. २०१०-११ साठी तात्पुरत्या अचूक समायोजनाकरिता मविनिआ (वीज दराच्या अटी आणि शर्ती) विनियम, २००५ नुसार याचिका |
| ६८ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | उल्लेख नाही | ०६.०९.२०११ | १२६ चे २०११ | आ.व. २००९-१० साठी अचूक समायोजन आणि आ.व. २०१०-११ साठी तात्पुरत्या अचूक समायोजनाकरिता रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. - वितरणची याचिका |
| ६९ | महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना | महावितरण कं. | २२.०८.२०१० | २०११ चे १२७ | डॉक्टर्स, वकील, लेखा परीक्षक यांच्या व्यवसायासारख्या असलेल्या छोट्या घरगुती व्यवसायासाठी विजेचा वापर करण्याची निवासी वीज ग्राहकांना परवानगी देण्यासाठी आणि त्यासाठी आयोगाने मान्यताप्राप्त वीज दरपत्रकात उचित बदल करण्याच्या उद्देशासाठी याचिका |
| ७० | अकोट तालुका ग्राहक पंचायत | महावितरण कं. | २८.०८.२०११ | २०११ चे १२८ | विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १२९ आणि पुरवठा संहितेच्या विनियम २२ आणि मविनिआ (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम, २००६ अंतर्गत विद्यमान आणि भावी विद्युत ग्राहकांच्या हिताकरिता प्रतिवादीला आदेश आणि कार्यप्रणाली निर्देश देण्यासाठी याचिका |

| क्र. | अर्जदार | प्रतिवादी | याचिकेचा दिनांक | प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|---|---|---|---|
| ७१ | दि अकोट एमआयडीसी इंडस्ट्रियल असोसिएशन | महावितरण कं. | ०३.०९.२०११ | २०११ चे १२९ | केवळ ८ तासांसाठी थ्री फेज विजेच्या उपलब्धतेची मर्यादा घालून, ज्या औद्योगिक ग्राहकांना बेकायदेशीररित्या कृषी फिडरमधून किंवा एजी-एलएम च्या सिंगल फेज योजना राबविण्यात येत असलेल्या फिडरमधून वीज पुरविली जाते त्या औद्योगिक ग्राहकांच्या अडचणी दूर करण्यासाठी आणि कार्यप्रणाली निर्देश मागण्यासाठी अकोट एमआयडीसी इंडस्ट्रीयल असोसिएशनची विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ४२ (१) आणि पुरवठा संहिता विनियम, २००५ च्या विनियम २२, २३, २४ अंतर्गत याचिका |
| ७२ | गोदरेज प्रॉपर्टीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट लि. | महावितरण कं. | २२.०८.२०११ | २०११ चे १३० | मविनिआचा सन २००८ च्या प्रकरण क्र. ११६ मध्ये दि. १७.०८.२००९ रोजीचा वीज दर आदेश लागू करण्यासाठी याचिका |
| ७३ | गोदरेज कॅसलमेन | महावितरण कं. | २२.०८.२०११ | २०११ चे १३१ | मविनिआचा दि. १७.०८.२००९ रोजीचा वीज दर आदेश लागू करण्या संदर्भात स्पष्टीकरण मागण्यासाठी मे गोदरेज कॅसलमोची याचिका |
